श्रीजगदीश प्रसन्न.

संगीत कपविपर्यास नाटक.

अंक १ ते ५.

माधव नारायण खरे.

श्रीजगदीश प्रसन्न.

संगीत

वेषविपर्यास नाटक

अंक १ ते ५.

हें पुस्तक

माधव नारायण खरे

रेव्हिन्यू क्लार्क,

डेप्युटि कमिशनर्'स आफिस नागपूर,

यानीं लिहिलें तें नागपूर येथें

गोपाळ जिवाजी केळकर

यांच्या "सी. पी. प्रिंटिंग वर्क्स" छापखान्यांत

छापून प्रसिद्ध केलें.

१९०४.

किंमत १२ आणे.

ह्या पुस्तकाची मालकी सन १८६७ च्या २५ व्या
आक्टाप्रमाणें नोंदून पुस्तक छापविण्याचा
व रंगभूमीवर प्रयोग करण्याचा वगैरे
सर्व हक्क पुस्तक कर्त्यानें
आपलेकडे ठेविले आहेत.

अर्पणपत्रिका.

हें पुस्तक

तीर्थरूप नानाजी खरे

यांचे चरणसेवेसीं

त्यांच्या प्रियपुत्रानें पूज्यता-

पूर्वक अर्पण केलें आहे.

मा० ना० खरे.

❀ शुद्धिपत्र. ❀ अ/3/92

पान.	ओळ.	अशुद्ध अथवा सूचना	शुद्ध.
१७	२५	हिवरानें	गहिवरानें
१८	५	केला.	केली.
...	२५	माझ्याकडन	माझ्याकडनं
३०	९	शुष्क	शून्य
३२	२७	अंगध्वज दुर्दैवें	अंगध्वजदुर्दैवें
३४	२८	प्रासादश रथीतें	प्रासादेशरथीतें
५३	१७	गचाळ	नीच
५५	३	नर्क	नरक
६५	६	पळुनि	पळुनी
६९	१४	दो मार्गी	दोमार्गि
८०	९	(वाक्याच्या सुरुवातीला शब्द सुटला.)	पण
८४	१४	चोरानें	चोरानीं
८७	९	मणिकपाला कडे	मणिकपालाकडे
९१	७	("करणं आपलं काम आहे" या पुढचं एक वाक्य सुटलें)	अरे, माझ्या या काळ्या कुरळ सुबक वेणी पुढं इंदिरेच्या त्या पिंगट तपकिरी केसांचा पगडा तो कसला?
९४	४	पडतो	उघडतो
...	२२	रुक्ष	रूक्ष
१०५	११	खेराज	खेरीज
११८	१९	तीव्रक्राचे	तीव्रवज्राचे
१२०	१५	चाणार	जाणार
१२३	२	पाडिजे.	पाहिजे.
१२५	९	दप	पद
...	१२	वज्रला	वज्राला
१२६	५	म्हतूनच	म्हणूनच

प्रस्तावना.

प्रस्तुत नाटक विद्वज्जनांपुढें नम्रपणें ठेविलें आहे. तरी तें वाचतांना अगर दैववशात् रंगभूमीवर आल्यास त्याचा प्रयोग पाहतांना तें चित्ताकर्षक होऊन "पुढें काय झालें आहे" ही उत्कंठा मनांत शेवटपर्यंत कायम राहिली ह्मणजे माझा मुख्य हेतू साधला.

२. कथानक स्वकपोलकल्पित नाहीं.

३. पुस्तकांत कांहीं स्थलीं चुक्या राहिल्या आहेत व क्वचित् कोठें मजकूर सुटला आहे तेवढ्या करितां शुद्धिपत्र जोडलें आहे. तें विसंगत स्थलीं शंकांचें समाधान करील अशी आशा आहे.

४. या पुस्तकाला ज्या गृहस्थांनीं कृपाकरून आश्रय दिला त्यांचीं नांवें येणेंप्रमाणें:—

रा. रा. डी. लक्ष्मीनारायण, कन्ट्राक्टर, कामठी.
रा. रा. श्रीपत बळवंत घाग्पुरे, एम्. ए., बी. एल, ए. अ. क., नागपूर.
रा. रा. दामोदर निळकंठ खरे, बी. ए., एल एल बी., वकील, वर्धा.
रा. रा. वामन व्यंकट घाग्पुरे, बी. ए , बी. एल, वकील, वर्धा.
रा. रा. दाजी हरबाजी गडकरी, रजिस्ट्रार, स्मालकॉज कोर्ट, नागपूर.
रा. रा. अच्युत सीताराम साठे, एम्. ए., बी. एल, ए. अ. क., नागपूर.
रा. रा. सखाराम पांडुरंग खडसे, रीडर टु धी कँटोन्मेंट म्याजिस्ट्रेट, कामठी.
रा. रा. कृष्णाजी बळवंत पिंग, एजन्ट, ओरीएंटल लाइफ ऑफिस, नागपूर.
रा. रा. महादेव राजेश्वर मुनीम, कामठी.

रा. रा. शिवदास कृष्ण वारलिंगे, आर्वी.
रा. रा. अनंत पांडुरंग, क्लॉथ मरचंट, नागपूर.
रा. रा. श्रीधर पांडुरंग असीरकर वैद्य, नागपूर.
रा. रा. महादेव त्रिंबक घारपुरे, बी. ए., बी. एल, वकील, नागपूर.
रा. रा. बापू आप्पाजी वकील, क्लार्क, सिव्हील स्टेशन कमिटी, नागपूर.
रा. रा. रामकृष्ण लक्ष्मण जामदार, नागपूर.
रा. रा. शिवाजी नारायण, क्लार्क ऑफ कोर्ट, स्मालकॉज कोर्ट, कामठी.
रा. रा. पुरुषोत्तम गणेश परांजपे, बी. ए., बी. एल, वकील, वर्धा.
रा. रा. सदाशीव विष्णु परांजपे, बी. ए., बी. एल, वकील, वर्धा.
रा. रा. शंकर माधव हरकरे, बी. ए., बी. एल, वकील, वर्धा.
रा. रा. विनायक सदाशीव पटवर्धन, वकील, नागपूर.
रा. रा. शंकर बाजीराव कांठेकर, ज्युडिशिअल क्लार्क, डिस्ट्रिक्ट ऑफिस, बालाघाट.
रा. रा. बाळकृष्ण शिवराम मुंजे, एल. एम. एस, मेडिकल प्राक्टिशनर, सिताबर्डी नागपूर.
रा. रा. पुरुषोत्तम गणेश जडी, स्टॅटिस्टीकल क्लार्क, डिस्ट्रिक्ट ऑफिस, नागपूर.
रा. रा. वासुदेव दिवाकर पेंढलवार, ट्रेझरी क्लार्क, कामठी.
रा. रा. नारायणराव वाडेगांवकर, मेडिकल प्राक्टिशनर, कामठी.
रा. रा. अनंत गणेश छत्रे, कॉमिसरीएट क्लार्क, बेस, फील्ड फोर्स, सोमाली लॅन्ड, बर्बेरा.
रा. रा. बाळकृष्ण विनायक गोगटे, पिटिशन रायटर, कामठी.
रा. रा. हनुमंतराव फडनवीस, ऑनररी म्याजिस्ट्रेट मोहगांव, कामठी.
रा. रा. कृष्णाजी वासुदेव पांडे, क्लार्क, सेक्रेटरीएट ऑफिस, नागपूर.
रा. रा. भास्कर गणेश पंडित, बी. ए., बी. एल, वकील, नागपूर.
रा. रा. नारायण गणेश चिमोटे, क्लार्क, डिव्हीजनल जजे'स ऑफिस, नागपूर.
रा. रा. नारायण काशिनाथ वैद्य, बी. ए , क्लार्क, डेपुटी कन्ट्रोलर आफ पोस्ट ऑफिस, नागपूर.
रा. रा. गोपाळ विष्णु गोडबोले, क्लार्क, कॉमिसरीएट ऑफिस, मद्रु.

रा. रा. माधवराव देशपांडे, कामठी.

रा. रा. टी. के. तेलंग, क्लॉथ मर्चंट, नागपूर.

रा. रा. दत्तात्रय रामचंद्र देव, क्लार्क डिव्हिजनल जजे'स ऑफिस, नागपूर.

रा. रा. गोपाळ रंगोबा सप्तऋषि, ओव्हरसिअर, बी. एन. आर. लाईन, कामठी.

रा. रा. पंढरीनाथ नारायण वऱ्हाडपांडे, सब पोस्ट मास्तर, तुमसर.

रा. रा. पंढरीनाथ शास्त्री घाटे, एम्. ओ. एल, (पंजाब युनिव्हर्सिटी), नागपूर.

रा. रा. विठ्ठल आत्माराम फडनवीस, हेड क्लार्क, सिनीअर भोंसला इस्टेट, नागपूर.

रा. रा. गोपाळ बाळकृष्ण ठेंगडी, पोलिस क्लार्क, कामठी.

रा. रा. नारायण माधव राजहंस, नागपूर.

रा. रा. बी. व्ही. ग्रामस्थ, स्टेशनर्स, नागपूर.

रा. रा. रामचंद्र विष्णु सोमण, असिस्टंट मास्तर, नील सिटी हाय स्कूल, नागपूर.

रा. रा. दाजबा सदाशिव पालकर, क्लार्क, ज्यूनिअर भोंसला इस्टेट, नागपूर.

रा. रा. हिरालाल सुकुल, बी. ए , बी. एल, वकील, कामठी.

रा. रा. आर. विश्वनाथ अय्या, कामठी.

रा. रा. विठ्ठल जयकृष्ण, रेकार्ड कीपर, स्मालकॉज कोर्ट, कामठी. *

रा. रा. गोविंद बाळकृष्ण दारवहकर, क्लार्क, स्मालकॉझ कोर्ट, कामठी.

रा. रा. दत्तात्रेय गुंडो कानविंदे, रीडर टु दी जज स्मालकॉज कोर्ट, नागपूर.

रा. रा. माधव आबाजी वैद्य, नागपूर.

रा. रा. गोपाळ हरी पिंपरकर, नजूल दारोगा, नागपूर.

रा. रा. गोविंद माधव हतेकर, डेपुटी कमिशनर्स मोहरीर, नागपूर

रा. रा लक्ष्मण सदाशिव खडसे, ज्युडिशिअल रेकार्ड कीपर, डिस्ट्रिक्ट ऑफिस, नागपूर.

रा. रा. आप्पाजी जयकृष्ण घाटे, ओव्हरसिअर, पी डब्ल्यु. डी., नागपूर.

रा. रा. राघव बापूजी पैठणकर, ऑडिटर, कन्ट्रोलर्स ऑफिस, नागपूर.

रा. रा. नारायण हरबाजी दशपुत्र, रजिस्ट्रेशन क्लार्क, कामठी.

रा. रा. दामोदर केशव ओक, असिस्टंट मास्तर, हायस्कूल, कामठी.

रा. रा. माधव रावजी टुनकीकर, एजन्ट, रॅली ब्रदर्स आफिस, हिंगणघाट.

रा. रा. माधव पुंडलिक वाघमारे, ज्युडिशिअल क्लार्क, डिस्ट्रिक्ट आफिस, नागपूर.

रा. रा. मोरेश्वर वासुदेव अभ्यंकर, धनोडी.

रा. रा. रामचंद्र गोविंद परांजपे, बी. ए., बी. एल, वकील, नागपूर.

रा. रा. गणपत विठोबा वारकरी, कामठी. *

रा. रा. कृष्णा जयराम कोरडे, कन्ट्र्याक्टर, उमरेड.

रा. रा. गणेश नारायण साठे, परमानंद प्रासादिक नाटक मंडळी, हल्लीं उमरेड.

रा. रा. त्र्यंबक रघुनाथ जोशी, परमानंद प्रासादिक नाटक मंडळी, हल्लीं उमरेड.

रा. रा. दत्तात्रेय नारायण भोंसले, परमानंद प्रासादिक नाटक मंडळी, हल्लीं उमरेड.

रा. रा. रामचंद्र गोविंद डाके, ऑनररी माजिस्ट्रेट—मोहगीर, नागपूर.

रा. रा. आबाजी विनायक दिवाण, क्लार्क म्युनिसिपॉलिटी, नागपूर.

रा. रा. धुंडीराज नारायण, क्लार्क, रॅली ब्रदर्स ऑफिस, नागपूर.

रा. रा. खंडोपंत कृशावराय संगमनेरकर, नागपूर.

रा. रा. हरी विठ्ठल लिमये, बी. ए., नागपूर

रा. रा. गोपाळ नारायण केळकर, ऑडिटर, कन्ट्रोलर्स ऑफिस, नागपूर.

रा. रा. वामन नारायण थत्ते, बी. ए., एक्झामिनर, कन्ट्रोलर्स ऑफिस, नागपूर.

रा. रा. सुमय्या, डिस्ट्रिक्ट फंड ऑडिटर, कंट्रोलर्स आफिस, नागपूर.

रा. रा. त्र्यंबक मोरेश्वर खरे, नागपूर.

रा. रा. नारायण रंगनाथ अंळकार, बी. ए., हेड मास्तर, पटवर्धन हायस्कूल, नागपूर.

रा. रा. बाळकृष्ण सखाराम टेंभेकर, क्लार्क, पी. डब्ल्यु. इरीगेशन डिपार्टमेंट, नागपूर.

रा. रा. यादव बाळाजी वाघमारे, डेपुटी क्लार्क ऑफ कोर्ट, डिस्ट्रिक्ट ऑफिस, नागपूर.

रा. रा. दत्तात्रेय परशुराम चितळे, क्लार्क, डेड लेटर ऑफिस, नागपूर.

रा. रा. महादेव रघुनाथ कानिटकर, क्लार्क, डिस्ट्रिक्ट ऑफिस, नागपूर.

रा. रा. पांडुरंग विठ्ठल भावसार, बारीस्टर्स क्लार्क, नागपूर.

रा. रा. अनंत गोपाळ भोजराज, क्लार्क, सानिटरी कमिशनर्स आफिस, नागपूर.

रा. रा. बळवंत राजेश्वर इंदुरकर, क्लार्क, डेपुटी कंट्रोलर आफ पोस्ट ऑफिस, नागपूर.

रा. रा. कृष्णा गंगाधर करंदीकर, बी. ए., एक्झामिनर, कंट्रोलर्स ऑफिस, नागपूर.

रा. रा. शंकर गणेश मुळे, ट्रेझरी ऑफिस, नागपूर.

रा. रा. बापू गणपत सावतकर, क्लार्क, डिस्ट्रिक्ट ऑफिस, नागपूर.

रा. रा. श्रीनिवास नरहर नंदनपवार, डिस्ट्रिक्ट ऑफिस, नागपूर.

रा. रा. श्रीनिवास गोपाळ केळकर, प्रोप्रायटर, सी. पी. प्रिंटिंग वर्क्स, नागपूर.

रा. रा. विश्वनाथ बाळकृष्ण क्षीरसागर, क्लार्क, सेक्रेटॅरीअट ऑफिस, नागपूर.

रा. रा. विठ्ठल चिमणाजी देशपांडे, पिटिशनरायटर, कामठी.

नागपूर,
जानेवारी १९०४. } माधव नारायण खरे.

---

* हे दोन गृहस्थ प्लेगनें तुक्तेच वारले याबद्दल पुस्तक कर्त्यास फार वाईट वाटतें.

नाटकांतील पात्रें.

नंबर.	पात्रांचीं नांवें.	वर्णन.	प्रोज किंवा संगीत.	कोण कोणत्या अंकांत कामें आहेत
१	सूत्रधार.	नाटकाचा चालक.	संगीत.	१.
२	नटी.	सूत्रधाराची बायको.	संगीत.	१.
३	शैलेश.	भीमखिंडीचा राजा.	प्रोज.	१ ते ५.
४	मंदारमाला.	शैलेशाची बायको.	प्रोज.	१,३,४,५.
५	तीव्रवज्र.	शैलेशाचा वडील मुलगा.	संगीत.	१ ते ४
६	अतुलचंद्र.	शैलेशाचा धाकटा मुलगा. (नायक)	संगीत.	१ ते ५
७	इंदिरा.	अतुलचंद्राची बायको. राजा पौलोमाचा मुलगी. (नाइका)	संगीत.	१,३,४,५
८	भीमशौर्य.	शैलेशाच्या पदरचा अत्यंत बलाढ्य शिपाई.	प्रोज.	१,३,४,५
९	भालचंद्र.	अतुलचंद्राचा सेवक.	संगीत	१ ते ५.
१०	रमा.	चंदनदास खाणावळवाल्याची मुलगी. भालचंद्राची बायको.	प्रोज.	३ व ५.
११	मणिकपाल.	अतुलचंद्राच्या पाळतीवर असलेला शैलेशाचा नोकर.	प्रोज.	३ व ४.
१२	अंगध्वज.	सुवर्णगडचा राजा.	प्रोज.	१ व २.
१३	वीरसेन.	अंगध्वजाचा पुतण्या.	संगीत.	२,४,५.
१४	कमला.	अंगध्वजाची पुतणी. वीरसेनाची बहीण.	संगीत.	४ व ५.
१५	प्रियंवद.	अंगध्वजाच्या पदरचा म्हातारा सरदार.	प्रोज.	१ व २.
१६	कस्तूरचंद.	प्रतापनगरांतील एक सावकार. अंगध्वजाचा अडत्या.	प्रोज.	४.
१७	प्रमिला.	कस्तूरचंदाची मुलगी.	प्रोज.	४.

या शिवाय शिपाई, जमादार, डाकेखोर, पिशाच्च, हुजरे, डोलीवाले, कारकून, भटजी, मारेकरी, सईस, भटारखानेवाले, मित्र वगैरे किरकोळ पात्रें.

संगीत

वेषविपर्यास नाटक.

अंक पहिला.

नांदी.

पद—यमन—ख्याल.

(तेंडी दरुवाजे०) चालीवर

आधीं वंदू त्या सुखकर शिवा लागुनी ॥
आहे जो स्थावरजंगमसृष्टिहेतु ॥ धृ० ॥
सूत्रधार होउनी ॥ विश्वसुनाटकसदनीं ॥
स्त्रीपुरुषां पात्रें करुनी ॥ नटणें पाहुनी ॥
उचित फळें देतो त्यांना ॥ आधीं० ॥ १ ॥

पद—भूप—त्रिताल.

(दीम् दारा दिर दिर०) चालीवर.

शंकर सुखभवन अवन करुं तुह्मा जनांचें ॥
तपा घोर करि हिमनगवन जो विघ्नहीन
जाणुनि ॥ धृ० ॥ पीडती दनुजगण ॥ घेउनि
विविधरूप तेथहि ॥ परी करी निजडमरु-
विभवपरिभव ॥ शंकर० ॥ १ ॥

सूत्रधार—(पारिपार्श्वक गेल्यानंतर) ईशस्तुती मनोभावें करून केली तर एवढीच बस आहे. असो. अहो, सूज्ञ सभाजनहो, मला अशी काळजी पडली आहे कीं,

साकी.

" वेषविपर्यास " नाम ज्याचें नव नाटक तें रचिलें ॥
आकाशा कर पोंचविण्याचें ज्यानें साहस केलें ॥
माधव अज्ञ कवी ॥ यशस्वी होइल तो केवी ॥ १ ॥

[पडद्यांत " भांडा मेल्यानों, मरा! हा थोरला कारटा एकदाचा मरतय् नाहीं, पिडा मेली "! असा शब्द होतो]

हां, समजलों! मचलें असेल पोरांत भांडण तेव्हां तर ही अशी चवताळली!

नटी—(प्रवेश करून) कोण जळ्ळा त्रास हा!

पद—काफी–त्रिताल.
(सुहृद माझा पांडुरंग०) चालीवर.

श्रवण नच करवत कलह मुलांचा ॥ धृ० ॥
सहन न वडिलास ॥ अवरजगुण खास ॥
वदि सततचि त्यास ॥ मत्सर वाचा ॥ १ ॥

ऐकलत् का? हा थोरला कारटा धाकट्याला अगदीं पाण्यांत पाहतोय्. आतां अस्सं विघ्न टळलं,—

सूत्रधार—पुरे, पुरे! ती रडकथा या सभेसमोर नको. प्रथम मला थोरलाच खरा वाटत होता. गाढवानें नाहीं नाहीं त्या कागाळ्या धाकट्याविरुद्ध मजजवळ सांगत बसाव्या. माझें डोकें एकदां का तापलें कीं त्या दुष्ट कारट्याला ठार मारून टाकायला दिखील कांकूं करणारा मी नव्हे. खात्री असूं दे.

नटी—चांगलीं मुलं मिळायला तरी थोर दैव हवं असतं. प्रिया, आपल्या कपाळीं वाईट मुलं पडलीं हें दुर्भाग्य, अन् काय?

सूत्रधार—असो. ह्या पुढें आपणाला मुलें न होतील तर बरें!

नटी—इश्श! तें आपल्या स्वाधीन का आहे? देवाची करणी!

सूत्रधार—एकट्या देवाचीच कां? त्याला तरी पुरुषाचें साह्य लागतें. पण असो. नाटकाचीं पात्रें सज्ज केलीस काय? सभाजनाला उगाच उशीर होतो.

नटी—सर्व तयार आहेत. फक्त पहिल्यानं येणाऱ्या पात्राला अंमळ वेळ आहे; म्हणून मी म्हटलं एकदां घरीं जाऊन बघावं तों भावाभावांत मारामारी.

सूत्रधार—प्रिये, तें पात्र तयार होईपर्यंत या संध्याकाळाचें थोडेसें वर्णन करून या सुजनांचें मनोरंजन कर. नंतर घरीं जाऊन मुलांची कसली कटकट चालली आहे तें पाहूं.

नटी—ठीक आहे.

पद—खमाज-खेमटा.

(आज शाम मोहे॰) चालीवर.

सूर्यतेज मंद मंद होत चाललें पहा ॥
मंजु करुनि रव नभीं पतत्रि धावती अहा ॥ धृ॰ ॥
रचुनि वेष रुचिर फार ॥ लेवुनिया अलंकार ॥
पौर नगरपरिसरीं विहार करिति सुखद हा ॥ १ ॥

सूत्रधार—(पड्याकडे पाहून) आणि अशाच वेळीं तो पहा,

साकी.

सैनिकाग्रणी अद्धितीयबल परिक्रमण करण्याला ॥
महाभाग शैलेश नृपाचा भीमशौर्य बघ आला ॥
चिंतातुर परि तो ॥ सखये ओळख कां दिसतो ॥ १ ॥

नटी—मला नाहीं बाई कळत कां दिसतो तो?

सूत्रधार—अग, ह्या आपल्या भीमखिंडींत, विश्वपाल व नेपाल या नांवांचे कोणी परके गृहस्थ महाराजांचे पाहुणे होऊन बसले आहेत ते हेर आहेत असा याचा समज आहे, म्हणून हा विचारांत गढून गेला आहे.

नटी—अं:, असेल! हीं राजकारस्थानं आपल्याला काय करायचीं आहेत? मुलांचं भांडण मिटवायला घरीं चलायचं नाहीं का?

सूत्रधार—होय प्रिये. चला जाऊं तर. [जातातः]

❀ प्रवेश १ ला. ❀

स्थळ--भीमखिडींतील एक तुटलेला कडा.

भीमशौर्य—(प्रवेश करून) काय काय अनर्थ आम्हांवर आणि या भीमखिडींतील प्रजेवर कोसळणार, परमेश्वर जाणे! आकाशांत काळे ढग लोटून आले म्हणजे जशी पावसाची वृष्टी झाल्यावांचून राहत नाहीं तद्वतच—होय, तसेंच नाहीं तर काय?—राज्यक्रांतीचा प्रसंग, एक क्षुल्लक मांडलीक राजा प्रतापसिंह, ज्या सार्वभौमाचे आह्मी सर्व अंकीत आहोंत त्याची गादी बळकावून प्रतापनगरीं आपल्या डोक्यावर छत्रचामरें उडवून घेणार अशी दाट लोकवार्ता, व अशा दुष्कृत्याला मनापासून साह्य करणारे या आसमंत प्रदेशांतील अंगध्वजासारखे आमचे हाडवैरी राजे, आणि विशेषतः अशाच वेळीं आलेला खास प्रतापसिंहाच्या दरबारचा हा सरदार विश्वपाल!—या सर्व गोष्टीकडे अमळ मार्मीकपणें पाहिलें तर आमचे प्राण विश्वासघातांत जातील कीं काय अशी शंका उभी राहते. मी भीमशौर्य व तो युवराज तीव्रवज्र यांची तर बालंबाल खात्री झाली आहे कीं विश्वपाल व नेपाल हे खास हेरच. काय मेंढरा सारखी गरीबी दाखविताहेत! अरे लबाडा विश्वपाला, शैलेश महाराजांकरितां केवढी कळकळ दाखवितोस? असें ह्मणतोस कीं तूं एकदां प्रतापसिंहाच्या प्रीतींतला होतास, तूं त्याला दोन तीन लढायांत वांचविलेंस, तुझ्या शौर्याची तो मोठी तारीफ करीत असे व तुजवर फार प्रेम करीत असे, पण आतां या दुष्टहेतुक राज्यक्रांतिप्रकरणांत तूं आपलें साह्य दिलें नाहींस ह्मणून तो तुजवर नाखुष होऊन तुला बंदिखान्यांत कुजत ठेविलें असतां तेथून तूं युक्तीनें पळून आलास व आमच्या महाराजांचा आश्रय मिळण्यास विनंती करतोस, आणि या गोष्टी खऱ्या ठरविण्याकरितां प्रतापसिंहाच्या सहीचे व मोहर छापाचे कागद दाखवितोस! पण लक्ष्यांत ठेव, आमचे

महाराज या तुझ्या पुळपुळीत पुराव्यावर कधींही भरंवसा ठेवणार नाहीत. आतां ही गोष्ट खरी कीं तूं आपल्या नाटकी व लाघवी भाषणानें आणि त्या कागदपत्रानें राजकुमार अतुलचंद्र याला मोहून टाकलें आहेस; तो तुझा पूर्ण पाठीराखा बनला आहे कारण तो तुला निर्दोष समजतो, आणि म्हणून तुला येथून सुटून जाण्याची मोठी हिम्मत आहे. परंतु आमच्या महाराजांनीं तुला कसोटीस लावण्याची जी एक शक्कल काढली आहे ती मोठी धोरणाची आहे. अतुलचंद्र हा कालचा पोर. तो माझ्याशीं उद्यां खड्गयुद्ध करणार आणि त्यांत जर तो विजयी झाला तर तूं हेर नसून अनाथ आहेस व तुला आश्रय दिला पाहिजे असें ठरेल. आणि जर तसें झालें नाहीं,—पण तसें कसें होईल? घोड्याला कधीं सिंह हार गेला काय?—तर मात्र तूं दगलबाज हेर आहेस असें गणिलें जाईल व तुझ्या सेवकानिशीं तुला ठार करूं. शिव, शिव! मला फार वाईट वाटतें कीं अशा चमत्कारिक स्थित्यंतराची साखळी लागली असतां तूं या भीमखिंडींत येऊन स्वतः फजीत झालास आणि दुसऱ्यालाही फजीत केलेंस. कारण एकीकडे उद्यां खड्गयुद्धाची घटका येऊन पोहचल्यावर रणांगणांत आपली बाजू व आपलें नांव राखण्याकरितां चिडून जाऊन कदाचित् त्या गोंडस व सुलक्षण राजकुमारावर या तलवारीचे घाव करण्यास मी मागें पुढें पाहणार नाहीं; कारण त्या वीस बावीस वर्षांच्या पोराच्या हातानें माझा पराजय झाल्यास मला कसें सहन होईल? आणि दुसरीकडे, ज्याच्या एकनिष्ठ सेवेकरितां हा देह मनःपूर्वक अर्पण केला आणि ज्याच्या सुकुमार कुमाराला बरेच दिवस मांडीवर व कडेवर खेळविलें त्या पराक्रमी राजा शैलेशाच्या डोळ्या देखत तो लाडविलेला अतुलचंद्र माझ्या हातानें जखमी होणें किंवहुना मरून जाणें हें तरी किती चमत्कारीक होईल? खरोखर विश्वपाला, तूं अशा दुष्ट मुहुर्तावर प्राप्त झालास कीं मला इकडे आड नी इकडे विहीर झाली आहे. (कांहीं वेळ चिंता दाखवून नंतर पडद्यांत पाहून) हा पहा, अतुलचंद्र!—प्रेमपाशांत गुंतलेल्या इंदिरेची समजूत घालीत याच रस्त्यानें येत आहे. मी याची भेट घेऊं काय? नको. कदाचित् इथेंच भांडण होईल. अरे अल्लड मुला

अतुलचंद्रा, तूं आज हंसतो आहेस, पण उद्यां तुझा हूडपणा तुला नडेल.

[जातो.]

❀ प्रवेश २ रा. ❀

स्थळ—भीमखिंडींतील एक गुहा.

[अतुलचंद्र आणि इंदिरा प्रवेश करतात]

इंदिरा—(सचिंत मुद्रेनें) प्रियकरा, हें भयंकर नाहीं का? मला कीं नाहीं एखादं बिकट संकट दाराशीं येऊन ठेपल्या सारखं वाटतं आहे.

अतुलचंद्र—प्रिये, अशी भिऊं नकोस. काय करूं, एखादा परका मनुष्य आपल्या घरीं आश्रय मागावयास आला असतां त्याच्या संबंधीं भलत्याच कल्पना धरून त्याला विनाकारण मारून टाकणें मला पसंत नाहीं; ह्मणून भीमशौर्याशीं दोन हात खेळणें माझें कर्तव्य होय.

पद—भूप–त्रिताल.

(दर् दर् तादीम् दीम् तनन०) चालीवर.

करुं नको मलिन मुखचंद्रा ॥ विभवकेंद्रा ॥
चिंतामल विपुल विलेपुनि, धरि मनिं धैर्यकोश ॥ धृ० ॥
तुझें प्रफुल्लित आनन देवो ॥ उद्यां शौर्य मज हरिसें ॥
जें करि वश रणयश ॥ करूं नको० ॥ १ ॥

इंदिरा—आपणाला असं का वाटतं आहे कीं उद्या भीमशौर्याशीं लढाई होईल तेव्हां मी अशीच हुरहुर करीत बसेन! नाहीं बरं! मी पौलोम राजाची मुलगी आहे आणि शैलेश महाराजांची भावी सून आहे. शिवाय,

पद—पिलू–होरी.

(गारि दई लाखनमे०) चालीवर.

प्रेम न माझें जडतें ॥ तुजवरतें ॥ प्रेम न० ॥

जरि असतें तव मन भेकड तें ॥ प्रेम न० ॥ धृ० ॥
विक्रमभूषित माणुस तुजसम ॥ फार मला आवडतें ॥ १ ॥

तथापि अशावेळीं मी आनंदांत कशी राहीन? कारण,

वीरकुलीं जरि झालें तरि भय ॥ स्त्रीस उचित तें घडतें ॥ २ ॥
तशांत तूं मम सर्वस्वचि मग ॥ व्यर्थ कशी बडबडते ॥ ३ ॥

अतुलचंद्र—(तिच्याकडे निरखून पाहून साश्चर्य) इंदिरे, तुझ्या हृदयांत जी विलक्षण कालवाकालव चालली आहे ती मी समजलों. माझी ही अशीच स्थिती झाली होती.

पद—केदारा–त्रिताल.
(तननननना तनना०) चालीवर.

मज गमले ॥ विमले ॥ निकटागतरणजयसमाकुले ॥ धृ० ॥
अवचित मंदालक्षितरीतीं ॥ संध्या आक्रमि दिवसावरती ॥
तैशी नित्यानंदितवृत्ती ॥ हास्यास्पद खिन्नावस्थेप्रति ॥
झाली होती माझी वश ती ॥ निकटागत० ॥ मज गमले० ॥ १ ॥

तेव्हां असें वाटूं लागलें,

पद—ब्याहाग–त्रिताल.

आत्मबलाची गर्वें गणना ॥ अत्याधिक जाहली नसेना? ॥ धृ० ॥ पराभवानादर होइल कां? ॥ श्वस्तनरवि देखिन अंतिम कां? ॥ सेविशील तूं विलापपंका? ॥ शंका उद्भवल्या मनिं नाना ॥ १ ॥

छे, छे! असें होणार नाहीं. परमेश्वर समर्थ आहे. (तिचा हात धरून) अग पण हें काय? रडायला का लागलीस? हीं बघ तुझ्या-डोळ्यांत टिपें.

दिंडी.

चारुललने तव लोचनांबुवाहें ॥
उरस्त्राणा आर्द्रता येत आहे ॥
कपोलासित रमणीय पाटलातें ॥

नष्टवैभव गांजितें निर्दयें तें ॥ १ ॥

असें करूं नये. (तिचे डोळे पुसतो.)

इंदिरा—अतुलचंद्रा क्षमा कर. ही स्त्रियांची स्वाभावीक कोमलता होय. (कांहीं वेळ उसासे टाकून मोठ्या धैर्यानें)

पद—(उद्या वघ जातें) चालीवर.

नयनजलपातें ॥ जाहलें पावकासम तें ॥ धृ० ॥
दैन्यादिक अपद्रव्यें जळलीं ॥ उत्साहादि पवित्र निवळलीं ॥
अंतर्बाह्यें सोज्वळ झालीं ॥ चाल ॥ होउं निजचरितें ॥
अनुरूप एकमेकातें ॥ १ ॥ ह्मणतिल पौलोमाची कन्या ॥
घोर इंद्रि असे भयशून्या ॥ स्फुरण तुह्मां येइल जगमान्या ॥
चाल ॥ भीमशौर्यातें ॥ लावीन डोलवायातें ॥ २ ॥

अतुलचंद्र—शाबास इंदिरे. तुझें विलक्षण स्फुरण पाहून मला वाटतें कीं उद्या खात्रीनें,

साकी.

कांतोदात्त गिरा ज्या विधिनें बोलविली तुजकडुनी ॥
कृपाप्रसादें येइल त्याच्या विजयश्री मज घडुनी ॥
निश्चित समज गडे ॥ अद्भुत लोकोत्तरत्वि घडे ॥ १ ॥

इंदिरे, प्राचीन काळांत क्षत्रियांच्या स्त्रियांची देखील अशी समजूत असे कीं आपला प्रियकर लढाईतून अपेशाचें काळें तोंड घेऊन येण्यापेक्षां यश मिळविण्यास्तव जखमी झाला किंबहुना पतन पावला तर त्यांत त्यांचा मोठा मान झाला. भित्रेपणा त्यांच्या स्वप्नींही नव्हता.

इंदिरा—खरं आहे. आणि त्यांच्या सारखे आपण ही माझे प्रियकर अहांत; शौर्य गाजवालच. आणि मी ही आपल्याबद्दल आत्तांच खात्री दिली आहे. (आलिंगन देते.)

अतुलचंद्र—त्याबद्दल मला आनंद वाटतो. आणखी मला आनंद वाटतो कीं मी त्या परकीय विश्वपालाकरितां हा बाहुयुद्धाचा मार्ग स्वीकारला, कारण तो थोर व प्रामाणिक मनुष्य दिसतो. दुसरी आनंदाची

गोष्ट ही कीं आमचे तीव्रवज्र दादा माझा नेहमी जो उपहास करितात कीं मी प्रतापनगरांत राहून फक्त लिहिणें शिकलों शिपाईगिरीची विद्या मुळींच अवगत नाहीं, तो नाहींसा करण्याकरितां ज्यांचा उत्तम प्रसंग आहे. आणि तिसरी आनंदाची गोष्ट ही कीं एका दृष्टीनें ज्यांचा योद्धा आमचा हितेच्छु असून त्याच्या विरुद्ध मला शस्त्र घ्यावें लागणार हें जरी शोचनीय आहे तथापि दुसऱ्या दृष्टीनें ज्याचा पराभव झाला असतां कीर्ति दिगंतरीं जाईल असा अद्वितीयबलाढ्य भीमशौर्य माझा अभिनंदनीय प्रतिपक्षी आहे. आणि सर्वांत आनंदाची गोष्ट ही कीं आपलें लग्न लागण्यापूर्वींच जर मी पराक्रमी ठरलों तर लग्नसमारंभांत तुला माझ्याकडे विलक्षण संतोषानें व कौतुकानें पहावयास मिळेल. (तिची हनुवटी धरतो. ती हात बाजूला सारते.)

इंदिरा—आपण आपल्या दादांचं नांव घेतलंत त्यावरून आठवण झाली. आज दोनप्रहरीं जेवणाच्यावेळेस ते वाड्यांत नव्हते आणि आता आपण फिरायला निघेपर्यंत ते आले ही नव्हते. ते कुठं बरं गेले असतील? दुसरं, शैलेश महाराजांनीं आपणा दोघांला पहांटे सांगितलं कीं कुठं तरी फिरायला जा कारण त्यांना तीव्रवज्राशीं आणि आपल्या माईसाहेबांशीं मसलत करायची होती. ती काय बरं असेल? खचित सांगतें यांत कांहीं तरी गुप्त आहे.

अतुलचंद्र—या गोष्टीकडे माझें मुळींच लक्ष्य गेलें नाहीं. तुझ्या सुखावह संगतीनें वेळ इतका लवकर पळाला कीं बाबांच्या या कृत्याविषयीं विचार करायला मुळींच फावलें नाहीं. कोमलांगी खरेंच सांग, आजच्या या लांब लांब हिंडण्यानें तूं थकून गेली असशील. गोष्टींत भान न राहतां आपण या पर्वताच्या कड्यावर बरेंच उंच चढलों. इथून वाडा कमीत कमी पांच सहा मैल येईल.

इंदिरा—प्राणवल्लभा, मी थकलें नाहीं. आपणाबरोबर असलें म्हणजे कधींच थकवा येत नाहीं. आपण इथं कांहीं वेळ थांबूं; आणि त्या सखल जागेवरून वाहणाऱ्या ओढ्यावर कसं धुकं जमत आहे तें पाहूं; नंतर वाड्याकडे वळूं.

अतुलचंद्र—कोण भयंकर देखावा हा!

पद—मल्हार–त्रिताल.

(बादरुसे क्या क्या कहिये०) चालीवर.

मलिनप्रभ दारुण वन हें ॥ अन्य असें भूवरि नोहे ॥
घनतिमिरें व्याप्त गुहागण रविकिरणें असुलभ पाहे ॥ धृ०॥
गिरिशृंगें तरु मत्सर करिती ॥ नभचुंबन आधीं घेण्याप्रति ॥
शिला प्रलंबित निर्झर भांडति ॥ कोलाहल हो तत्कलहें ॥१॥
काननकर्ता दैत्य गणावा ॥ नगादि ज्याचा खेळ ह्मणावा ॥
क्रीडान्तीं तो फेंकुनि द्यावा ॥ अस्ताव्यस्त तसें आहे ॥ २ ॥

इंदिरा—आणखी या दाट धुक्यामुळं अंधार लवकरच पडला. चोरांना हीच संधी उत्तम असते. (इतक्यांत काळा पोषाख केलेले हातांत लांब दोर घेतलेले चार शिपाई अवचित त्या दोघांना कैद करितात. अतुलचंद्रास कमरेची तलवार काढावयास फुरसत मिळत नाहीं. इंदिरा किंकाळी ठोकते.)

अतुलचंद्र—दगा! तुमच्या पोषाखावरून मी खास ओळखतों कीं तुह्मी अंगध्वजाकडील आहांत. शैलेश व पौलोम यांच्या मुलांना उपद्रव देण्याकरितां तुमच्या राजानें ही मोठी ठकबाजी केली.

जमादार—जास्त बोलण्याची गरज नाहीं. हा घाट उतरण्याचा रस्ता किती बिकट आहे हें माहीतच आहे. दांडगाई न करितां चालणें ठीक. आपली सुंदर मैत्रीण इंदिराबाईसाहेब यांची योग्य काळजी घेण्यांत येईल. (अतुलचंद्र दांडगाई करितो) अतुलचंद्र, आपण ऐकत नाहीं. राजकुमाराला दोरखंडानें बांधणें ही मोठी लाजिरवाणी गोष्ट आहे, पण इथें तसें करण्याची गरज दिसते. नाहीं तर आपण असें वचन द्या कीं धिंगामस्ती करणार नाहीं.

अतुलचंद्र—बेमान पुंडांनों, वचन देत नाहीं.

जमादार—तर मग आपणाला बांधलेंच पाहिजे. (त्याचे हात पाठीकडे बांधतात. हुस्ताहुस्ती होते.)

इंदिरा—(तें पाहून) दगेखोरांनों तुम्ही आमचं काय करणार?

आमच्या शिपायांपैकीं कुणी जवळ नाहींत काय?

जमादार—हां! भिऊं नका. आम्हाला ठार मारण्याचा हुकुम नाहीं. फक्त पकडून नेणें आहे.

अतुलचंद्र—मूर्खांनों, इंदिरेला स्वतः विषयीं भीती नाहीं, मज विषयीं आहे. पण तिला मुळींच भ्यायला नको. (कांहीं वेळ चालल्या सारखें करतात.)

जमादार—(शिपायांना) अरे, तुह्मी दोघे पुढें चला, कारण हा कडा फार भयंकर आहे. आणि एकजण बाईसाहेबांना पक्कें धरा. दग्याची जागा आहे. संभाळा.

इंदिरा—खबरदार अंगाला हात लावाल तर मेल्यानों! रस्ता मला ठाऊक आहे.

अतुलचंद्र—शाबास इंदिरे. तूं शूर आहेस.

जमादार—चला लवकर. आणि बाईसाहेबांला मदत लागल्यास त्यांचा हात धरा. वाट बिकट आहे.

इंदिरा—माझ्या बोटाला सुद्धां हात लावण्याचं कारण नाहीं. तसं केल्यानं सध्यापेक्षां जास्त फारच तुमच्या ताब्यांत येणार आहे?

जमादार—ठीक आहे. बाईसाहेबांना त्यांच्या मर्जीप्रमाणें करूं द्या.

(कांहीं वेळ घाट उतरल्या सारखें दाखवितात.)

अतुलचंद्र—इंदिरे, दोर पक्का धरला आहेसना? सावधगिरीनें रहा. दोर हेलकावे खात आहेत.

जमादार—आतां आपण अक्षर जास्त बोलणार नाहीं तर बरें.

इंदिरा—मी धोक्यांत नाहीं. मला भय नाहीं.

अतुलचंद्र—(बांधलेले हात हळुच सोडतो व तलवार काढून एका शिपायास मारतो) दोर पक्का धरून ठेव, इंदिरे, पक्का धरून ठेव.

वारकेलेला शिपाई—खून,! दगा,! मेलो! (मरून पडतो.)

अतुलचंद्र—इंदिरे, धीर धर. आतां एक झाला. (आणखी दोघांना मारतो) हा दुसरा, हा तिसरा. (शिपाई ओरडतात.)

इंदिरा—अतुलचंद्रा, अहो अतुलचंद्रा! (घाबरते.)

अतुलचंद्र—कोण भयंकर देखावा हा!

पद—मल्हार–त्रिताल.

(बादरुसे क्या क्या कहिये०) चालीवर.

मलिनप्रभ दारुण वन हें ॥ अन्य असें भूवरि नोहे ॥
घनतिमिरें व्याप्त गुहागण रविकिरणें असुलभ पाहे ॥ धृ०॥
गिरिशृंगें तरु मत्सर करिती ॥ नभचुंबन आधीं घेण्याप्रति ॥
शिला प्रलंबित निर्झर भांडति ॥ कोलाहल हो तत्कलहें ॥१॥
काननकर्ता दैत्य गणावा ॥ नगादि ज्याचा खेळ ह्मणावा ॥
क्रीडान्तीं तो फेंकुनि द्यावा ॥ अस्ताव्यस्त तसें आहे ॥ २ ॥

इंदिरा—आणखी या दाट धुक्यामुळं अंधार लवकरच पडला. चोरांना हीच संधी उत्तम असते. (इतक्यांत काळा पोषाख केलेले हातांत लांब दोर घेतलेले चार शिपाई अवचित त्या दोघांना कैद करितात. अतुलचंद्रास कमरेची तलवार काढावयास फुरसत मिळत नाहीं. इंदिरा किंकाळी ठोकते.)

अतुलचंद्र—दगा! तुमच्या पोषाखावरून मी खास ओळखतों कीं तुह्मी अंगध्वजाकडील आहांत. शैलेश व पौलोम यांच्या मुलांना उपद्रव देण्याकरितां तुमच्या राजानें ही मोठी ठकबाजी केली.

जमादार—जास्त बोलण्याची गरज नाहीं. हा घाट उतरण्याचा रस्ता किती बिकट आहे हें माहीतच आहे. दांडगाई न करितां चालणें ठीक. आपली सुंदर मैत्रीण इंदिराबाईसाहेब यांची योग्य काळजी घेण्यांत येईल. (अतुलचंद्र दांडगाई करितो) अतुलचंद्र, आपण ऐकत नाहीं. राजकुमाराला दोरखंडानें बांधणें ही मोठी लाजिरवाणी गोष्ट आहे, पण इथें तसें करण्याची गरज दिसते. नाहीं तर आपण असें वचन द्या कीं धिंगामस्ती करणार नाहीं.

अतुलचंद्र—बेमान पुंडांनों, वचन देत नाहीं.

जमादार—तर मग आपणाला बांधलेंच पाहिजे. (त्याचे हात पाठीकडे बांधतात. हुस्ताहुस्ती होते.)

इंदिरा—(तें पाहून) दगखोरांनों तुम्ही आमचं काय करणार?

आमच्या शिपायांपैकीं कुणी जवळ नाहींत काय?

जमादार—हां! भिऊं नका. आम्हाला ठार मारण्याचा हुकुम नाहीं. फक्त पकडून नेणें आहे.

अतुलचंद्र—मूर्खांनों, इंदिरेला स्वतः विषयीं भीती नाहीं, मज विषयीं आहे. पण तिला मुळींच भ्यायला नको. (कांहीं वेळ चालल्या सारखें करतात.)

जमादार—(शिपायांना) अरे, तुह्मी दोघे पुढें चला, कारण हा कडा फार भयंकर आहे. आणि एकजण बाईसाहेबांना पक्कें धरा. दग्याची जागा आहे. संभाळा.

इंदिरा—खबरदार अंगाला हात लावाल तर मेल्यानों! रस्ता मला ठाऊक आहे.

अतुलचंद्र—शाबास इंदिरे. तूं शूर आहेस.

जमादार—चला लवकर. आणि बाईसाहेबांला मदत लागल्यास त्यांचा हात धरा. वाट बिकट आहे.

इंदिरा—माझ्या बोटाला सुद्धां हात लावण्याचं कारण नाहीं. तसं केल्यानं सध्यापेक्षां जास्त फारच तुमच्या ताब्यांत येणार आहे?

जमादार—ठीक आहे. बाईसाहेबांना त्यांच्या मर्जीप्रमाणें करूं द्या.

(कांहीं वेळ घाट उतरल्या सारखें दाखवितात.)

अतुलचंद्र—इंदिरे, दोर पक्का धरला आहेसना? सावधगिरीनें रहा. दोर हेलकावे खात आहेत.

जमादार—आतां आपण अक्षर जास्त बोलणार नाहीं तर बरें.

इंदिरा—मी धोक्यांत नाहीं. मला भय नाहीं.

अतुलचंद्र—(बांधलेले हात हळुच सोडतो व तलवार काढून एका शिपायास मारतो) दोर पक्का धरून ठेव, इंदिरे, पक्का धरून ठेव.

वारकेलेला शिपाई—खून,! दगा,! मेलो! (मरून पडतो.)

अतुलचंद्र—इंदिरे, धीर धर. आतां एक झाला. (आणखी दोघांना मारतो) हा दुसरा, हा तिसरा. (शिपाई ओरडतात.)

इंदिरा--अतुलचंद्रा, अहो अतुलचंद्रा! (घाबरते.)

अतुलचंद्र--हां, भिऊं नकोस. इकडे ये. (तिचा हात धरतो.)

इंदिरा--(घावरून) मजजवळचा शिपाई मरून कड्याच्या खोऱ्यांत जाऊन पडलासा वाटतो.

अतुलचंद्र--एकच उरला तर मग! त्याच्याही त्रासांतून तुला मुक्त करितों पहा.

राहिलेला शिपाई--नाहीं महाराज, चुकलों. दुष्कृत्याबद्दल माझ्या तिन्हीं सोबत्यांना देहांत शिक्षा योग्य झाली. मला वांचवा. देवानें आपणाला अद्भुत साह्य केलें. (त्याच्या पायां पडतो)

अतुलचंद्र--(तलवारीच्या टोकानें त्याला उठावयास सांगून) अरे दीन आणि भ्याड मनुष्या, मी तुझा प्राण घेऊं इच्छित नाहीं. इथून तूं कसा तरी पळून जा, आणि त्या दगलबाज राजा अंगध्वजाला सांग कीं,

पद--(करुनि धड धड नाद०) चालीवर.

कुकट साहस होय शठसें ॥ तुडविले रिपुकीट जैसे ॥
चूर्ण केले ॥ धृ० ॥ प्रकट होतां निकट मजसी ॥
कूट कपटी मर्कटासी ॥ चंड करितों दंड तुजसी ॥
क्रोधविकलें ॥ १ ॥

कायरे हें कृत्य अंगध्वजाचेंच ना ?

राहिलेला शिपाई--होय सरकार. पण यांतील हेतू मला ठाऊक नाहीं.

अतुलचंद्र--बस, बस. नीघ इथून. (इंदिरेकडे) सुंदरी, लवकर सखल जमीनीवर गेलें पाहिजे. (पडदा पडतो व नंतर असा पडदा उघडतो कीं ती मूर्छा येऊन याच्या अंगावर पडली आहे व हा तिला सावध करीत आहे. ती अंमळ सावध झाल्यावर) धोक्यांतून निघाल्या नंतर आपलें धैर्य व अवधान नाहींसें होऊन शूर स्त्रियांना बहुत करून अशी मूर्छा येते. ही पहा कशी सावध होत चालली आहे. (वर पाहून) हा दुष्टा दुर्बलघातक्या प्रमोहा! दावा साधून तूं माझ्या प्रियेला वश करूं पाहत होतास, पण माझ्या प्रयत्नानें आणि ईशकृपेनें तुझें कांहींएक चाललें नाहीं.

पद—(सुखाशा कांहि०) चालीवर.

प्रमोहा, साधली संधी, महा फंदी ॥
परी मी घातली बंदी, उतर धुंदी ॥ ध्रु० ॥
प्रिया कां लाविना छंदीं अतां, निंदी ॥
करी जो देव आनंदी, तया वंदी ॥ १ ॥

इंदिरा—मला अंमल थकल्यासारखं वाटतं आहे तर आपण वाड्याकडे जाऊं.

अतुलचंद्र—चल लवकर. (लोकांकडे) आमचे दादा घरीं आले की नाहीं, कोण जाणें. त्यांच्यावर असा छापा न पडो ह्मणजे झालें.

[जातात.]

❀ प्रवेश ३ रा. ❀

स्थळ—भीमखिंडीजवळील एक टेकडी.

[काळा पोषाग केलेले सहा शिपाई रंगभूमी वरून जातात. नंतर तीव्रवज्र व भालचंद्र प्रवेश करितात.]

तीव्रवज्र—भालचंद्रा, इतक्यांत इथून कोणी गेलेसें तुला वाटतें काय?

भालचंद्र—नाहीं सरकार.

तीव्रवज्र—नाहीं? (थांबून) कांहीं ही म्हण, काळ्या रंगाचें पण माणसाच्या आकाराचें सरासरी शंभर एक हाताच्या अंतराहून कोणी भरकन निघून गेल्या प्रमाणें मला भासलें खरें. धुकें पडल्या मुळें साफ दिसलें नाहीं. तुला बिलकुल कोणी दिसलें नाहीं?

भालचंद्र—छे सरकार, कांहीं एक दिसलें नाहीं. पण माझें लक्ष्य तिकडे नव्हतें.

तीव्रवज्र—तें कांहींही असो. (स्वतांची तरवार उपसत) अगोदर आपली तरवार बाहेर काढून ठेव. चांगली तरवार फेरण्याबद्दल पौलोम

राजाच्या दरबारांत तूं नुकतेंच उत्तम बक्षिस मिळविलें आहेस.

भालचंद्र—तरवारीची जरूर पडेल असें आपणास खरेंच वाटतें काय?

तीव्रवज्र—देवा शपथ! तुला जितकें वाटत नाहीं तितकेंच मला वाटतें. कारण या धुक्यांतून भरारी मारल्यासारखें कांहीं तरी उडून गेलें खास; मग तें भूत असो अगर एखाद्या खबदाडांत दडून राहिलेलें कोणी मनुष्य असो. आपली तरवार काढून ठेव. आपणावर हल्ला झालाच तर या हत्यारांनीं त्या गुलामांचे मुडदे पाडूं. (कांहीं वेळ चालतात व ऐकलेसें करून हळूंच) होय, शंका खरी होईल. भालचंद्रा, तुला कांहीं चाहूल ऐकूं येत नाहीं?

भालचंद्र—मला वाटतें त्या चोरांची तरवार दगडाला घांसत आहे.

तीव्रवज्र—(त्याच्या हातावर हात मारून) खरें ना? तो बघ पलीकडे डोंगराचा आवडधोबड खडपा; हल्ला तिथून होईलसें वाटतें.

[पडद्यांत मोठ्यानें "वश व्हा नाहीं तर ठार मेलेच समजा" असा शब्द होतो.)

तीव्रवज्र व भालचंद्र—(पडद्याकडे धांवत) हरामखोरानों, आपला जीव वांचवा. हरहर महादेव! (जातात व रक्तानें भरलेल्या तरवारी घेऊन व अंगावर रक्ताचे शिंतोडे उडलेले असे पुन्हा प्रवेश करितात.)

तीव्रवज्र—(भालचंद्राची पाठ ठोकून) वाहवा रे हिम्मत बहाद्दर! तुला जखम तर झाली नाहीं ना?

भालचंद्र—तरवारीचा स्पर्श देखील झाला नाहीं. पण सरकार, त्या सोद्यां पैकीं कोणी जिवंत असल्यास त्यांना अगोदर पाहिलें पाहिजे आणि मानवी धर्माला उचित असें साह्य केलें पाहिजे.

तीव्रवज्र—साह्य? जरूर केलें पाहिजे. त्या घातकी लुच्चांना, या तरवारीच्या लहरीत येईल तसें साह्य केलेंच पाहिजे. (जाऊं लागतो.)

भालचंद्र—हां, हां! हें काय सरकार? मी म्हणतों जे ठार झाले नसतील त्यांना निदान जिवंत तरी राहूं द्या.

तीव्रवज्र—देवा शपथ! ते अंगध्वजाकडले लोक होत. हरामखोर!

याचें फळ त्याला मिळेल. (थांबून) एक-दोन-, माझ्यावर हल्ला करणाऱ्या दोघांनाही मी ठार केलें. तुझ्या हातानें किती मेले?

भालचंद्र—(दुःखानें) फार वाईट वाटतें कीं आज विनाकारण माझ्या हातानें दोन इसम मारले गेले.

तीव्रवज्र—(त्रासानें) तूं दोघांना ठार केलेंस हाच अर्थ ना? मग असा रडक्या सारखा वाकडें तिकडें काय सांगतोस? देवा शपथ, आतां रात्रीं आमच्या जंगलांतील गिधाडें मेजवानीची चंगळ उडवितील; आणि पळालेले एक दोघे सुवर्णगडास जाऊन अंगध्वजाला आपली कहाणी सांगतील तेव्हां त्याला मोठा राग येईल. मौजेची गोष्ट आहे! (हंसतो.)

भालचंद्र—सरकार, या भ्याड छाप्याचा हेतू काय असावा बरें?

तीव्रवज्र—माझा कांहींच तर्क चालत नाहीं. अंगध्वज हा माझा जन्माचा हाडवैरी असल्याकारणानें माझा सूड घेण्याला हीच संधी उत्तम असा हेतू असल्यास न जाणों.

भालचंद्र—पण मला वाटतें छापेखोरांचा इरादा आपले प्राण घेण्याचा नव्हता; नाहींतर पहिल्या धडाक्यासरशीं ते कांहीं तरी करून चुकते खचित. ते सहाजण आणि आपण दोघे,—खरोखर आपल्याला पळता वाट सुधरली नसती.

तीव्रवज्र—अरे पांडित्य करणाऱ्या मूर्खा, प्राण घेण्याचा नसेल तर पकडण्याचा असेल. कोणता का असेना? मात्र याद राखून ठेव—

पद--(कंठ चर चर०) चालीवर.

भीमखिंडीमाजि दडुनी शाठ्य हें अंगध्वजें ॥
करविलें जरि सैनिकांकरिं सूड घेइन जाणिजे ॥
मोठ मोठे गांव जाळुनि राख पाडिन रांगुळी ॥
रक्त प्राशिन नरडिचें मी पौर घेउनियां बळी ॥
सर्वथा विध्वंस करुनी, घोर कोसळुनी रडें ॥
शांत होइन शत्रु येइल दीन जेव्हां मजपुढें ॥ १ ॥

अशी शिकार क्वचित् सांपडते, नाहीं रे? हरिण वगैरेची शिकार हिच्या समोर तुच्छ होत. (मोठ्यानें हंसतो.)

भालचंद्र—छे, छे सरकार. हे शब्द मला ऐकवत नाहींत. आपण इतके क्रूर व अविचारी बनूं नये. कारण,

साकी.

विद्युद्‌बाणें वधति गर्जुनी विरल, परी घन होती ॥
दानशौंड पर्जन्यें जगतीं, तैसे जे युद्धांतीं ॥
रिपुमहि सौम्यकरें ॥ वागविती भट तेचि खरे ॥ १ ॥

अहाहा! या बाबतींत आपले धाकटे महाराज, अतुलचंद्र! कोण त्यांना वाईट म्हणेल?

तीव्रवज्र—(त्याचा कान धरून) मी तुला पुन्हा निक्षून सांगतों कीं त्या भित्र्या कारट्याचें नांव माझ्या समोर घेत जाऊं नकोस. माझ्या अंगाचा नुसता तिळपापड होतो, समजलास? (थांबून) अरे, सुध्या रीतीनें चलायचें असेल तर मजबरोबर वाड्याकडे चल, नाहींतर खुशाल मागें रहा. [जातात.]

❀ प्रवेश ४ था. ❀

स्थळ—भीमाखिंडींतील राजा शैलेशाचा वाडा.

[शैलेश, मंदारमाला व तीव्रवज्र बसले आहेत.]

शैलेश—हें बघ, अतुलचंद्र आणि भीमशौर्य यांचें खड्गयुद्ध न व्हावें येवढ्यासाठींच हा प्रसंग जुळवून आणिला आहे. भालचंद्राला पुढें घालून घेऊन यावयास मुद्दाम तीव्रवज्राला आपले व्याही पौलोम महाराज यांचे गांवीं पाठविलें होतें त्याप्रमाणें तो काम करून आला. आतां विश्वपाल व नेपाल यांचे एकांतांत काय मनसुबे होतात हें बारिक रीतीनें ऐकण्याकरितां भालचंद्रालाच नेमण्याचें कारण विचारशील तर तो फार विश्वासू व त्यांची परकी भाषा चांगली जाणणारा आहे. विश्वपाल व नेपाल यांच्या एकांतातील भाषणावरून जर असें दिसलें कीं ते आश्रय

मागणारे दीन नसून राजा प्रतापसिंहाकडील हेर आहेत तर अतुलचंद्राला भीमशौर्याशीं लढण्याचें कारणच उरलें नाहीं, आणि अनायासेंच तुह्मी व आमची काळजी दूर होईल. तसें न झालें तर,--अग पण हा आलाच.

भालचंद्र—(प्रवेश करून मुजरा करून) महाराज,

पद—कामदाच्या चालीवर.

हेम घासतां प्रस्तरांसि तें ॥
शुद्ध हो तरी फार झळकतें ॥
गोप्य धेकिलें गुप्तरीतिं मी ॥
आश्चर्याहि ते; नसति मुळि कमी ॥ १ ॥

(शैलेश व मंदारमाला आश्चर्यचकित होतात.)

मंदारमाला—बरं पण भालचंद्रा ते काय बोलले हें अक्षरशः सांग पाहूं ?

भालचंद्र—ठीक, माईसाहेब. प्रथम विश्वपाल व नेपाल या स्वामी-सेवकांनीं आपलें गुप्त भाषण ऐकण्याकरितां कोणी लपून बसलेला नाहीं हें पाहून ते बोलावयास बसले. येथें कचाट्यांत सांपडण्या पूर्वीच्या गोष्टी-चा पहिल्यानें त्यानीं उल्लेख केला. त्यांच्या बोलण्यांत खरेपणा व कळ-वळा दिसला. सरकारच्याविरुद्ध एक अक्षर देखिल ते बोलले नाहींत. फक्त एवढेंच ते ह्मणाले कीं "आमच्याविषयीं त्यांचे मनांत पूर्ण संश-याची गांठ पडली आहे आणि ती ते फेडूं इच्छित नाहींत हें आमचें दुर्भाग्य आहे." आणखीं ते बोलले कीं "जर आमच्यावर महाराजांचा भरंवसा असता तर आम्ही पुष्कळ महत्वाचीं गुह्यें कळविलीं असतीं." तात्पर्य, त्यांच्या एकंदर भाषणावरून असें दिसतें कीं त्यांनीं या भीमखिं-डींत पाय दिल्या पासून त्यांचा विनाकारण छळ झाला. शेवटीं आले-ल्या फुकट मरणाचें चित्र डोळ्यासमोर उभें करून त्यांनीं एकमेकांस अखेरचें आलिंगन देऊन गहिवरानें डोळे भरून आल्या कारणानें परस्प-रांकडे टक लावून पाहणें सुरू केलें. तेणें करून माझी मनोवृत्ती वितळली व मला एक हुंदका आला. मला वाटतें कीं तो त्यानीं ऐकला, कारण त्यांनीं एकदम दचकल्यासारखें केलें; आणि भाषण आटोपतें घेऊन ते

ह्मणाले " दोघांचाही प्राण अतुलचंद्रानें भीमशौर्याला जिंकण्यावर अवलंबून आहे. " आणि नंतर ते एकमेकांस रामराम करून अलग झाले, तोंच मी इकडे पळत आलों. (तीव्रवज्र खेरीज करून बाकी सर्व थक्क बसतात.)

तीव्रवज्र—(हंसून) सोंगाची बतावणी तर त्यांनीं हुबेहूब केली. भालचंद्रा, तुझें मन विरघळलें ना? वा:, खासें! अतुलचंद्र आणि तूं,— तुम्हां दोघांचीं मनें मेंढरासारखीं एकधोरणी आहेत. जग किती कावेबाज आहे, त्यांत कशा लबाड्या होतात व त्या उघडकीस आणण्याकरितां कोणते डावपेंच केले पाहिजेत हें साधारण पोरांना जर समजूं लागलें तर जास्त वयाच्या पुरुषांनीं आपली अक्कल उकिरड्यावरच फेंकून दिली पाहिजे. असो. बाबांची तूं हवीतशी समजूत घाल पण वास्तविक असें आहे—

पद—(प्रतिकूल होइल०) चालीवर.

विश्वपालनेपालांचें श्रवण गोप्य केलें ॥
भरंवसा न समजा नच ते मरणमुक्त झाले ॥ धृ० ॥
पाहिलें न तुज जरि त्यांनीं पूर्ण जाणती ते ॥
वेळ जो दिला एकांतीं बोलण्यास तातें ॥
खटाटोप अवघा होता सत्य शोधण्यातें ॥
हेर धूर्त जाणा न असे आजवरि मिळाले ॥ १ ॥

ठरलेली द्वंद्वयुद्धाची दैवी युक्ती जर कां अमलांत आली नाहीं तर आमच्या भीमखिंडींतील लोक राजवाड्यांत गडबड केली असा तर्क करून निःसंशय बंड करतील. (एकीकडे) देवा, या युद्धांत तो कारटा पडला तर बरें होईल.

मंदारमाला—(खोल स्वरानें) युद्धांत तुझ्या भावाचे प्राण बळी पडतील म्हणून भितें; नाहीं पेक्षां माझ्याकडन हरकत नव्हती.

तीव्रवज्र—(हंसून) होय ना? अहा ग आई, तुला आतां मी काय बोलूं? शैलेश महाराजांची बायको या रूपानें पाहिलें असतां तुला हें भित्रें भाषण शोभत नाहीं. दुसरें, आपल्या हातानें आपल्या पायावर

कोणी घोडा पाडून घेईल तर तो कोण थांबविणार? अतुलचंद्र जाणून-बुजून हट्टास चढला होता. तें कांहीं नाहीं. देवा शपथ, लढाई झालीच पाहिजे.

शैलेश—(कांहीं वेळानें उसासा सोडून) तीव्रवज्राचें ह्मणणें बरोबर आहे. आतां हुरहुर करण्यांत हांशील काय? भालचंद्रा, अतुलचंद्राला बोलावून आण. (पडद्याकडे) कोण आहेरे तिकडे? भीमशौर्याला तयारीनें ये ह्मणावें. [भालचंद्र जातो.]

[अतुलचंद्र व इंदिरा प्रवेश करितात.]

अतुलचंद्र—(इंदिरेकडे पाहून आनंदानें)

पद—(शाखा सद्गुण०) चालीवर.

सुवर्णसुंदर केशकलापा पाहुनि सखिच्या शिरीं ॥
वाटे रविकर तिथें कोंडले कांती अनुपम खरी ॥ धृ० ॥
भ्रूकुटि काळी सुरम्य रचिली विधिनें वदनावरी ॥
नेत्रस्फटिकें, चंचलतारा, शुक्लकमल, अलिपरी ॥
नासा सरला, ओष्ठरक्तिमा अरुणासम साजिरी ॥
शुचिरदपंक्ती हश्य सुहास्यें मौक्तिक महिमा हरी ॥
सुप्रसन्न नवयौवन उत्तमगुणमंडित सुंदरी ॥
निजप्रकाशें भीमखिडिला प्रभाविभूषित करी ॥ १ ॥

मंदारमाला—(सद्गदित स्वरानें) बाळा अतुलचंद्रा, ये बैस. इंदिरे तूं ही बैस. (वर पाहून) देवा, या बाळाची ही शेवटचीच भेट तर नसेल ना?

(त्याच्या पाठीवरून हात फिरविते. दोघे बसतात.)

इंदिरा—(सद्गदित) नका, नका माईसाहेब, असलं अभद्र बोलूं!

पद—(अजि शेवटचा०) चालीवर.

तुह्मि नित्य गडे श्लाघ्य अभय वापरतां ॥ या समर्थी कां घाबरतां ॥ जरि मायेच्या मोहें उपहत होता ॥ पथ नाहीं धैर्यापरता ॥ चाल ॥ योग्य

न हें सासूबाई ॥ तनयाचें पौरुष जाई ॥ आवरा दुःख लवलाही ॥ चाल ॥ यश येइल हो शुभवर तुमचा मिळतां ॥ यावरी हरीची सत्ता ॥ १ ॥

(सर्व खिन्न होतात.)

तीव्रवज्र—(एकीकडे) बसा सावकास रडत! तो नांवाचा भीमशौर्य आहे, राजश्रीच्या चिंधड्या तर उडवून देईल. ठीक आहे.

अतुलचंद्र—आई,

पद—(शैवालें युक्त०) चालीवर.

कां धरिशी व्यर्थ माते मजविषयीं दीनता ॥
नच फुटती शब्द वाचें आयासें बोलतां ॥
धैर्याच्या आश्रयानें लोपवि ही खिन्नता ॥
तरि होइन विजयि नोहे वीर्याची न्यूनता ॥ १ ॥

तीव्रवज्र—(टोंचून) "धैर्याच्या आश्रयानें लोपवि ही खिन्नता" पहा, अतुलचंद्रानें कशी तुला अकल शिकविली ती! अग आतां तरी शहाणी हो. आजकाल शाळेचा वारा झोंबला कीं आईबापांना उपदेश करण्याची मुलांना योग्यता आलीच समजा.

भीमशौर्य—(एकदम प्रवेश करून रोखानें) राजाधिराज शैलेश महाराज, लढाईला सुरुवात होण्यापूर्वी मला आणखी एकवार चार शद्ब बोलण्याची परवानगी द्या. काल रात्रीं स्वप्नांत मला विलक्षण चमत्कार दिसला. पहिल्यानें भयंकर काळोख दृष्टीस पडला. असला अभेद्य काळोख मी आजपर्यंत कधींच पाहिला नव्हता. पुढें एकाएकीं ढगावर ढग आदळताहेत असा भास होऊन लखलखणाऱ्या विजांची वृष्टी चालून गांवचे गांव पेटलेसे दिसले. परंतु तो उजेड अंधक होता; त्यानें माझ्या समोरचा काळोख जाऊं शकला नाहीं. इतक्यांत फार उंचावर भयंकर प्रहार झालासा भास झाला त्यासरशीं वर पाहतों तों आकाशाच्या कपाटांचा चुराडा होऊन तेथून उल्कापात होतो आहे. असें झालें तरी ही हा प्रदेश हवा तसा पेट घेईना. अखेरीस वरून कोणी सूर्यनारायणास

लाथ मारून ढकलून दिलें. तो खालीं पडतांच हा प्रदेश सगळा ज्वाळामय झाला व मजसमोरचा काळोख नाहींसा होऊन स्वच्छ दिसूं लागलें. पाहतों तों विक्राळ स्वरूप धारण केलेले प्रचंड राक्षस त्या ज्वाळांच्या सहाय्यानें या वाड्याचा व एकंदर भीमखिंडीचा विध्वंस करताहेत आणि आपण आपल्या मुलाबाळांसह जीव वांचविण्याकरितां धडपडत आहांत व रानोमाळ पळत आहांत असे दिसलें. पण ते राक्षस कोण असावेत हें निरखून पाहूं लागलों तों एक मात्र स्पष्ट दिसला. त्याचें तोंड व बांधा सांप्रत आपल्या येथें असलेल्या विश्वपालाप्रमाणें असून तो बाकीच्या मंडळीवर सेनापतीप्रमाणें हुकूम करीत होता. दुसरीकडे पाहूं लागलों तर एका अतीशय लांबच्या शैलशिखरावर एक मनुष्य उभा असून तो चाललेल्या कत्तलीकडे बोट दाखवून ह्मणतो आहे कीं हा विश्वपालासारखा दिसणारा मनुष्यच या भयानक कृत्याच्या मुळाशीं आहे. पण असें बोलणारा मनुष्य कोण हें मीं ओळखिलें नाहीं. असो. राजा हें सर्व विपरित दिसत आहे, परिणाम ठीक होईलसें वाटत नाहीं. म्हणून म्हणतों या स्वप्नावरून पाहिलें असतां विश्वपाल हा आपला शत्रु आहे व याला ठार करणेंच इष्ट आहे. अतुलचंद्राशीं लढण्यांतच काय अधिक आहे? तें अजून लहानसें पिल्लू आहे. त्याला जिंकणें किंवा मारून टाकणें म्हणजे मोठ्या शौर्याचें काम आहे असें नाहीं; आणि तसें करून ही विश्वपाळ ठार मारला जाणारच. मग लहानग्या अतुलचंद्राचे प्राण कां वांचवूं नयेत? विचार करा, जागे व्हा, नाहींतर अज्ञानपंकांत असेच सडत रहा.

अतुलचंद्र—(त्वेषानें) अरे जा भीमशौर्या, स्वप्नांतील गोष्टीवर बाबा विश्वास ठेवणार नाहींत. लेखी पुराव्यावर ही विश्वास न धरतां तुह्मी लोक डोक्यांत वेड पिकवून त्या निरपराधी पाहुण्याला ठार मारूं इच्छितां! जगांतून आज न्याय बुडाला कीं काय? मला तुम्हीं सर्वांनीं दुर्बल ठरविलें, पण विश्वपाल जर खरा निरपराधी असेल तर आत्तां होणाऱ्या तुझ्या माझ्या लढाईंत परमेश्वर मलाच यश देईल. बस्स, माझें प्रेत भुईवर पडल्या खेरीज विश्वपालाच्या केंसाला धक्का लागणार नाहीं.

तीव्रवज्र—बरोबर आहे. (एकीकडे) भीमशौर्या, याची चांगली चटणी कर.

अतुलचंद्र—(रोखानें)

पद—(मरण गणुनि०) चालीवर.

उलट कधिं न घेइ मी ॥ स्वशब्द जाणिजे वृथा ॥
दारुण समरांगणांत खड्ग घे करी व्यथा ॥ धृ० ॥
चंड शैल कोसळो, प्रचंड सिंधु सळसळो ॥
कसपटासमान होत भीमशौर्य काकथा! ॥ १ ॥

किंवा असें ही असेल--

बाल मी निमित्त हें करोनि टाळिशी रणा ॥
शंकिसी स्वविक्रमा यथार्थ हेंचि सर्वथा ॥ २ ॥

भीमशौर्य—(तलवार काढून) खरा शूर असशील तर आत्तां येशील.

अतुलचंद्र—बाबांच्या हुकुमावांचून?

तीव्रवज्र—(एकीकडे) बाबांनीं तरी आतां कां विलंब लावावा समजत नाहीं.

शैलेश—(सर्वांकडे पाहून) अतुलचंद्रा, नुकत्याच घडलेल्या अंगध्वजाकडील छाप्यामध्यें तुझ्या भावानें व तूं जसें शौर्य दाखविलेंस त्याहीपेक्षां जास्त या प्रसंगीं दाखीव. भीमशौर्या तयार हो. (दोघांचे पवित्रे होतात. कांहीं वेळ गेल्यावर)

भीमशौर्य--अतुलचंद्रा, "हरलों" म्हण, अजून कांहीं झालें नाहीं. आतां दुसऱ्या वारानें मात्र तुझी गर्दन छाटल्यावांचून राहणार नाहीं.

अतुलचंद्र--तूंच खबरदारीनें रहा. (त्याच्या उराकडे दाखवून) त्या जागीं—मी—मघाच तुझा प्राण घेतला असता.

भीमशौर्य--अरे जा बढाईखोर पोरा! (जास्त त्वेषानें लढूं लागतो!)

अतुलचंद्र—पहा, मी पुन्हा बजावतों कीं सावधगिरीनें रहा. क्रोधाच्या आवेशांत तुझे पवित्रे बेशिस्त पडत आहेत.

भीमशौर्य—मुजोरा, शहाणपण मिरवूं नकोस. आणखीं एकदां—

पण हें अखेरचेंच---तुला बजावतों कीं "हरलों" म्हण; कारण आपल्या राजाच्या मुलाला ठार करणें मला दुःखदायक होईल.

अतुलचंद्र—आणि मी ही तुला तिसऱ्यानें सांगतों कीं तुझे प्राण माझ्या हातखंड्यांत आहेत. फडशा पाडीन.

भीमशौर्य—(अतीशय क्रोधानें) अरेरे! या भाषणानें अंगाचा भडका झाला. (चवताळून त्याच्या अंगावर जातो. लढाईत जखमी होऊन मूर्छित पडतो. तीव्रवज्र खेरीज करून सर्व आनंदप्रदर्शक टाळ्या वाजवितात.)

तीव्रवज्र--(एकीकडे) अरेरे! काय झालें हें? यक्षिणीनें कांही फिरविली हेंच खरें. ज्याला मी पाण्यांत पाहतों त्याचा विजय? हरकत नाहीं. "धीर सो गंभीर."

अतुलचंद्र— **साकी.**

मदोन्मत्त मातंग अंकुशें हस्तिप भंगवि जैसा ॥
विशालवपुरिपु असिनें केला पराभूत मी तैसा ॥
ईशकृपें सुखदे ॥ वडिलांच्या आशीर्वादें ॥ १ ॥

(आईबापांच्या पायां पडतो. ते शाबासकी देतात.)

तीव्रवज्र—(त्याचें डोकें पायावर असतांना) हा नमस्कार नव्हे; माझी फजिती आहे. मी याला नेहमीं भ्याड म्हणून चिडवीत असेंना! बरें मूर्खा! (उघड तो उठल्यावर) शाबास, अतुलचंद्रा, खरा शूर आहेस. ये बैस. (तो इंदिरेजवळ बसतो.)

अतुलचंद्र—दादा, माझ्यावर आतां कोप नाहींना?

तीव्रवज्र--(हंसून) छे, छे,! मुळींच नाहीं. (एकीकडे) कोप नाहीं; या असह्य विजयाचे त्याला पंख फुटल्यामुळें आतां प्रकोप झाला आहे.

अतुलचंद्र—(भीमशौर्या जवळ जाऊन व त्याला कुरवाळून)-अरेरे! जबर जखम झाली. बाबा, याला लवकर मलमपट्टी झाली तर हा खचित बरा होईल.

शैलेश—कोण आहे रे तिकडे? (५-६ नोकर लोक डोली घेऊन

घेतात.) याला दवाखान्यांत न्या, आणि वैद्याला सांगा कीं जखम लवकर बरी झाल्यास उत्तम बक्षिस मिळेल. (घेऊन जातात.) तीव्रवज्रा, अतुलचंद्र विजयी झाला तेव्हां ठरल्या प्रमाणें विश्वपाल व नेपाल यांना सोडून द्यावयास काय हरकत आहे?

तीव्रवज्र—आणि ठरल्याच्या विरुद्ध जाऊन त्यांना मारून टाकलें तरी काय हरकत आहे? (दोघे अतुलचंद्राकडे पाहतात.)

अतुलचंद्र--आतां मी काय बोलूं? मात्र संकेत तसा नव्हता.

मंदारमाला—आतां त्यांना हद्दपार करून द्यावं हेंच बरं.

शैलेश—ठीक आहे. असेंच होईल. असो. (उठून) सर्वांना ठाऊकच आहे कीं त्या दुष्ट अंगध्वजानें तीव्रवज्र, अतुलचंद्र आणि इंदिरा यांजवर कसा छापा घातला तो. यांत त्यानें पूर्वील तहाला हरताळ लाविली. त्याबद्दल त्याला शिक्षा झाली पाहिजे; व त्याचीही खात्री असेल कीं आह्मी एक दोन दिवसांत त्याच्यावर चाल करून जाऊंच. तेव्हां त्यानें अटकळलेल्या वेळेच्या अगोदरच त्याच्या किल्ल्यावर भडीमार केला पाहिजे. आमचे व्याही पौलोम यांना खलिता पाठवून साह्य करावयास बोलावून घेतों. चला, तयारीस लागलें पाहिजे. (जाऊं लागतात.)

भालचंद्र—(तीव्रवज्राजवळ हळूच) कां सरकार, धाकटे महाराज भेकड कीं शूर? कशी केली भीमशौर्याची?

तीव्रवज्र—(चिडून) कायरे मूर्खा, गमजा करतोस काय? तुझे कान पाहूं?

अतुलचंद्र—(भालचंद्रास) जाऊं दे रे. (अतुलचंद्र व इंदिरा खेरीज करून बाकी सर्व जातात.) सुंदरी, सर्व कांहीं निभावलें. अंगध्वजाला लढाई देऊन आह्मी लवकरच परत येतों. तों पर्यंत तूं एक कामगिरी माझी अशी समजून बजावली पाहिजेस.

इंदिरा--आतांच मेली एक लढाई झाली नि पुन्हा दुसरी. हें काय बाई? आपण तिकडनं विजयी होऊन येई पर्यंत मला मेलं चैन पडायचं नाहीं. आपण सांगाल तें काम काळजीनं करीन हो, बरीक लवकर याव.

अतुलचंद्र—एक तर.

पद—(सुकुमार असुनि०) चालीवर.

तरवार ॥ निंद्य ही फार ॥ शोणितप्राशी ॥
त्यामुळेंच "रुधिरप्रिया" ह्मणे जन इजशी ॥१॥
निर्भीक ॥ वीर जगिं एक ॥ बोलती लोक ॥
भीमशौर्यासी ॥ मारुनी हिनें आघात शिण-
विलें त्यासी ॥ २ ॥ तो दीन ॥ बंधुजनहीन ॥
वेदनाधीन ॥ सुवैद्यापाशीं ॥ पडलासे सेवित
अनेक उपचारांसी ॥ ३ ॥ मत्प्रेम ॥ इच्छि
तत्क्षेम ॥ ह्मणुनि करि नेम ॥ रुग्णशाळेसी ॥
जाउनी सतत साहाय्य देइ सुहृदासी ॥ ४ ॥

इंदिरा—हें मी अगोदर करीन. [जातात.]

❀ प्रवेश ५ वा. ❀

स्थळ—सुवर्णगड किल्ल्याचा पायथा.

[प्रवेश २ मध्यें अतुलचंद्रानें सोडून दिलेला शिपाई पूर्वींच्याच काळ्या पोषाखांत प्रवेश करतो.]

शिपाई—अरे बापरे! असा शूर पुरुष कधीं पाहिला नव्हता. ते आमचे मिशांवर पीळ देणारे जमादार!—पण आतां त्यांना त्या भीमखिंडींतील खोऱ्यांत श्वापदें खात असतील. ती त्याच्यावर प्रेमकरणारी मदनाची छडी महाधीट बायको बोवा! अंगाला स्पर्श करण्याचें नांव घेण्याबरोबर तिनें डोळे इंगळासारखे लाल केले व नागिणीप्रमाणें फूं फूं करूं लागली. माझ्या तिघां सोबत्यांचे मुडदे पडतांच आपण तर घाबरून जाऊन त्यांना शरण गेलों, आणि त्यांनींही आपल्याला जीवदान दिलें; आणि अंगध्वज महाराजाला असें कळविण्यास सांगितलें कीं तुमचा आमचा सामना होईल तेव्हां या छाप्याचा वचपा निघेल. निघेल वचपा,

निःसंशय निघेल. आमचे अंगध्वज महाराज शूर खरे पण अतुलचंद्राचा धडाका विलक्षणच. अरे पण मी सुवर्णगडच्या पायथ्याशीं येऊन पोंहचलों. तो पलीकडचा राजवाडाच. चला, ही रडकथा राजा अंगध्वजाला सांगावी. [जातो. नंतर कोचावर अंगध्वज बसला आहे व जवळ प्रियंवद नांवाचा एक म्हातारा सरदार खुर्चीवर बसला आहे असा पडदा उघडतो].

अंगध्वज—अरे वा:! प्रियंवदराव, अगदीं लवकर आलांत म्हटलें पाहिजे. बरें कशी काय खबर?

प्रियंवद—" लवकर आलांत म्हटलें पाहिजे "—मी म्हातारा म्हणून म्हणता होय? किंवा माझ्या तोंडा पुरतें बोलता? मला खोटी तारीफ आवडत नाहीं. उशीर लागला असेल तर उशिरां आलों म्हणा, त्यांत काय? आतां बातमी विचाराल तर तो व त्याचा नोकर काळाच्या जबडयांतून सुटून या घटकेला आपल्या राज्याच्या सरहद्दींत आहेत.

अंगध्वज—काय म्हणता? तो शैलेश त्यांना हेर समजत होता ना?

प्रियंवद—आतां काय सांगावें? इथेंच मनुष्य नाइलाज होऊन जातो. अहो महाराज, ही गोष्ट जितकी आपणास अशक्य व चमत्कारिक वाटते तितकीच शक्य व खरी आहे. मी अगदीं त्यांच्या लागावर होतो. चंदनदासाच्या खाणावळीपर्यंत ते माझ्या नजरेच्या टप्प्यांत होते. पुढें दिसेनासे झाले म्हणून मी सरळ हिकडे आलों.

अंगध्वज—मोठी चूक केलीत. तुम्ही आपला घोडा दावला असता तर त्यांना गांठलें असतें.

प्रियंवद—आपण मात्र ढोबळ चूक करता. म्हणें आत्याबाईला मिशा असत्या तर काका म्हटलें असतें. महाराज, माझा घोडा मला आतां दबत नाहीं. म्हातारपण झालें ना!

अंगध्वज—असो. त्यांनीं त्या ठिकाणीं काय नांव धारण केलें होतें बरें?

प्रियंवद—त्याचें नांव विश्वपाल व नोकराचें नांव नेपाल होतें.

अंगध्वज—एकंदरींत मोठें साहसाचें कृत्य झालें.

प्रियंवद—आणि मोठ्या लबाडीचें ही म्हटलें पाहिजे. मनुष्यस्वभाव

कोण विचित्र पहा! भविष्य माहित असून पुन्हा लोक मूर्खपणा करितात ते असे. आतां हा प्रतापसिंह, आपणाप्रमाणेंच एक क्षुल्लक मांडलीक राजा. प्रतापनगरांतील तक्ताधिपति याचा सासरा असून व त्याचा पुढें वारस हाच असून तो त्याला आतां पदच्युत करूं पाहतो आहे, आणि आपल्यासारखे सूज्ञ राजे अशा दुष्कृत्याला साह्य करीत आहेत. केवढी भयंकर महत्वाकांक्षा ही! हा प्रतापसिंह मरावयाचेवेळीं तें तक्त अथवा ती संपत्ति बरोबर नेईल काय? किंवा त्यांचा उपभोग घेण्याकरितां यावच्चंद्रदिवाकरौ जिवंत राहील काय? किंवा तो सार्वभौम झालाच तर मांडलीकत्व जाऊन त्याचें तक्ताधिपत्य आपणास मिळेल काय? कदाचित् मिळालेंच तर तें चिरकाळ राहिल काय? छे, छे, सर्वच अशाश्वत. आणि जर हें जग क्षणभंगुर आहे तर प्रतापसिंहाच्या ऐवजीं विश्वपाल नांव बदलून, नानाप्रकारच्या लबाड्या करून एक गर्ह्य महत्वाकांक्षा साध्य व्हावी म्हणून हजारों शिपायांचे बळी पाडून सहस्त्रावधी सुवासिनींच्या सौभाग्यमंदिरांवर आग पाखडण्यांत काय हांशील आहे?

[इतक्यांत पूर्वींचा काळा शिपाई येतो.]

अंगध्वज—आतां हें स्मशानवैराग्य बस्स होईल. (शिपायाकडे) कायरे, तीव्रवज्राला पकडण्याकरितां पाठविलेल्या शिपायांपैकीं फक्त दोघे परत आले; तुझी कशी काय खबर?

शिपाई—फक्त मीच वांचलों; आणि तोही अतुलचंद्राला शरण गेलों म्हणून.

प्रियंवद—हातांत बांगड्या भरून शरण गेला होतास कीं लुगडें चोळी घालून? अहारे भागूबाई!

अंगध्वज—इंदिरा होती काय त्याजबरोबर?

शिपाई—होय सरकार. ती जेव्हां कोपावली तेव्हां तिच्या चर्येकडे बघवेना.

प्रियंवद—एकूण आपण ही ओं फस् करून आपला काळाकुट्ट वदनचंद्र दाखवायला आलांत म्हणायचें. या असे कोचावर बसा.

अंगध्वज—प्रियंवदराव, त्या दोन्ही मुलांचें शौर्य तुम्हाला ठाऊक

नाहीं. तुझी " घी देखा पर बडगा कहां देखा ". अतुलचंद्र कांहीं बोलला काय?

शिपाई—होय सरकार. असा निरोप सांगितला कीं "तुमचा आमचा सामना होईल तेव्हां याचा वचपा निघेल".

अंगध्वज—ठीक आहे. तूं जा. प्रियंवदराव आतां बसून उपयोग नाहीं. कारण तो कावेबाज शैलेश आपल्या मुलांसह आणि पौलोम राजासह सुवर्णगडावर हल्ला करायला आल्यावांचून राहणार नाहीं. तेव्हां आपणही तयारीस लागलें पाहिजे. माझा पुतण्या वीरसेन याला पत्र पाठवून मदतीस बोलावून घेतों. तो असल्यावर मग फारशी भीति नाहीं. घरचा कारभार संभाळायला त्याची बहीण कमला चांगली दक्ष आहे. दुसरें, प्रतापसिंह आपल्या सरहद्दीवरील चंदनदासाच्या खाणावळीपर्यंत आला आहे तर त्यास ही बोलावून घेतों नाहींतर तो पुन्हा त्यांच्या कचाट्यांत सांपडेल. तीव्रवंत्र, अतुलचंद्र व इंदिरा यांना पकडण्याचा मुख्य हेतू हा होता कीं जर खरें समजून त्या शैलेशानें प्रतापसिंहाचा प्राण घेतला असता तर या तिघांच्या मानगुट्या आपल्या हातांत होत्या. आतां हे दोन्ही छापे फसले तरी हरकत नाहीं, कारण प्रतापसिंह आपल्या राज्यांत निसटून आला. चला तर तयारी करूं. [जातात.]

*** पहिला अंक समाप्त. ***

अंक दुसरा.

प्रवेश १ ला.

स्थळ—नदीतीर.

[अतुलचंद्र व तीन चार शिपाई प्रवेश करतात.]

अतुलचंद्र-- पद—हमीर-एका.

(मंदिड यार आवीवे०) चालीवर.

तिमिर अंतरीक्षाचा लोपे सुखकर शशिकिरण
पांडु जगतिं पडत ॥ धृ० ॥ धवल होति शैल-
कूट, तटिनीप्रवाह वितळे रूप्य खचित ॥ १ ॥
असति तेचि चंदनतरु, छाया विशेष निविडा
व्यक्त करित ॥ २ ॥ चपलदेह हरिणयूथ स्वे-
च्छाप्रवृत्त धांवति काननरत ॥ ३ ॥

भालचंद्र—चंद्रोदयामुळें जवळच हा दुसरा चमत्कार कसा दिसतो पहा, महाराज.

दिंडी.

उपल पडले आडवे मध्यभागीं ॥
नदी तेणें वाहते वक्र, वेगीं ॥
पुढें दुसरा उत्तुंग वारिपात ॥
करी तिजशीं उन्माद, फेन येत ॥ १ ॥

अतुलचंद्र—(घाईनें) धांवारे धांवा. कोणी मनुष्य त्या खवळलेल्या धबधब्यांत गटांगळ्या खात आहे वाटतें. (जातात. नदीचा व धबधब्याचा देखावा. बुडून मेलेला मनुष्य भुईवर पडला आहे. अतुलचंद्र, भालचंद्र इत्यादिकांचें आंग भिजलें आहे असा पडदा उघडतो.)

भालचंद्र—(प्रेताजवळून उठून) सरकार, आटपलें; यानें प्राण सोडला. पण मी म्हणतों नदीचा भयानक देखावा पाहूनही ती उतरून जाण्यास हा कसा धजला कोण जाणे! याचें मरणच ओढवलें, दुसरें काय?

अतुलचंद्र—(दुःखानें) अरेरे! शेवटीं आपला यत्न फुकटच गेला ना! (प्रेताच्या तोंडावर हात फिरवून) शिव शिव!

पद—(मधुरवचें मम०) चालीवर.

नयन खरोखर थिजले बनले प्रस्तरसे ॥ धृ० ॥
प्रेतकळा तनुवरती आली ॥ प्राणज्योती टाकुनि गेली ॥
पंजर, अंडज पळतां, दिसती शुष्क जसे ॥ १ ॥
मरणसमयिंच्या तीव्राक्रोशें ॥ वक्ष जहालें विदीर्ण ऐसें ॥
नच केलें कीं कवणें बाणें छिद्र तसें ॥ २ ॥
काय करूं श्रम निष्फल झाले ॥ सूज्ञ दिसे हा, साहस केलें ॥
मूर्ख ह्मणूं तरि तोही भलतें करिल कसें ॥ ३ ॥

(सचिंत असतो.)

भालचंद्र—(पुन्हा प्रेताकडे पाहून) सरकार, मी खात्रीनें सांगतों कीं या मनुष्याला नदी किती दगेखोर आहे हें माहीत असलेंच पाहिजे होतें.

अतुलचंद्र—कशावरून?

भालचंद्र—या अंधक चांदण्यामुळें प्रथम साफ दिसलें नाहीं; परंतु आतां पाहिलें तर ज्याच्यावर आपण चाल करून जातों आहों त्या अंगध्वज राजाच्या शिपायाप्रमाणेंच याचा पोषाग व लिभास आहे. अर्थात हा या प्रदेशांत राहणारा आहे, आणि म्हणून येथील नदी, नाले याला पूर्ण ठाऊक असावेत हें उघड आहे.

अतुलचंद्र—(साश्चर्य) काय म्हणतोस? (दुरून प्रेताकडे पाहत) हें सर्व जर खरें असेल तर मला वाटतें कीं अशा रात्रीं तो एखाद्या फारच जरूरीच्या कामाला चालला असावा.

भालचंद्र—शिवाय, ज्या जागेवरून हा मनुष्य नदींत उतरला तो भाग वाटसरांच्या वापरणुकींत दिसत नाहीं; त्या अर्थीं त्याचें काम इतक्या जोखमीचें व जलदीचें दिसतें कीं तें साधण्याकरितां या आडवाटेनें

पोहून येण्याचा बेत करून त्यानें नदींत उडी मारण्याचें साहस केलें असावें.

अतुलचंद्र—हे सारे तर्क जर खरे असतील तर यानें जीव धोक्यांत घालण्या सारख्या महत्वाच्या कामगिरीचा आणि सांप्रत जी या अंगध्वजानें आमच्याशीं गडबड चालविली आहे याचा संबंध जुळूं पाहतो, नाहीं बरें ? (टाळी वाजवून) खरेंच सांगतों मित्रांनों हा शिपाई अंगध्वजराजाचें एखादें पत्र त्याचा पुतण्या वीरसेन याजकडे किंवा आणखीं कोणाकडे घेऊन जात असेल; आणि हें जर शक्य असेल तर तें पत्र देखील कुठें तरी याच्या खिशांत सांपडेल; तर तें शोधलें पाहिजे. भालचंद्रा, अशा गडबडीच्या समयीं आपण जर याचें आंग हुडकलें तर आपणाकडे कसला दोष येईल? (सर्व त्याचें आंग शोधतात, एकजण खिशांतलें ओलें पत्र काढून देतो. अतुलचंद्र तें उघडून वाचतो.)

पत्र.

" चिरंजीव राजे वीरसेन यांस अनेक आशीर्वाद. विशेष. हें पत्र पाहतांच तुम्ही आपले तुर्कस्वारांनिशीं सुवर्णगडीं निघून यावें. वेळ येऊन पोंहचला आहे कीं जेव्हां अमुक एका कार्यभागाकरितां त्यास अनुकूल असलेल्या मांडलीक राजेलोकांनीं एकत्र जमून सल्ला मसलत केली पाहिजे. " अमुक एक कार्य भाग " म्हणून लिहिलें तो तुह्मी ओळखालच. ज्याकरितां एवढा खटाटोप चालला आहे तो वीरपुरुष मणितारनगरचा असून सांप्रत सुवर्णगडीं आमचा पाहुणा आहे. त्याच्या व माझ्या विचारानें असें ठरलें कीं हा पक्ष स्वीकारणाऱ्या सर्व मांडलीकांच्या खाणाखुणा एकमेकांस पटल्या ह्मणजे पुढील तयारीस लागणें सुलभ होईल. याचप्रमाणें मी आपल्या इतर मित्रांना पत्रें लिहिलीं आहेत.

" दुसरें, असाच प्रकार घडून आला आहे कीं शैलेश व त्याचा मित्र राजा पौलोम हे दोघेही सुवर्णगडावर चढाई करून येतील. त्या दोघांचें सैन्य मजवर हल्ला करूं लागलें व तुह्मी मदतीस न आल्यामुळें मी एकटाच राहिलों तर त्यांचें सैन्य माझ्या शिपायांना अनावर होईल व दातीं तृण धरून मला शरण जावें लागेल.

" मी कोणत्या स्थितींत आहे हें यावरून स्पष्ट कळेल; व तुम्ही

इकडे येण्याची तावडतोब तयारी करालच. येण्यापूर्वी खालीं लिहिलेली व्यवस्था करावयास चुकूं नये. तुम्ही आपल्या विश्वासू अधिकाऱ्याला दोनशें शिपायांसह भीमखिंडीच्या टोकाशीं लपून बसवून शैलेश आपल्या लोकांसह केव्हां बाहेर पडेल याची पाळत ठेवावयास सांगावी. मला वाटतें त्याची उद्यांची तयारी होईल. भीमखिंड सोडून तो साधारण दूर आला म्हणजे त्या लपलेल्या रिसाल्यानें खिंडींत शिरून शैलेशाच्या वाड्यावर छापा घालून सांपडतील त्यांना कैद करून घ्यावें ह्मणजे लढाईत मी हरलों तरी तहाचे वेळीं आपल्या अटी त्यांना कबूल कराव्या लागतील. पौलोमाची मुलगी इंदिरा हिला कसेंही करून पकडून न्यावें. याचें कारण तुम्ही जाणताच अहांत. ही सर्व व्यवस्था लावल्याबरोबर दोनतीनशें शेलके शिपाई घेऊन तुह्मी मैनाक पर्वताच्या पायथ्यानें सुवर्णसरोवरांत होड्या टाकून किल्याच्या पश्चिमभागानें यावें ह्मणजे शत्रुसैन्याला तुम्ही दिसणार नाहीं.

"समक्ष भेटीअंतीं ही व्यवस्था तुमचेकडून करवून घेण्यापुरती फुरसत नसल्यास्तव हा पत्रविस्तार झाला आहे तरी लिहिल्याप्रमाणें करण्यास हरकत करूं नये. भरंवसा जाणून लिहीलें आहे. कळावें विलंब न करावा हा आशीर्वाद". तारीख...

तुमचा चुलता अंगध्वज.

(पत्र उलटून पाहतो) अरे वाः यावर वीरसेनाचा जबाब आहे. मेलेला शिपाई वीरसेनाला पत्र पोंचवून त्यावरच जबाब घेऊन परत येत होता हें खास. असो काय उत्तर आहे बरें? हं--

"तीο स्वο काकासाहेब. लिहिलेली सर्व व्यवस्था करून येतो. हे विज्ञाप्ती." तारीख...

आपला वीरसेन.

(विचार करून) शिपायांनों,

साकी.

सांपडला वार्ताहर आह्मां अंगध्वज दुर्दैवें ॥

हरण करुनि वस्त्राचें याच्या तनुपरि शव जाळावें ॥
तोंवरि कळवीतों ॥ पितया वृत्त, परत येतों ॥ १ ॥

[जातो. पडदा पडतो. नंतर शैलेश, तीव्रवज्र व अतुलचंद्र उभे आहेत असा पडदा उघडतो.]

शैलेश—हें पत्र अनेक बावतींत खरोखरीच महत्वाचें आहे. एक तर विश्वपाल हा सांप्रत सुवर्णगडास असून तो हेर किंवा प्रत्यक्ष प्रतापसिंह, मणितार नगरचा राजा असावा अशी शंका उद्भवते. दुसरें, " अमुक एक कार्यभाग " म्हणजे राज्यक्रांति, म्हणजे प्रतापसिंहाला प्रतापनगरचा तक्ताधिपति करण्याविषयींची खटपट दिसते.

तीव्रवज्र—देवा शपथ, विश्वपाल हा विश्वासघातकीच ठरतो तर मग. मी पहिल्यापासूनच ओरडत होतों पण ऐकतो कोण?

अतुलचंद्र—त्याबद्दल मला देखील फार वाईट वाटतें.

पद—(लाजवील ही०) चालीवर.

युक्त खरोखर शंका भासे ॥ विश्वपाल शाठ्यें भरलासे ॥ धृ० ॥ शुद्ध जयाचा हेतू गणुनी ॥ भीमशौर्यवपु शस्त्रें चिरुनी ॥ व्यर्थ पाडिलें त्या अपमानीं ॥ तीव्र दुःख हें साहूं कैसें ॥ १ ॥

शैलेश—त्या पत्रांतील आणखीं महत्वाची गोष्ट ही कीं त्यानें वीरसेनाला मैनाक पर्वताच्या पायथ्यानें यावयास सांगितलें. तर रस्त्यांतच त्याचा पाडाव करणें ठीक. पुन्हां दुसरी महत्वाची गोष्ट ही कीं इंदिरेला दोनशें शिपायांचा छापा घालून पकडणें. याविषयीं अतुलचंद्रानेंच मत दिलें पाहिजे.

अतुलचंद्र—ठीक, बाबा.

पद—खमाज-दादरा.

समयोचित जी प्रयुक्ति मानसीं रुळे ॥
वार्ताहरवस्त्रहरण होइ तीमुळें ॥ धृ० ॥
अंगध्वजसेवकसा वेष देउनी ॥

धाडावा निज सैनिक पत्र घेउनी ॥
अंगध्वज कारण जरि नष्टवेष्टनीं ॥
इछिल तरि "तटिनितरणदुर्दशा" जुळे ॥ १ ॥

असें करण्याचा उद्देश बनेल तों पर्यंत रक्तपात न होऊं देतां शत्रूला शरण आणणें. तें कसें हें मात्र सांप्रत विचारूं नये. आपल्या वाड्यावर छापा पडलाच तर तो हटविण्याकरितां पुरेसे शिपाईलोक तेथें आहेतच. त्यांना तावडतोब निरोप पाठवावा म्हणजे ते हुशारीनें राहतील व बाहेरूनच शत्रूला हांकून लावतील. मैनाकपर्वताच्या पायथ्याशीं वीरसेनाचा सामना मला घेऊं देण्याची परवानगी मिळावी कारण तसें न केलें तर रक्तस्राव झाल्या खेरीज राहणार नाहीं.

तीव्रवज्र—नाहीं, देवा शपथ, तसें होणार नाहीं. त्याचा सामना मी घेईन. प्रत्येक गोष्ट तुझ्याच मताप्रमाणें काय म्हणून?

शैलेश—हां, खबरदार भांडशील तर. निकाल माझ्या स्वाधीन आहे. तीव्रवज्रा, सुवर्णगडावर हल्ला करण्याकरितां तूं मजबरोबर रहा. पौलोम तेथें येतीलच. आणि अतुलचंद्राच्या विनंती प्रमाणें त्यानें वीरसेनाचा सामना घ्यावा. बरोबर २०० शिपाई घेऊन जावेत. तें काम आटोपल्यावर आमच्या मदतीस यावें.

तीव्रवज्र—करा तुमच्या तबियतींत येईल तसें! (एकीकडे) हरकत नाहीं कारण तिथें त्या लबाड विश्वपालाचा व नेपालाचा तरवारीनें गळा उतरण्यास मिळेल.

शैलेश—ठरलें तर. चला हें कार्य संपवून पुढें गेलें पाहिजे. (वर पाहून) पांहटेची रात्र झाली वाटते.

अतुलचंद्र—खरेंच बाबा.

पद—छायानट–त्रिताल.

(नवलि लाडली राधिका०) चालीवर.

चंद्र चमूपति चालला ॥ तो ॥ तारागण ही सेना घेउनि, गगना सोडुनि अस्तनगाला ॥ धृ० ॥ तेथिल प्रासादेश रवीतें ॥ हांकुनि घेइल विश्रांतीतें ॥

जेवि सबल तुह्मि जिंकायातें ॥ रिपुसि निघाला ॥ चंद्र० ॥ १ ॥

[अतुलचंद्र एकीकडून व बाकीचे दुसरीकडून जातात.]

प्रवेश २ रा.

स्थळ—मैनाक पर्वताचा पायथा.

[शिपाईगिरीच्या पोषाखांत वीरसेन प्रवेश करतो.]

वीरसेन—(पडद्यांत शिपायांना सावकाश चालण्याचा आदेश करून) सुवर्णगड आतां जवळ राहिला. दोन चार तासांत आम्ही पोहचूं.

पद—(तस्करा हातीं०) चालीवर.

मार्ग आक्रमिला ॥ "सुवर्णगड" किल्ला ॥ दिसे-
लचि चढतां या शैला ॥ सरोवर आहे ॥ मध्यें
विस्तीर्ण ॥ तरणा हवा प्रहर पूर्ण ॥ भेटतिल
द्वीपें ॥ सलिलपथें नाना ॥ जिथें उपवनें विहा-
रांना ॥ पोंचतां दुर्गी ॥ पाहुनि आह्लाला ॥
होइल सुख नृपरायाला ॥ १ ॥

[शिपाई प्रवेश करतात व त्यांची थोडी कवाईत होते. कवाईत होत असतांना गातात.]

पद—(माझी राणी घुबडावाणी०) चालीवर.

सुवर्णदुर्गावरी पोंचतां शत्रू कीटासम तुडवूं ॥
कंठनाळ कापुनी तयांचें डोकें गगनीं मग उडवूं ॥धृ०॥
किल्ल्याच्या विक्राळ खंदकीं ढकलुनि कांहींना बुडवूं ॥
आपटुनी डोक्यांवर डोकीं कांहीं शिरनारळ फोडूं॥चाल॥
ऐकुनी अशा ॥ शत्रुदुर्दशा ॥ होति सर्वशा ॥ तत्स्त्रिया
पिशा ॥ चाल ॥ हाहाःकार ॥ होइल फार ॥ १ ॥

(शिपायांस उभें करितो. इतक्यांत अकस्मात् अतुलचंद्र वीरसेनाला व त्याचा प्रत्येक शिपाई तरवार काढून वीरसेनाच्या प्रत्येक शिपायाला तरवार काढण्याची फुरसत न देतां कैद करतो.)

अतुलचंद्र--खबरदार शस्त्राला हात लावशील तर! तुकडेच पाडीन. (तरवार उगारतो. वीरसेन दबून खालीं बसतो त्याचप्रमाणें त्याचे शिपाईही बसतात.) चला, आपलीं हत्यारें आमच्या स्वाधीन करा. (वीरसेन व त्याचे शिपाई तसें करतात.)

वीरसेन--(रागानें उठून) हा जुलूम कां म्हणून?

अतुलचंद्र—माझे वडील व अंगध्वज यांच्यामध्यें लढाई जुंपली आहे म्हणून शत्रूशीं एकोप्यानें राहणाऱ्या राजे लोकांचें साह्य रस्त्यांत तोडून टाकणें आम्हाला भाग पडलें आहे.

वीरसेन--अहारे भ्याड मुला! छापा घालून आम्हाला पकडतोस काय? खरा शूर होतास तर दोन हात यायचे होतेस. धिःकार, धिःकार!

पद--झंपा.

पाहिजे तव अशी केलि गणना ॥ तात जरि वीर
शैलेश राणा ॥ धृ० ॥ निंद्य कापट्य हें भीरु
तुज ठरवितें ॥ शूर लपुनी न करि युद्ध केव्हां ॥
उदरिं सिंहाचिया सिंह नच जन्मला ॥ जन्म-
ला जंबु करि कूट रचना ॥ १ ॥

अतुलचंद्र—

मानितो मात्र तृणतुल्य निर्भत्सना ॥ जिंकिलें
संप्रती वीरसेना ॥ धृ० ॥ शत्रुचें साह्य विच्छे-
दणें न्याय्य हें ॥ समजतो चतुर रणशास्त्रवेत्ता
॥ रक्तपाताविणें रोधिलें तव बला ॥ उपकृती
नाहिं का ही कृतघ्ना ॥ २ ॥

वीरसेन--तुम्ही आमचें काय करणार? भीमखिंडींत नेऊन कैद करून ठेवणार? किंवा "हे शिपाई परत घेऊन जातो, अंगध्वजाला साह्य करीत नाहीं" असें अश्वासन दिल्यास भरंवसा ठेवणार?

अतुलचंद्र—(विचार करून) तुमचें म्हणणें कबूल करूं पण अटीवर.

वीरसेन—ती कोणती?

अतुलचंद्र—ती ही. वीरसेनाच्या शिपायांनीं व वीरसेनानें अतुलचंद्राच्या शिपायांशीं व अतुलचंद्राशीं पोषाखांची अदलाबदल करावी. आमचे हलके पोषाख आहेत आणि तुमचे भारी आहेत.

वीरसेन--धोक्यानें पकडलेल्या शिपायांना ही अट मोठी अपमानास्पद आहे. आणि मी खचित सांगतों कीं ही पोषाखाची अदलाबदल दुसरें एखादें कृष्णकारस्थान तडीस नेण्याकरितांच योजलेली आहे.

अतुलचंद्र--असलें उद्धट भाषण ठीक नाहीं. तें मोजकें व सभ्य असलें पाहिजे. नाहीं तर भीमखिंडींत तुह्मां सर्वांना पाठवून देऊन अंधारकोठडींत कोंडून ठेवीन आणि लढाई संपल्यावर बाबा परत घरीं गेले ह्मणजे त्यांच्या खुषीस येईल तशी तुमची विल्हेवाट लागेल. शैलेश महाराज किती कडक आहेत हें प्रसिद्ध आहेच.

वीरसेन—(दांत ओठ चावून पण निराश होऊन स्वगत) जास्त बोलून काय उपयोग ? प्रत्येक मनुष्य कैदी झाला आणि त्यांच्याजवळ दुहेरी शस्त्रें झालीं. (उघड) अतुलचंद्रा, तुझी अट कबूल करणें भाग आहे. (पोषाखाची अदलाबदल होते.)

अतुलचंद्र—(ती संपल्यावर) वीरसेना, आतां आपापल्या वाटेनें गेलें पाहिजे. “ शैलेश व अंगध्वज यांच्या युद्धांत हात घालणार नाहीं ” हें वचन पक्कें ना? संभाळ, जर का तें मोडलेंस तर—

वीरसेन—वीरसेनाचा शद्ब म्हणजे ब्रम्ह्याची रेघ. तो असा विश्वासघातकी नाहीं. [आपल्या शिपायांसह पुटपुटत जातो. दुसरीकडून अतुलचंद्र शिपायांसह जातो. पडदा पडतो. पुन्हा भालचंद्र व अतुलचंद्र प्रवेश करितात.]

अतुलचंद्र—वीरसेन व त्याचे शिपाई यांचीं हिसकलेलीं शस्त्रें त्या गुहेंत सुरक्षित राहतील ना?

भालचंद्र—होय, सरकार—तीं फार जपून ठेवलीं आहेत.

अतुलचंद्र—बरें, होड्यांविषयीं कसें काय?

भालचंद्र—२०० शिपायांना २० होड्या बस्स आहेत. या मैनाकपर्वतांतील अस्सल मोठ्या पेडांचीं झाडें तोडून होड्या करण्याचें काम सुरु आहे. त्या लवकरच तयार होतील.

अतुलचंद्र—त्या तयार झाल्या म्हणजे फक्त हा तलाव उतरून जाणें राहिलें. अंगध्वजाला आपल्या पोषाखावरून वीरसेन मदतीस आला असें वाटेल.

भालचंद्र—होय सरकार. (पडद्याकडे पाहून) आपल्या भीमाखिंडीपेक्षां अंगध्वज राजाचा प्रदेश किती मनोहर आहे पहा.

पद—(पंचतुंड०) चालीवर.

चित्रोपम हा भव्य सुशोभित सुवर्णगड किल्ला आहे॥
सभोंवरी सृष्टीची रचना सुंदर पाहुनि मन मोहे॥
दीर्घदेह हा मैनाकाद्री प्रफुल्ल तरुकुसुमें राहे॥
अधोभागिं विस्तीर्ण सरोवर भोग्य होतसे गंधवहें॥१॥

अतुलचंद्र—तूं खरें बोलतोस.

पद—देस–पंजाबी ठेका.

(नादिया बरना भई०) चालीवर.

शोभा विविध दिसे॥ स्थल दुसरें न असें॥ ध्रु०॥
दुर्गांगांचें प्रतिबिंब जलीं॥ खेळतसे बघ कैसें॥१॥
स्फटिकामध्यें पाच शोभते॥ द्वीप सरोवरिं तैसें॥२॥
उदक अलिकडे भूमि पलिकडे॥ दुर्ग मधोमध बैसे॥३॥

[जातात.]

प्रवेश ३ रा.

स्थळ—सुवर्णगड किल्ल्याचा एक उंच भाग.

[अंगध्वज दुर्बिण घेऊन पाहतो आहे. प्रियंवद जवळ उभा आहे.]

अंगध्वज—(उदासपणें) छे बोवा! आतां कांहीं जयाची आशा दिसत नाहीं.

प्रियंवद—कां? पाहूं? (त्याच्या हातांतली दुर्बिण घेऊन पाहतो) अबब! महाराज, केवढें थोरलें भगदाड हें! तो तीव्रवज्र तो. तोफांच्या भडीमारानें त्यानें किल्ल्याच्या तटाला भोंक पाडलें. ठीक झालें. मग आशा नाहीं ती कोणती?

अंगध्वज—मूर्खच अहांत. त्या भोंकावाटे शत्रूचे शिपाई आंत शिरणार नाहींत का?

प्रियंवद—मग मला मूर्ख कां ह्मणतां? मी तरी तेंच ह्मणतों कीं चांगली सोय झाली. शत्रूचे शिपाई जर आंत शिरूं शकतील तर आपले ही शिपाई त्याच भोंकावाटे शत्रूवर हल्ला करायला बाहेर पडूं शकतील. मग ही केवढी सोईची गोष्ट आहे बरें? (पुन्हा दुर्बिणीनें पाहून) ते पहा महाराज आपले शिपाई फोडलेल्या भिंतीचें रक्षण करण्याकरितां कसे धांवताहेत!

अंगध्वज—अं:! त्यांच्या धांवण्यांत कांहीं अर्थ नाहीं; आतां आपल्याला जयाचें चिन्ह नाहीं. [गडबडीनें एक शिपाई येतो.]

शिपाई—सरकार, वीरसेन येत आहे.

अंगध्वज—अरे, कोणीकडून?

शिपाई—सरोवराच्या पश्चिम किनाऱ्याकडून.

अंगध्वज—(आनंदानें) तर मग सुवर्णगड बचावला ह्मणायचा. २०० शिपायांनिशीं वीरसेन एकदां किल्ल्यावर येऊन पोंहचला कीं शत्रूला हां हां म्हणतां हांकून लावूं. (शिपाई जातो. दुर्बिणीनें दुसरीकडे पाहूं लागतो.) होय, त्या दुष्ट शैलेशाच्या तडाख्यांतून सुवर्णगड बचावला खास. ज्यापेक्षां वीरसेन या दिशेनें येत आहे त्यापेक्षां शत्रू पूर्वेकडून लढताहेत हें त्याला खचित माहीत असलें पाहिजे.

प्रियंवद—तर मग निःसंशय तो आपल्या साह्याकरितांच येत असला पाहिजे. मागलें वैर तो विसरला वाटतें.

अंगध्वज--(पाहून) तो पहा वीरसेन पिछाडीच्या होडीवर उभा आहे. तो त्याचा रंगेल पोषाख, ते झळकणारे दागिने, व तो लोंबणारा छानदार शिरपेंच!

प्रियंवद—त्याचे २०० शिपाई किल्ल्याचें रक्षण करूं शकतील काय?

अंगध्वज—त्याचे तेवढे शिपाई कित्येक दिवस शत्रूला खात्रीनें दाद लागूं देणार नाहींत. आणि त्यानें मागाहून फौज मागविलीच असेल. तात्पर्य, आतां भय म्हणून उरलें नाहीं. (खिशांतला रुमाल काढून उंच हात करून हलवितो व हातानें रामराम करतो. मोठ्यानें ओरडून) वीरसेना तुझें स्वागत असो. प्रियंवदा, मी दिलेल्या मानाचा स्वीकार करण्यास्तव वीरसेन शिरपेंच काढून खुणावीत आहे, पाहिलेंस का? माझ्याशीं झालेलें मागील भांडण तो खात्रीनें विसरला बरें. पहा तो आतां जवळ येत चालला.

प्रियंवद--(निरखून पाहून साशंक) हे वीरसेनाचेच शिपाई काय? कारण हे जर तेच असतील तर त्यांची आंगचीं लक्षणें बिलकुल बदललीं म्हटलें पाहिजे. त्यांचा ठेंगणा बांधा, उभे राहण्याची धाटी, शरीराचा भुरकट वर्ण आणि स्वरूप, सर्वच पालटलें.

अंगध्वज--ही शंका मलाही येते. पण निःसंशय वीरसेन अगदीं निवडक माणसें घेऊन आला आहे म्हणून ते सगळेच उंच दिसतात.

प्रियंवद—असेल बोवा कदाचित्. परंतु जर त्यानें उंच उंच माणसांचीच निवड केली तर त्याबरोबर त्यांचे चेहेरेमोहरे ही बदलविण्याची तजवीज केली कीं काय? चमत्कार वाटतो.

अंगध्वज—तथापि शेवटल्या होडीवर उभा आहे तो वीरसेनच. त्याच्या पोषाखावरून म्हणतों ऐवढेंच नाहीं तर त्याचा तो सडसडीत उंच बांधा व अंगाचा सतेजपणा किती मनोहर आहे! खरोखर या गोष्टीचा उलगडा करून तो आपली खात्री करून देईल. त्या पहा होड्या फारच जवळ आल्या. (दोघे खालीं उतरतात.)

प्रियंवद--(पडद्याकडे पाहून) वीरसेन खालीं मान घालून कां बरें येत आहे? [खालीं मान घातलेला व हातांत नागवी तरवार

असलेला अतुलचंद्र व बरेच शिपाई प्रवेश करितात.]

अंगध्वज—वीरसेना, ये; तुझें स्वागत असो. (अतुलचंद्र चेहरा वर करतो.) दगा! (तरवार काढूं लागतो.)

अतुलचंद्र--खबरदार! हल्ला करण्याची गरज नाहीं. तुम्ही आमचे कैदी आहांत. (शिपाई त्या दोघांना वेढतात.) भालचंद्रा, यांना बिलकुल हालचाल करूं देऊं नकोस. मी दुसरीकडे जातो. [कांहीं शिपायांसह जातो. पडदा पडतो.]

प्रवेश ४ था.

--◁:=::=:▷—

स्थळ--किल्यांतील दिवाणखाना.

[पडद्यांत मोठ्यानें "ऐका शिपायांनों ऐका. खबरदार दांडगाई कराल तर."]

श्लोक--शार्दूलविक्रीडित.

झाला विक्रम दाखवोनि रिपुला शैलेश राजा जयी॥
दुर्गाध्यक्ष तसेच सैनिक बहू नेलेत कारालयीं ॥
पुत्राच्या विनतीस मानुनि नृपें आदेश केला असा॥
"शस्त्राघात करूं नये नर कुणी हीं दंड्य राहो कसा" ॥१॥

[अतुलचंद्र व तीव्रवज्र प्रवेश करतात.]

तीव्रवज्र—अरे लुचा अतुलचंद्रा, सोदेगिरीनें ही पोषाखाची अदलाबदल करून क्षणांत वाहवा करून घेतलीस आं! आम्ही तोफांचा मारा केला याची कोणीच तारीफ करीत नाहीं!

अतुलचंद्र—दादा, लढाईंत तुला बिलकुल दुखापत झाली नाहीं हें पाहून फारच आनंद वाटतो; आणि किल्ल्याच्या तटावर हल्ला करतांना तूं सिंहासारखा पराक्रम गाजविलास हें मी आतांच ऐकलें. पण दादा,

इतक्या घाईनें कुठें जातो आहेस?

तीव्रवज्र—ते विश्वासघातकी विश्वपाल व नेपाल यांना शोधण्याकरितां. त्या हरामखोरांना सूर्यास्तापूर्वी मारून टाकण्याविषयीं मी फार हावरा झालों आहें. (दांत ओठ चावतो.)

अतुलचंद्र--(गरीबीनें) हां, हां! दादा, बाबानीं आत्तांच जाहीर करविलें आहे कीं "शस्त्राघात करूं नये नर कुणीही दंड्य राहो कसा".

तीव्रवज्र—मी बाबांची आज्ञा मोडणार, व त्यांना ठार करणार. तूं काय म्हणतोस पुढें? (पडद्याकडे) चला शिपायांनों, आपलें काम करूं.

अतुलचंद्र—दादा, असें करूं नकोस. मी पदर पसरून मागतों कीं बाबांचा--आपल्या राजाचा—हुकूम मोडूं नकोस.

तीव्रवज्र—कां पण? जर तो राजा तुझ्यासारख्या बाईलतोंड्या पोरट्याचें म्हणणें ऐकूं लागला तर त्याच्या वडील राजपुत्रानें आपला अमल बजावलाच पाहिजे. (पडद्याकडे) चला शिपायांनों, शौर्य गाजवा, चला.

अतुलचंद्र—ते तरी आपल्या राजाचा हुकूम मोडतील काय?

तीव्रवज्र—अरे दुष्टा, वडील भावापेक्षां आपला अधिकार जास्त समजतोस काय? नाहीं, देवा शपथ, भाऊ जरी असलास तथापि माझ्या कारभारांत हरकत करशील तर जमीनदोस्त करून टाकीन; याद राखून ठेव. चला शिपायांनों, माझी आज्ञा ऐकली पाहिजे. [शैलेश येतो.]

शैलेश—कसला धिंगाणा मांडला आहेस तीव्रवज्रा? कोणाला चला म्हणतोस? माझा हुकूम मोडण्याविषयींची तुला शरम? तूं काय समजतोस? नीच, चालता हो इथून! शिपायांनों परत चला. अतुलचंद्रा, तूं ही जा. उगीच हुजत करण्यांत काय हांशील? विश्वपाल व नेपाल यांना कैद केलें आहे. [निरनिराळ्या वाटेनें जातात. दुसरा पडदा उघडतो. अतुलचंद्र दुःखाकुल येतो.]

अतुलचंद्र—दादाची पुन्हा इतक्यांत भेट होईल काय?

पद--(तव मुख निरखुनि०) चालीवर.

तिळभर मजवर सुखकर कृपा न ॥ प्रियवचन न कधि गणि अरिसमान ॥ धृ० ॥ ज्येष्ठ स-

होदर निष्करुण असा मजविषयीं कां जाहला ॥
सांग देवा कळत न कलुषितमानसनिदान ॥१॥

(गुडघे टेकून डोळे लावून घेतो. इतक्यांत तीव्रवज्र तेथून जाऊं लागतो त्याला एकदम धरून) दादा, दादा, माझ्याविषयीं तुझ्या मनांत इतकें वाईट कां बरें? विश्वपालाला ठार मारण्याच्या कामांत मी अडथळा केला व तितक्यांत बाबा येऊन रागें भरले म्हणून कीं काय? ही हवी तर क्षमा मागतो.

तीव्रवज्र—त्या बद्दल आणि हजारों गोष्टीं बद्दल रागावलों आहें. (चोहींकडे कोणी नाहीं असें पाहून स्वगत) आतां याच्याशीं स्पष्ट बोलायला कांहीं हरकत नाहीं. इथें कोणीच नाहीं. (उघड) अतुलचंद्रा, तूं मला ग्रहण लावलें आहेस. मी दिवसानुदिवस फिक्का पडत चाललों आहे. होय, देवाशपथ, तूं जें जें काम करतोस त्यांत मला हाणून पाडणें, हाच तुझा इरादा असतो. बस्स, आतां मधें बोलूं नकोस; मी काय बोलतो तेवढें चांगलें ऐकून ठेव. कारण ह्या पुढें ह्या गोष्टी मी आपल्या पोटांत दडपून ठेवण्यास समर्थ नाहीं. तुझें इंदिरेवर प्रेम आहे ना?—तसेंच, अगदीं तस्सेंच माझें ही आहे.

अतुलचंद्र—(चमत्कारीक वृत्तीनें) दादा, तुझें प्रेम?

तीव्रवज्र—(भयानक मुद्रेनें) होय माझें, तीव्रवज्राचें. कां नसावें? पुरुषाचें मन हरण करण्या इतकी ती रमणीय नाहीं काय? तिच्यावर कोणी प्रेम करूं नये काय? ठीक. तर मग, माझें तिजवर प्रेम आहे. होय माझेंच; जो मी दुसऱ्याच्या डोळ्यांत अगदीं शृंगारव्यसनशून्य दिसतों. माझें मन तिच्यावर आहे. ती म्हणजे मंजुळ बोलणारी पण जराशी फडफडणारी कोकिळा आहे. तिला चिरडणें एका क्षणाचें काम. मी तुला सांगतों ऐक. माझी नजर तिजवर आहे, आहे. परंतु तुझें ही प्रेम तिजवर आहे आणि तिचें तुजवर आहे, मजवर नाहीं. इथें तूं मला हाणून पाडलेंस. पुन्हा, प्रतापनगरांतील शिष्ट समाजांत राहून संपादन केलेल्या तुझ्या विलासी रिवाजाचा व मर्दपणाचा पगडा या आमच्या कठोर व रानटी स्वभावाच्या लोकांवर आपोआप बसतो आणि आमच्या-

तील नावाजलेले पाषाणहृदयी देखील तुझी रंगेल मुद्रा पाहून वितळून जातात. इथें आणखीं माझ्या डोक्यावर तूं चढाई केलीस. पुन्हा, या लढाईंत घडून आलेल्या गोष्टी तुला महापराक्रमी योद्धा ठरवितात. होय अतुलचंद्रा, तूं खरोखरच तसा आहेस; आणि मी नाकबूल जात नाहीं. पण इथें पुन्हा माझा पाणउतारा तुझ्यामुळेंच नव्हे का?

अतुलचंद्र—(रडत रडत) दादा, तुझ्या पायां पडतों, असल्या क्रूर शब्दांचा प्रहार करून माझी छाती फोडून टाकूं नकोस. (गुडघे टेकून पायां पडतो. तो त्याला झुगारून देतो.)

तीव्रवज्र—देवाशपथ! माझ्या सारख्या जंगली मनुष्याला तुझ्याशीं कसें वागावें याची अक्कल तर हवी होती ना? अहारे कुकुबाळ, रडायला लागलें आहे. तथापि तुझी तरफदारी करायला जगापुढें तुझीं महत्कृत्यें उभीं आहेत. परंतु त्या पिचक्या डोळ्याच्या जगाला तूं यावेळीं कसा बायकासारखा धायधाय रडतो आहेस हें दिसतें काय? तो भीमशौर्य—शक्तिवानांपेक्षां शक्तिवान, शूरांपेक्षां शूर—त्याला तूं जिंकलेंस व आपला प्रताप स्थापन केलास. आमच्या सैन्याच्या अगाडी चालणाऱ्या पलटणीची हुकमत मिळविलीस, अंगध्वजाचा पत्रव्यवहार पकडलास, व ह्या गोष्टींत तुला दैव अनुकूल झालें. वीरसेनाला फासांत धरलेंस व आपली युद्धचतुरता दाखविलीस; आणखीं आतां रूपांतरानें होडींत येऊन सुवर्णगड एकदम हस्तगत केल्यामुळें आपल्या कुशाग्रबुद्धीच्या व पराक्रमाच्या कीर्तींत भर घातलीस. या सर्व गोष्टींमुळें तूं अतिशय गर्विष्ठ झाला आहेस, मनुष्य ह्मणजे झाडाचा वाळला पाला तूं समजतोस, आणि मला तर हाताच्या मळाप्रमाणें लेखतोस. या सर्व कारणांमुळें मी तुझा—स्पष्ट बोलूंच दे—मी तुझा द्वेष करितों.

अतुलचंद्र—हर हर परमेश्वरा! कोण भयंकर प्रसंग हा! दादा, दादा, तेवढा क्रूर शब्द परत घे रे. दादा, त्याचा खरा अर्थ तुला समजला देखील नसेल बरें! वडील भावानें द्वेष करणें,—अरेरे! वडील भाऊ ह्मणजे बापासमान, आणि तो द्वेष करणार,—सोसवत नाहीं. दादा माझा द्वेष करीत नाहीं असें मला सांग.

तीव्रवज्र—पण मी धडधडीत करतों नी असें कसें सांगूं? खरो-खरच, मी तुझा मोठा द्वेष करतों, अतुलचंद्रा. पण तूं जर शहाणा असशील तर ही गोष्ट आपल्या पोटांत दडपून ठेव, आईबापांच्या देखत काढूं नकोस, कारण मी साफ नाकबूल होईन; आणि मी कबूल झालों नाहीं ह्मणून माझा द्वेष अणुमात्र तरी कमी असेल अशी गैरसमजूत करून घेऊं नकोस. तुझ्याविषयीं माझें मन कसें आहे हें एकांतीं सांगावयास मिळालें याबद्दल मला मुळींच वाईट वाटत नाहीं. तुझा माझा अंतर्गत संबंध काय आहे हा खुलासा आतांच झाला. तूं मला "दादा" म्हणून तोंडभर हाक मार आणि मी या जिभेनें "ओ" देईन, पण मनांतून देणार नाहीं, कारण मी तुझा पुरा द्वेष करतों. आणि तूं असाच आडवा येत जा कीं या हातानें तुझा केव्हां तरी खून झालाच समज. हुशारीनें रहा. (अतुलचंद्र मूर्छित पडतो. त्याच्या छातीवर पाय देऊन.)

पद—(वाटे सर्वथा०) चालीवर.

ऐको क्रूर रजनी प्रतिज्ञा ॥ धृ० ॥ अतुलचंद्रें
मला ग्रासिलें तरि पहा ॥ चिडविलें विषधरा
भैरवा पन्नगा ॥ दंश करुनी तया शीघ्र वधितों ॥१॥

[पडदा पडतो.]

* दुसरा अंक समाप्त. *



अंक तिसरा.

प्रवेश १ ला.

स्थळ—अरण्यांतील एक निर्जन झोपडी.

इंदिरा—बाई कुटीरे, त्या दुष्ट अंगध्वज राजानं मला धरून नेण्याकरितां भीमखिंडीवर हल्ला केला म्हणून विश्वासू भीमशौर्याबरोबर तुजजवळ लपून राहण्या करितां आलें, तरी तूं आमची चांगली काळजी घेतलीस. असली काळजी तरी कोण घेतं?

पद—(त्या मदन मनोरम०) चालीवर.

ओसाड भयंकर जागीं साहाय्य मागण्या आलें ॥
नृपसदना सदृश बाई आतिथ्य परंतु जहालें ॥ धृ० ॥
उपकाराची उतराई तव कैसी होइल नकळे ॥ चाल ॥
उद्भवे मानसीं शंका ॥ अशी निर्जन कां ॥ चाल ॥
असासि तूं शाले ॥ स्थल तुजसम मज नाढळलें ॥ १ ॥

(पडद्यांत पाहून) भीमशौर्या ये. खरंच गडे, तूं होतास म्हणूनच बचावलें, नाहीं तर त्या मेल्या अंगध्वजाच्या शिपायांनीं मला पकडून नेलंच असतं.

भीमशौर्य—(झोपडीचा दरवाजा बंद करीत असतां स्वगत) आतां हिला आपला हेतू कळवावा. (उघड) इंदिरे, रस्त्यांत कोणी वाटसरू भेटेल या भयानें तुला या एकांत झोपडींत आणलें. लबाडीचें पांघरूण मी आतां फेंकून देतो. माझ्या मनांत काय आहे हें चर्येवरून ओळखलेंस काय? म्हणतात कीं स्त्रिया मोठ्या चतुर असतात!

इंदिरा—(उठून) हो बाजूला; कां? ऐकत नाहींस का?

भीमशौर्य—(रागानें) मूर्खे, तूं काय समजतेस? या हृदयांत ज्वालामुखीसारखे प्रदीप्त झालेले विकार तुझ्या असल्या पुळपुळीत शद्बांनीं विझून जातील काय?

इंदिरा—(धैर्य धरून) भीमशौर्या, तुझी आजपर्यंतची वर्तणूक बघितली म्हणजे तूं इतका नीच असशील असं वाटलं नव्हतं. सांग, लवकर सांग—मोठे उपकार होतील,—अंगध्वजाचा छापा, लढाई वगैरे सारं खोटंच कीं काय?

भीमशौर्य--अगदींच खोटें.

इंदिरा—(आनंदानें) देव तुझं कल्याण करो!

पद—(जाहले आभार०) चालीवर.

वाटते चित्तास शांती संप्रती ॥ होति ज्याची
काळजीनें सुस्थिती ॥ धृ० ॥ अतुलचंद्राला वरो
विजयांगना ॥ दुःख नाहीं सवत होवो मजप्रती
॥ १ ॥ सौख्यलहरी खेळती हृदयार्णवीं ॥
फेडुं कैशी थोर तुझि ही उपकृती ॥ २ ॥

भीमशौर्य—होय, लबाडी केली. पुण्यपुरुषाला तिटकारा येईल अशी ओंगळ लबाडी केली. यापेक्षां परवां मरून गेलों असतों तर हा डाग लागला नसता. परंतु त्याचें काय आतां! माझ्यांत मोठा पालट झाला आहे, भयंकर पालट झाला आहे. परवां मी मनुष्य होतो, आज दैत्य आहे. मी विश्वासू होतो, प्रामाणिक होतो, कुत्र्या सारखा कह्यांत राहणारा होतो, पण आतां अधम व विश्वासघातकी बनलों आहे; एक मालक खेरीज करून कोणत्याही मनुष्याच्या अंगाचा चावा घ्यायला सिद्ध झालों आहे. कदाचित् थोडक्याच काळांत इतका बेइमान होईन कीं त्याच्याही अंगाचा लचका तोडण्यास मी मागें पुढें पाहणार नाहीं. पण अशी एक गोष्ट आहे कीं ती मी प्राण गेला तरी करणार नाहीं; आणि ती ही—शत्रूला आपल्या जन्मभूमींत शिरूं देणें. भीमखिंडीवर छापा घालण्याकरितां येणारी अंगध्वजाची पलटण डोंगराच्या माथ्यावरून मी पाहिली. परंतु ती मशकाप्रमाणें चिरडली जाणार अशी खात्री होतांच

तडक वाड्यांत गेलो आणि माईसाहेबांजवळ खोटी नाटी बातावणी करून तुला इथें घेउन आलों. आतां मालकिणीशीं लबाडी केल्याबद्दल परमेश्वर मला क्षमा करो, पण माझा मतलब साधण्याकरितां असें करणें भाग पडलें त्याला मी काय करणार?

इंदिरा—(भयानें) पण बाबा तुझा मतलब तरी कोणता? कां बरं मला छळतोस?

भीमशौर्य—(तिच्याकडे रोखानें पाहून) मतलब कोणता? तूं खरोखरीच खुळी आहेस काय? नाहीं, नाहीं; कारण स्त्रियांचा चाणाक्षपणा एकदम नष्ट झाला ह्मणावें लागेल. कोणता, कां व कशामुळें हें सर्व तूं जाणतेस. थांब, विचार कर. परवांपर्यंत भीमशौर्य लोकांत कसा नावाजत होता? अजिंक्य, अजिंक्य. या कीर्तिशिखरावरून कोणी त्याला ढकलून दिलें? कोणी अपमानाची धूळ चारली? कोणी त्याच्या टाळक्यावर ही आग पाखडली? स्वप्नावर विश्वास न धरतां कोणी त्याला मनमान्या ठरविलें? पोरी, त्या कसाबाचें नांव तुला मीच सांगितलें पाहिजे काय? ऐक तर मग,—तो तुजवर प्रेम करणारा अतुलचंद्र होय.

इंदिरा—अरेरे! ज्याचा तूं एकनिष्ठ सेवक आहेस त्या तुझ्या राजाचा तो मुलगा.

भीमशौर्य—हो, हो, माझ्या राजाचा मुलगा. परंतु आतां त्याचें विषारी नांव घेतलें ह्मणजे जिभेला फोड येतात, तो शब्द ऐकला ह्मणजे छातींत कट्यार भोंसकल्या सारखें होतें. तथापि माझी त्यावर इतकी प्रीति होती कीं त्याजकारितां मी बळी पडलों असतो. प्रत्यक्ष द्वंद्वयुद्धामध्यें विरोधविकारांनीं माझी चित्तवृत्ती कुंठित झाली होती; (अंगाला शिरशिरी आणून) अरेरे, तसल्या लढाईत देखील तो मला लागट शब्द बोलला.

इंदिरा—छे, छे, अतुलचंद्राचा असा स्वभावच नाहीं.

भीमशौर्य—काय तूं ही असेंच ह्मणतेस? खुशाल ह्मण. पण भीमशौर्य आतां पहिला राहिला नाहीं. त्याच्या हृदयांत फक्त काळकूट

भरलें आहे; आणि तें सूड, सूड, सूड.

इंदिरा—(घाबरून) हाय, हाय! या अनाथ, दीन स्त्रीवर सूड? आईग!

पद—(जन्म कां वृथा०) चालीवर.

स्वभावतां असा न तूं असाधु, खल खरोखरी ॥ धृ०॥
दिससि अप्रियाकृती ॥ प्रिय परंतु तव कृती ॥
कीर्ति चहुंकडे अशी प्रसिद्ध भूतळावरी ॥ १ ॥
वैररूप पन्नगासि ॥ फुकट दिलें बिल उराशिं ॥
धांवत फूत्कार करुनि दंशण्या स्त्रियेवरी ॥ २ ॥

भीमशौर्य—होय, स्त्रियेवर—तुझ्यावर.

इंदिरा—माझ्यावर कां बरं?

पद—(वसुनि कोणती०) चालीवर.

हस्त जोडुनी करी अनाथ याचना तुला ॥
मनोविकारमिश्रणासि दावि चाळुनी मला ॥धृ०॥
घातुका न मी खरीच निरपराधि, निर्मला ॥
असा मदीय दंड्य दोष कोणता विलोकिला ॥ १ ॥

भीमशौर्य—कोणता दोष? तूं त्याचा प्राण आहेस हाच दोष. त्यानें माझी पायमल्ली केली. जिवंत असून मारला गेलों. त्याचप्रमाणें तुला भ्रष्ट करून इथून परत पाठविलें म्हणजे त्याचें ही नाक कापल्यासारखें होईल. खरें ना? तर मग—

इंदिरा—(दीनपणें) नको, नको, दया कर, दया कर. तुझे नुसते शद्ब ऐकून मी घाबरलें. मला वांचीव, पायां पडतें. (तसें करते.)

भीमशौर्य—(स्वगत)—मना, आतां वितळून उपयोग नाहीं. मग पहिल्यानेंच असें करायचें नव्हतेंस. (उघड, मनगट धरून तिला उठवीत) हीं सोंगें पुरे कर. हें पाषाणहृदय आहे. (श्वास सोडून हलक्या स्वरानें) सुंदरी, हावेळपर्यंत मी सूड घेण्याच्या विचारांत होतों. आतां मात्र कामाग्नीनें अंगाचा भडका झाला आहे. (इंदिरा किंकाळते,

बाजूला सरते व दोन्ही हातांनीं डोळे झांकून घेते) काय माझा तिरस्कार करतेस? (थांबून) पण तूं त्या बाईलतोंड्यावर प्रीति करतेस. आणि तो तसा असून ही आजिंक्य भीमशौर्याचा त्यानें पराभव केला. हां, इथेंच तर बाण झोंबतो. तो जर माझ्यासारखा उंचापूरा व दांडगा असता तर मी त्याची तारीफ केली असती आणि कोणत्याही लढाईमध्यें आह्मां दोघांची जोडी मोहऱ्यावर राहती. पण त्याचा तो बायकोसारखा नाजूकपणा—हीच तर मोठी शरमेची गोष्ट आहे. धिःकार, धिःकार असो त्या लोकापवादावर. (इकडे तिकडे फिरतो व तडफडल्यासारखें करून हलक्या पण लांबवेळ टिकणाऱ्या धापा टाकतो. इंदिरा भिते पण धैर्यानें जवळ जाऊन करुणस्वरानें म्हणते.)

इंदिरा—भीमशौर्या, तूं सिंहासारखा दिसतोस. सिंहासारखाच उदार हो ना? (तो थांबतो, तिच्याकडे टक लावून पाहतो पण तोंडावाटें बोलणें फुटत नाहीं.) ओढून चंद्रबळ आणून घोर कर्म करुं पाहतोस पण तुझा हा स्वभाव नव्हे. या क्रूरपणाच्या कवचाचें आंत सद्गुणरूप सोन्याचे कण आहेत ते तुला निव्वळ दुष्ट होऊं देत नाहींत.

भीमशौर्य--(मोठयानें) तुला हें कसें कळत नाहीं कीं मनुष्य जितका उदार तितकाच प्रबळ सूड घेणारा, जितका उत्तम मित्र तितकाच कडवा शत्रू असूं शकतो.

इंदिरा--(विनयानें) पण असला खरोखरच तुझा स्वभाव नाहीं.

भीमशौर्य—(घाईनें) खरोखरच तूं चुकतेस. सूड घेण्याविषयीं मी फार भुकेला आहे. तथापि माझ्या मनाला द्रव नाहीं असें नाहीं; आणि म्हणून मी तुजसमोर दोन गोष्टी ठेवतों; कोणती ही उचल.

इंदिरा—(आशेनें) बोल, बोल लवकर; देव तुला सुबुद्धि देवो!

भीमशौर्य—हां! यावरून मला तुझी कीव आली असें मात्र समजूं नकोस. देवाची शपथ, सूड तर घेणारच, कारण मला आतां भीमखिंडींत तोंड दाखवायचें नाहींच. तर ऐक. एक तर मी इथून सरळ सुवर्णगडास जातों, अतुलचंद्राच्या विश्वासू नोकराप्रमाणें त्याच्या शेजारीं लढाईत राहतों पण तो युद्धांत निमग्न आहे अशी संधी साधून या तरवारीनें त्या-

चा कंठनाळ चिरून टाकतों.

इंदिरा—(दीन स्वरानें) आयाइग! हें फारच घोर कृत्य बरं! अरे देवा! मी स्वप्नांत आहे काय? (डोळे झांकते.)

भीमशौर्य—(ओरडून) नाहीं, जागीच आहेस, आणि मी बोलतों हें खरें आहे. ही एक गोष्ट झाली. दुसरी तुला माहीतच आहे. लवकर विचार कर तर मग. तुला आपली खोटी करून घ्यावयाची नसेल तर अतुलचंद्राला ठार मारायला सांग; जर त्याला वांचवायचें असेल तर आपणा दोघांचें आलिंगनरूपानें तो कामदेव ऐक्य करो.

इंदिरा—(थक्क उभी राहते व हात जोडून रडत रडत) असा पाषाणहृदयी होऊं नकोस. दोन्ही अशक्य गोष्टी आहेत; मला वांचीव, आम्हां दोघांला वांचीव.

भीमशौर्य—बस्स. या दोन गोष्टी,—लवकर जबाब पाहिजे.

इंदिरा—सूड घेण्याकरितांच तूं हावरा आहेस ना? तुला रक्तपातच पाहिजेना? ठीक. तुझी तरवार दे; आणि तिचीच शपथ घेऊन जर तूं सांगशील कीं अतुलचंद्राच्या केंसाला ही धक्का बसणार नाहीं तर ती तरवार मी आपल्या उरांत तुझ्या देखत खुपसून घेतें. (त्याची तरवार घेऊं पाहते.)

भीमशौर्य—छे, छे, तुझ्या रक्ताची मला भूक नाहीं. बस्स! दोन्ही गोष्टी समोर आहेत, बोल लवकर.

इंदिरा—(निराश होऊन) तुझें मन पालटत नाहींच ना?

भीमशौर्य—नाहीं, नाहीं. जबाब, पटकन् जबाब पाहिजे.

इंदिरा—(उराशीं हात बांधून व नासाग्र दृष्टी लावून) आपल्या अंगांतले सर्व दुष्ट विकार एकत्र करून चेतवून घे आणि अशा रीतीनं आपली बोहारी वासना तृप्त करून घे. सद्गुणी अतुलचंद्राला त्रास न देण्याविषयींचं आपलं वचन राख म्हणजे झालं. (धाडकन् भुईवर पडते. भीमशौर्य आलिंगन देणार इतक्यांत एक समंध दोघांच्या मधून जातो.)

भीमशौर्य—(भयभीत होऊन) हां! चुकलों, क्षमा कर; शुद्धीवर आलों. पतिव्रतेला भ्रष्ट करीत नाहीं. काय तुझ्या मागें येऊं?

कुठें? (कांहीं पावलें त्याच्या मागें जातो.) अरे, हा दिसेनासा झाला. तूं मला दुष्ट कृत्यांतून वांचविलेंस म्हणून तुझे आभार मानूं दे. (गुडघे टेकून मनांत आभार मानतो. इंदिरा शुद्धीवर येते, व भीमशौर्याकडे पाहून चकित होते.)

इंदिरा—(तोंडांत बोट घालून) अगबाई, याला पश्चात्ताप झाला वाटतं.

अंजनी गीत.

चर्या याची कां पालटली ॥ खेद, सुबुद्धी वदनीं बसली ॥
संकटवेळा गमते टळली ॥ गूढ कळेना हें ॥ देवा ॥ १ ॥

भीमशौर्य—इंदिराबाई, भिऊं नकोस. तुझी हेलना केली याबद्दल मला अत्यंत पश्चात्ताप होत आहे. ऐक. तूं गैरसावध पडली होतीस त्या वेळेस मी तुझ्या अंगाला झोंबणार होतों, आपले हात देखील पुढें केले होते; परंतु तितक्यांत एक भयंकर आकृति माझ्या समोरून गेली. तिनें आपली फिकट व विक्राळ मुद्रा माझ्यावर इतक्या रोखानें फेंकली कीं मी घाबरलों, खाडकन् शुद्धीवर आलों, आणि गुडघे टेकून देवाची प्रार्थना करूं लागलों. इंदिराबाई, असल्या हवेंत खेळणाऱ्या आकृती मला कधीं कधीं दिसतात हें तुला ठाऊक आहे. असो, माईसाहेबांप्रमाणें तूं ही माझी आई हो व हे नीच अपराध पोटांत घाल. (तिच्या पायां पडतो.)

इंदिरा—एकूण तुला शिक्षा मिळाली तर? पण हें काय असेल बरं?

पद—(प्रियकर माझे भ्रात०) चालीवर.

वनदेवीनें मज जाणुनिया साह्यहीन अबला ॥
तारायास्तव पाठविला का पुण्यदूत अपुला ॥
आपत्राणाशेचा नव्हता तंतु खरा उरला ॥
मरणोन्मुखजनमुखांत सहसा सुधाकुंभ स्रवला ॥१॥

दुसरं काय समजावं? हे वनदेवी,

दिंडी.

प्रार्थिते मी उपकारबद्ध बाई ॥

विपत्कालीं घेत जा कृपाछायीं ॥
जरी नसली ओळखी तुझी कांहीं ॥
स्त्रीस स्त्रीचा अभिमान सहज येई ॥ १ ॥

भीमशौर्या, घडलेल्या गोष्टीबद्दल तुला खरोखरच पश्चात्ताप झाला असेल तर माझा रागही त्या प्रमाणानं कमी झाला असं समज; आणि विचारतें त्याचं खरं उत्तर दे. या झोंपडींत निर्भयपणानं विश्रांती घेणं ठीक का?

भीमशौर्य—नाहीं. इथें एक ठक व त्याची म्हातारी राहत असते. त्यांना मी लांच देऊन बाहेर लाविलें होतें.

इंदिरा—तर मग आतां इथं क्षणभर देखील थांबायचं नाहीं. चल जाऊं आपण. [जातात. दुसरा पडदा उघडतो. पुन्हा प्रवेश करतात.]

भीमशौर्य—इंदिराबाई, हा भीमखिंडीचा दरवाजा. इथें मी आपणाला शेवटचा प्रणिपात करतों.

इंदिरा—भीमशौर्या, माझ्यावर भरंवसा धरीत नाहींस काय? तुझा राजा आणि बाकी सर्व मंडळीकडनं तुला क्षमा करवतें; कां घाबरतोस?

भीमशौर्य—बाई, माझा गुन्हा असला गचाळ आहे कीं कोणीही त्याची क्षमा करणार नाहीं.

इंदिरा—अरेरे, असं बोलूं नकोस. कारण जिनं वास्तवीक क्षमा करूं नये ती मी जर क्षमा करते आहें तर बाकीचीं माणसं सहज करतील. चल आपण घरीं जाऊं.

भीमशौर्य—नका बाईसाहेब आग्रह करूं. मी इत:पर भीमखिंडींत पाय देणार नाहीं,—एक परचक्र खेरीज करून; आणि त्यावेळीं आपल्या वृद्ध राजाकरितां बळी पडण्यास धांवत येईन.

इंदिरा—होय ना? मग सांग पाहूं, तुझा वृद्ध राजा असल्या एकनिष्ठ व बलाढ्य सेवकाला कसा जाऊं देईल?

भीमशौर्य—छे, छे, हें काळें ठिकर तोंड त्याला कसें दाखवूं? लढाईंत पडलेलें माझें प्रेत फक्त त्याला दिसेल. शिवाय "अजिक्य"

म्हणून जी माझी कीर्ति होती ती नष्ट झाली; आतां तोंड दाखविण्यांत काय अर्थ?

इंदिरा—विनंतीला ऐकत नाहींस तर तुला आतां हुकूमच करायला हवा.

भीमशौर्य—विनंति किंवा हुकूम कांहींएक करूं नका, पदर पसरतों; कारण मला नाहीं म्हणणें भाग पडेल. माझा निश्चय कायमचा झाला. भीमखिंडींत हें काळें तोंड दाखविणार नाहीं, एक परचक्राची वेळ खेरीज करून. आणि परमेश्वर असा प्रसंग केव्हांही न आणो. इंदिराबाई, हा शेवटचा प्रणाम घ्या. शूर व तरुण अतुलचंद्राशीं तुमचा विवाह फार आनंददायक होवो. अतुलचंद्र आतां माझा शत्रू राहिला नाहीं. तुमच्या करितां त्याच्याविषयींचा माझा अकस उरार्डीत कोंडून मारून टाकला; तो पुन्हा कधींच जन्म घेणार नाहीं. इंदिराबाई, तुमचें सदैव कल्याण असो. इथून वाड्यापर्यंतचा मार्ग तुम्हाला सुखकर होवो. त्या दिव्य स्वर्गलोकांतून एखाद्या अप्सरेनें उतरून हें मलिन भूमंडल ज्या प्रमाणें देदीप्यमान करून टाकावें त्याप्रमाणें आपल्या लावण्यानें ती अंधकारमय भीमखिंड प्रकाशित करा. इंदिराबाई, द्वंद्वयुद्धाच्या दिवसाच्या अधल्या रात्रीं जें मला अपूर्व व भयाण स्वप्न पडलें तें मृगजलाप्रमाणें खोटें ठरो एवढेंच नाक घांसून देवापाशीं मागणें आहे. (दुसरीकडे पाहून) हे परमप्रिय जन्मभूमिके, ही तुझी माझी अखेरचीच भेट समज. ज्या प्रमाणें पाडसाला गाईची अत्यंत आवड असावी त्याप्रमाणें मला ही तुझी आहे व मरे पर्यंत राहील. दऱ्याखोऱ्यामुळें लोकांना तूं कशीही भयप्रद ऐस, पण मला आनंद देणारी आहेस. जर असा वाईट प्रसंग आला कीं कोणी कृत्रिम शत्रू तुला जर्जर करीत आहे तर माझे आवडते शैलेश महाराज व त्यांचा वंश यांच्या बरोबर मी ही प्राणास मुकण्यास सादर होईन. आणि मेल्यानंतर माझीं हाडें गोळा करून गंगेंत शिरविण्यापेक्षां तुझ्या स्मशानांत गाडलीं जातील तर माझ्या आत्म्याला जास्त सुख होईल. माझ्या थडग्यावर फुलांच्या माळा, गुलाल, बुका व उदकाडी जाळल्यापेक्षां डोंगराच्या डगरीवर असणारें दाट गवत वापलें तर त्याला जास्त

शांती मिळेल. ठीक आहे. येतों तर आतां. जन्मभूमिके, बोल, उत्तर दे; अथवा कां म्हणून उत्तर देशील? मी महापापी, चांडाळ, कृष्ण-कारस्थानें करणारा! यमपुरींतले सगळे नर्क एकत्र करून एक नवीन तयार केला तरी या दुष्टात्म्याच्या पापांचें क्षालन होईल काय? छे, छे! जर खरोखरच माझ्या हृदयांत होणारी कालवाकालव कळवळा येण्या जोगी असती तर हे पर्वत, ह्या नद्या—यांना वाचा फुटली असती, आणि शोकानें थबथबलेल्या माझ्या भाषणांचें कांहीं तरी सांत्वन करते. असो. दुर्भाग्य माझें! (इंदिरेकडे) इंदिराबाई, माझ्या दुष्कृत्याबद्दल तुह्मी मला सर्वथा क्षमा करणें दुरापास्त खरेंच; परंतु एवढीच प्रार्थना करितों कीं त्याकडे जरा सौम्य दृष्टीनें पहा. हा काळतोंड्या शेवटचा प्रणाम करून चालला. [भरकन् जातो.]

इंदिरा—(पडद्यांत पाहून) गेला, पार निघून गेला, अगदीं दिसेनासा झाला. दैवगती कोण विचित्र? तीन दिवसांत—असं—याच्या हातनं? ग्रहाचाराचा फिरका असा आहे!

पद—(मन माझें०) चालीवर.

दैवानें सीमा करुनी मित्राचा छल बहु केला ॥
पाषाणासम जरि हृदयें अश्रूचा स्राव निघाला ॥धृ०॥
नयमार्गा चुकवुनि ज्यानें कुपथानें नेलें त्याला ॥
दुष्टग्रह कोठुनि नकळे आला तो फसव्या मेला ॥
शोकाच्या ज्वालांनीं हा देह किती करपुनि गेला ॥
वैतागें पीडित सज्जन पुनरपि परि येतो कसला ॥१॥

[जाते.]

※ प्रवेश २ रा. ※

स्थळ—सुवर्णगड किल्ल्यांतील एक कठडा.

[खुर्चीवर तीव्रवज्र बसला आहे.]

तीव्रवज्र—भीमशौर्यानें इंदिरेला फसवून नेलें ही बातमी कळतांच तहाचें काम लगबगीनें संपवून बाबा भीमखिंडीकडे निघून गेले. भीमशौर्य एवढा सुशील, मग हें असें कसें झालें? माझा ही तिजवर डोळा होता म्हणून वाईट वाटतें. पण एका हिशेबानें बरेंच झालें म्हटलें पाहिजे; कारण त्यांत अतुलचंद्राची नाचक्की झाली ना? असो. अंगध्वजराजाकडून लढाईच्या खर्चाबद्दल तीन लाख रुपये यावे असा करारनामा लिहून घेतला आहे. हा खर्डा सांप्रतची युक्ति फसलीच तर उपयोगी पडेल. विश्वपाल व नेपाल हे या किल्ल्यांतून पळून गेले; त्यांना पकडण्याकरितां बाबांनीं आह्मां दोघांना इकडेस ठेविलें आहे. या राज्याच्या सरहद्दीवर वाटसरांच्या सोईकरितां असणाऱ्या खाणावळींत ते दोघे आहेत अशी खबर हेरांनीं मला कळविल्याबरोबर त्यांना हुबेहूब अंगध्वजाच्या सहीचें एक पत्र पाठवून तेथून हुसकावून तर लावलेंच. आणि अतुलचंद्र व भालचंद्र त्यांना पकडण्याकारितां तिकडेसच गेले आहेत हें कळतांच अंगध्वजाचे ४० शिपाई फितवून त्यांना त्या चंदनदासाच्या खाणावळी भोंवतीं गराडा घालायला लाविलें आहे; आणि अशा रीतीनें अतुलचंद्राला ठार मारून टाकण्याचें योजिलें आहे. पण हें कृत्य आटोपण्यापूर्वींच मी भीमखिंडीस जाणार, कारण कोणालाही माझा संशय न आला पाहिजे. ज्याच्यामुळें ही सगळी गडबड उडून गेली त्या विश्वपालाला मीच अखेरीस पळविलें ही गोष्ट निंद्य खरीच, पण स्वार्थाकरितां तसें केलें तर देवानें कां दोष द्यावा आणि असल्या दोषाला जुमानतो कोण?

पद—(सुखोपभोगा०) चालीवर.

व्यूहाची ही सुंदर रचना झाली येथवरी ॥
कार्यभाग साधतांचि होइल चिंता सर्व दुरी ॥
जन वंदो वा निंदो मजला, पर्वा कोण करी ॥
शंखध्वनि लोकें केला तरि अर्थी स्वपथ धरी ॥१॥

तेव्हां त्याच्या छातीवर पाय देऊन उच्चारलेल्या शब्दांची पुनरावृत्ति

करायला मला आतां काय हरकत आहे? [दुसऱ्या अंकांतील "ऐको क्रूर रजनी प्रतिज्ञा" हें पद ह्मणतो व जातो.]

✻ प्रवेश ३ रा. ✻

स्थळ—चंदनदासाची खाणावळ.

[अतुलचंद्र व भालचंद्र प्रवेश करितात.]

अतुलचंद्र—चंदनदास काय बोलला तें पुन्हां एकदां सांग पाहूं?

भालचंद्र—तो ह्मणाला भीमखिंडीकडे परत जाण्याकरितां इंदिराबाईसाहेब व भीमशौर्य सकाळीं येथें उतरले होते. त्या वेळीं बाईसाहेबांची मुद्रा उद्विग्न, निस्तेज व क्षीण दिसत होती.

अतुलचंद्र--आश्चर्याची गोष्ट!

पद--शंकरा–त्रिताल.

(दिर् दिर् तननन नादेरेता दीम्०) चालीवर.

**हें उमगत मजसि न गूढ ॥ सांगशी चमत्कृति
सकल हृदयिं मनन करि विशेष मी परि राहि
मूढ ॥ धृ० ॥ तथापि गेली कुशलें गेहीं ॥ सुंद-
री ॥ आशा असली तव शब्दांनीं होइ रूढ ॥
हें उमगत० ॥ १ ॥**

हें खरें पण,

साकी.

**प्रेमपिसारा भुजेस बांधुनि धांवे पवनगतीनें ॥
जड देह परी उचलुं शकेना हें मन अगाध यत्नें ॥
तनमन सदनदिशीं ॥ सुटका येथुनि होइ कशी ॥ १ ॥**

भालचंद्र—सरकार, सुटका तर झालीच पाहिजे.

अतुलचंद्र—कशी होणार? चाळीस लोकांचा गराडा तुमच्या भोंवतीं पडला आहे ना? त्यांतून वांचाल तर पुढें नाचाल.

भालचंद्र—सरकार,—(बोलत नाहीं.)

अतुलचंद्र—कां रे अडखळलास? मला वाटतें तुझ्या डोक्यांत कांहीं विचार घोळतो आहे.

भालचंद्र—सरकार, क्षमा कराल तर सांगतों.

पद—(थाटमाट०) चालीवर.

सेवनांत देह सतत झिजवितों तरी ॥ तरुणीनें लपुनि झडप घातली खरी ॥ धृ० ॥ चंदनदासा-त्मजा सुहास्यमुखि सती ॥ प्रार्थुं लागली विवाह मजसमेत ती ॥ घातलि अट सुटकेची मुख्य तिजप्रती ॥ विघ्नांतुनि मुक्त करिल तीच सुंदरी ॥ १ ॥

अतुलचंद्र—समजलों, पण ती पोर कशी मुक्त करणार?

भालचंद्र—तें इतक्यांत काय सांगूं? पण दोन गोष्टी दिसतात. एक तर माझें ह्मणणें ती नाकारणार नाहीं; आणि दुसरें,

साकी.

कुंठित होते ज्या ज्या कर्मीं चतुर बुद्धि पुरुषाची ॥
मती चतुरतर हितकर असते बहुधा तेथें स्त्रीची ॥
लोक असें ह्मणती ॥ घेऊं आपण अनुभूती ॥ १ ॥

अतुलचंद्र—(एकलेसें करून) जिन्यांत कोणाचे पाय वाजताहेत? कोण येत आहे बरें? (पाहून) अरे, ही रमा. (भालचंद्राकडे) मी जरा पलीकडल्या खोलींतून जाऊन येतों. [जातो. रमा येते.]

भालचंद्र—(तिचा हात आपल्या ओंठाला लावून) कसें काय रमा, पुन्हा तुझी माझी गांठ पडली याबद्दल तुला वाईट तर वाटत नाहीं ना?

रमा—वाईट वाटतं नी वाटत नाहीं. कां वाईट वाटत नाहीं हें मी

काय सांगूं बाई? (लाजते) पण वाईट वाटायचं कारण आपण कैदी अहांत हें. आणखी त्या मेल्या शिपाई लोकांच्या कुजबुजी वरनं तर गडे माझा जीव चर्र होतो. (रडूं लागते.)

भालचंद्र—(तिला कवटाळून) ते काय बरें बोलत होते?

रमा—तुम्हां दोघांना ठार मारण्या संबंधानं. पण तुम्ही निरपराधी अहांत.

भालचंद्र—(उद्विग्न) सारें खरें पण काय उपयोग? (सुस्कारा टाकतो.)

रमा--(आवेशानें) तें कांहीं नाहीं, तुमची सुटका झालीच पाहिजे.

भालचंद्र—अहाहा! आम्हा दोघांची सुटका झाली तर,--पण हें शक्य का?

रमा—ती झालीच पाहिजे; निदान तुमची तरी.

भालचंद्र—छे छे. धन्याला टाकून आपलेच प्राण वांचविणारा कृत्रिम नोकर हा भालचंद्र नव्हे. आणखी,

साकी.

उदाराग्रणीस्वामीसह जो किंकर करितो कावा ॥
युवतीनें नच विवाहास तो विश्वसनीय गणावा ॥
आवडतो तुज कां? ॥ याविषयीं येते शंका ॥ १ ॥

(रमा त्याचा हात दाबते व मानेनें कबूल करते.)

रमा—(हळूंच) मी फार वेळ इथं थांबलें तर शिपाईलोक संशय घेतील. तजवीज केली आहे. कितपत तडीस गेली एवढं बघून मागल्या पायानं आलेंच. [जाते.]

अतुलचंद्र—(प्रवेश करून) कांहीं आहे का आशा?

भालचंद्र—दिसते खरी. पहावें!

अतुलचंद्र—अरे पण ही आली पुन्हा. [जातो. घाईनें रमा येते.]

भालचंद्र—निराशाच ना?

रमा—नाहीं. अंमळ कठिण आहे एवढंच. पण दुःखाची गोष्ट ही

कीं हा दरोडा तीव्रवज्र राजानं आपल्या भावावर घातला आहे.

भालचंद्र—काय ह्मणतेस? शिव, शिव! केवढा मांगहृदयी तो!

रमा—हें बघा मी पुन्हा येई पर्यंत दोघेही अगदीं तयार असा म्हणजे झालं. [जाऊं लागते.]

भालचंद्र—(तिचा हात ओढून) प्रियतमे,

पद--(नीज सुखें०) चालीवर.

जाण सखे तनमनधन अर्पिलें तुला ॥ कर्तृत्वें
तव जरि हा प्राण वांचला ॥ धृ० ॥ होइल गे
उपकृतिज्ञपुरुषरक्षण ॥ दाखवि मद्विषयक अनु-
रागलक्षण ॥ पाहुत तुज दाररूप झणिं मदीक्षण ॥
आलिंगन दे जरि नच समय चांगला ॥ १ ॥

(आलिंगन देतात.) भीमखिंडीस पोंहचलों तर तुला लवकरच न्यावयास येईन.

रमा—खरंच ना पण हें?

भालचंद्र—हें घे वचन. [तसें करतो. रमा जाते. अतुलचंद्र येतो.]

अतुलचंद्र—हो कीं ना लवकर सांग.

भालचंद्र—होच सरकार. ती ह्मणाली मी परत येईपर्यंत तयार असा. पहावें! पण अत्यंत शोचनीय गोष्ट तिनें ही सांगितली कीं हें सर्व तीव्रवज्र महाराजांचें कारस्थान आपल्याला ठारकरण्याकरितां.

अतुलचंद्र--अरे देवा, केवडा द्वेष हा?

पद—कानडा–त्रिताल.

(तुम साई हकीम०) चालीवर.

बंधुराया ॥ खुशाल ॥ विशाल ॥ मशाल ॥ द्वेष
ही उजळशी ॥ नच तुजला भीति अल्प किमपी
उरली ॥ जगतीं जन ह्मणती ॥ वाईट सारे ॥धृ०॥
कारण काय मला छळण्याचें ॥ सर्वस्वी असुनि
तुला तनयतुल्य, दयेला पात्र ॥ बंधुराया० ॥१॥

असो. भालचंद्रा इथून आपण सुखरूप गेलोंच तर ह्या संबंधानें कोणाजवळ ब्र सुद्धां काढायचा नाहीं बरें? कारण बाबा मग दादाचें काय करतील नेम नाहीं. [रमा घाईनें येते.]

रमा—(हळूच व घाईनें) आतां एक क्षण घालवूं नका. समोरच्या खिडकींतून खालीं उड्या घाला. फार झालं तर पायांला थोडी दुखापत होईल. समोरच एक दार लागेल. तिथल्या शिपायांना मी दारूंत अगदीं बेशुद्ध पाडलं आहे. पलीकडेच तबेला आहे. तिथं दोन घोडे कसून तयार आहेत. चला आटपा.

अतुलचंद्र—रमे, या उपकाराची फेड भालचंद्र करील. येतों तर. [जातो.]

रमा—या दासीला लवकरच घेऊन जाणार ना?

भालचंद्र—धन्याच्या शद्बाबाहेर मी जाणार नाहीं. येतों तर सुंदरी. [रमा मान डोलावते. दोघे जातात.]

※ प्रवेश ४ था. ※

—:◁×□×▷:—

स्थळ—भीमखिंडींतील शैलेशराजाचा वाडा.

[शैलेश व मंदारमाला बसले आहेत. जवळ एक हुजऱ्या उभा आहे.]

शैलेश—तो भीमशौर्यच असें खात्रीनें सांगतोस काय?

हुजऱ्या—चंदनदासाच्या खाणावळीहून आपल्या मुलखांत येतांना जी मध्यें "अंधारी" नांवाची नदी लागते तिच्या थडीवर तो भेटला. महाराजांच्या पायां पड म्हणजे क्षमा करतील म्हणून पुष्कळ सांगून पाहिलें पण व्यर्थ! त्यानें दुःखानें मान हालविली आणि "हें काळें ठिक्कर तोंड कसें दाखवूं" असे शद्ब उच्चारून एकदम नदींत उडी मारून प्राण दिला.

शैलेश—मी त्याला क्षमा केली असती पण आतां काय उपयोग? बरें, तूं जा. [जातो.]

मंदारमाला—म्हटलं भावाभावांत वैर दिसतंय् आलं का लक्ष्यांत?

शैलेश—होय आलें आहे. व त्यांचें सुरळीत कसें होईल याच विचारांत मी आहे.

मंदारमाला—त्या दोघांची कांहीं दिवस ताटातूट करायला काय हरकत आहे? मला वाटतं अशानं ते मनांतलं काळं बेरं विसरतील, आणि परत आल्यावर आनंदानं वागतील.

शैलेश—तुझें ह्मणणें सयुक्तिक दिसतें. लढाईच्या खर्चाची तीन लाख रकम अंगध्वजानें प्रतापनगरांतील त्याच्या सावकाराकडून घेण्याविषयीं पत्र दिलें आहे. तेव्हां हें काम तीव्रवज्रालाच सांगावें ह्मणजे तो त्या शहराची मौज पाहण्यांत कांहीं दिवस घालवीलच.

मंदारमाला—ठीक. कोण आहे रे तिकडे? तीव्रवज्राला म्हणावं बोलावताहेत. [तीव्रवज्र येतो.]

शैलेश—तीव्रवज्रा, लढाईच्या खर्चाबद्दलची रकम वसूल करायची आहे, तुला ठाऊक आहे. तेव्हां हें काम तूंच करावेंस; कारण माझ्या खालोखालच्या अधिकाराचा पुरुष काय तो तूंच आहेस.

तीव्रवज्र—(तिरसट मुद्रेनें) नाहीं बाबा, तुमच्या खालोखाल अधिकार माझे नाहींत. माझे असावेत हें रास्त आहे. पण ते दुसऱ्यानें बळकाविले आहेत; तेव्हां ही कामगिरी त्यालाच सांगावी. [परत जाऊं लागतो.]

शैलेश—थांब मुला, आह्मी दोघांनीं तर तुझे अधिकार बळकाविले नाहींत ना?

तीव्रवज्र—तुह्मीच हिसकलेत. ज्यानें बळकाविले त्याला जाणून बुजून न दावणें ह्मणजे तुह्मीच बळकाविणें होय. ऐकाच तर आतां.

पद—(प्राप्त होय जें०) चालीवर.

मदादेश रोधिला बंधुनें, नयनीं देखियलें ॥
"नको" असें मी शासित असतां सैनिक परतविले ॥धृ०॥
माझी आज्ञा कोणि न मानिति भजती सर्व तया ॥
विश्वपालनेपालवधें जरि करितों अन्याया ॥

भार मत्शिरीं असता तुमचें समाधान व्हाया ॥
असें असुनि मद्वचनोल्लंघन सांगा कां झालें ॥ १ ॥

शैलेश—पण त्यांत तुझा उपमर्द करावा असा अतुलचंद्राचा हेतू नव्हता.

तीव्रवज्र—हं:! या प्रकरणांत तो किती धिटाईनें वागला हें आपणाला काय माहीत? आणि तें नसणें यांतच मौज आहे.

शैलेश—काय तें स्पष्ट बोल. मला शंकेंत पाडूं नकोस.

तीव्रवज्र—छे, छे, आपल्याच्यानें तें बोलवत नाहीं.

मंदारमाला—म्हणजे असं काय तो बोलला बावा? वाईट साईट तर नाहीं ना कांहीं?

तीव्रवज्र—(पुन्हां तेंच उत्तर देतो.)

शैलेश व मंदारमाला—तुला स्पष्ट सांगितलेंच पाहिजे तीव्रवज्रा.

तीव्रवज्र—पहा बोवा सांगतों पण कोणी "चुगलखोर" या हलकट नांवानें मला तुच्छ करूं नये म्हणजे झालें. जें काय घडलें तें सुवर्णगडास.

शैलेश—तिथें अतुलचंद्र काय बोलला तुला?

तीव्रवज्र—सांगायला मोठें वाईट वाटतें. काय सांगूं, क्रोधाच्या आवेशांत म्हणा किंवा मत्सर व गर्व यामुळें म्हणा माझा लाडका भाऊ साफ म्हणाला कीं "मी तुझा द्वेष करतों; तूं माझ्या उत्कर्षांत विघ्न करणारा धोंडा आडवा पडला आहेस; या भीमखिंडीच्या गादीवर मी बसलों पाहिजे, तूं नाहीं."

मंदारमाला--(रागानें) अतुलचंद्र बोलला हें? पोरटा भारीच हलकट झाला बाई! आणि तूं तें पोटांत ठेवलंस? साळसूद आहेस.

तीव्रवज्र—मी स्तुतीस पात्र नाहीं आई, आणि ती मला नको ही. त्याच्याशीं वैर करावें हें माझ्या बंधुप्रेमाला उचित आहे काय? प्रेमाचा एक तरी शद्ब त्यानें बोलावा म्हणून हवे ते प्रयत्न केले, पण सर्व व्यर्थ. त्याच्या पायांवर नाक घांसून माफी मागण्याचा माझा अधिकार नाहीं, वडील पडलों, तथापि अशा नीच रीतीनें माझा पाणउतारा व्हावा असा

त्याचा मानस होता.

शैलेश—(रागानें) हं! अरे कारट्या! (त्याकडे) आम्हाला हें कांहींच ठाऊक नाहीं.

तीव्रवज्र—त्याच्याविषयीं आपल्या मनांत वाईट भरवून द्यावें हें निंद्य काम माझें नव्हे म्हणून मी आपला गप्प होतों; आणि जें कांहीं आतां बोलत आहें तें केवळ आपली आज्ञा मोडूं नये म्हणूनच. अतुलचंद्राच्या वागणुकींत कांहींसा कृत्रिमपणा आहे अशी भीति वाटते. केवळ उदारबुद्धीमुळेंच त्या लबाड विश्वपालाची त्यानें एवढी तरफदारी केली काय? बाबा, त्याचे त्यांत काय हेतू होते याची आपणाला कल्पना नाहीं अं? शिव, शिव! ते तसे नसते तर बरें झालें असतें!

शैलेश व मंदारमाला—(त्वेषानें) त्याचे हेतू? कसले हेतू?

तीव्रवज्र—ते कळविणें जिवावर येत आहे. पण काय करूं? आतां सांगितलेच पाहिजेत.

पद—(कवणें तुज०) चालीवर.

अवलोका पूर्विल कृति सर्व बंधुची ॥
अवगुंठित दृष्टि तमें परि करा शुची ॥ धृ० ॥
विश्वपालमनविशुद्धि काय पाहिली ॥
ज्याकारण द्वंद्वभयीं तनू घातली ॥ चाल ॥
आपण त्या दोघांला ॥ असतां एकांत दिला ॥
केलें कुटिल कथेला ॥ नच दुभाषि हें वदला ॥
चाल ॥ पाहिलें सुवर्णगर्डी परी उलटची ॥ १ ॥

यांत खुबी अशी होती कीं विश्वपाल व नेपाल यांचें एकांतांतलें भाषण होण्याच्या अदल्या रात्रीं तो त्यांच्याशीं कुजबुज करीत होता व "जपून बोला" असें सांगत होता हें त्या विश्वासू मणिकपालानें पाहिलें आणि मला सांगितलें, पण मी गप्प बसलों कारण अतुलचंद्र द्वंद्वांत खास हरणार मग उगीच चुगली खाण्यांत काय अर्थ असें मला वाटलें होतें; पण तसें झालें नाहीं; पुन्हा ही गोष्ट बोलण्यांत अर्थ दिसला नाहीं कारण आपण सर्व निकाल द्वंद्वावर ठेविला होता. तें असो. सुवर्णगर्डी

शिशुपाल व नेपाल पुन्हा सापडले होते. आणि ते पळूं नयेत ह्मणून अतुलचंद्राला स्वतः पहारा करण्याविषयीं बजाविलें होतें तथापि—

पद—(बघुनि सुभद्रेला०) चालीवर.

लटकि कथा वदला ॥ फसविलें खरेंच अपणाला ॥धृ०॥
" पडलों येवोनीया घेरी ॥ झालों मूर्छापन्न तदुपरी ॥
गेले पळुनि तेणें वैरी ॥ चाल ॥ उपाय सम हरला ॥
तेव्हां दोष कसा उरला " ॥ १ ॥

(हंसत) ही गोष्ट कोण खरी समजेल? ताप नाहीं, खोकला नाहीं, कांहीं एक नाहीं; चांगला हातापायानें धट्टाकट्टा! मग मूर्छा यायला काय झालें? बरें समजा कीं आली मूर्छा; शिपाईलोक कोठें मेले होते त्यावेळेस? आपण कांहीं ही ह्मणा, त्या चोरांनाच पळविण्याकरितां ही मूर्छा आली असावी असें मला तर वाटतें बोवा. दुसरें, चंदनदासाच्या खाणावळींतून पुन्हा ते पळाले यातलें गूढ ऐका.

पद—वसंत–दादरा.

हेरांनीं गूढ मला सकल कळविलें ॥
बंधूनें भृत्यासह साह्य त्या दिलें ॥ धृ० ॥
अनपकारधैर्य त्या रमेस देउनी ॥
भालचंद्र वरिल अशी आस दावुनी ॥
चाल ॥ सैनिक मी पाठविले ॥ त्यांसि
मद्य पाजविलें ॥ शत्रूंना पळवीलें ॥ ऐसें
निज वळवीलें ॥ चाल ॥ आरंभापासुनि
हे यत्न उचलले ॥ १ ॥

या सर्व गोष्टींवरून माझ्या बंधुराजाचे हेतू आपण स्पष्ट जाणूं शकत नाहीं काय?

शैलेश—तीव्रवज्रा, तूं मात्र आमचे डोळे उघडलेस.

मंदारमाला—मुला, तुझ्या आंगीं चांगली दूरदृष्टी आहे. तुझ्या बोलण्याचा अर्थ हाच कीं नाहीं कीं तो राज्यक्रांतीला नी त्या प्रताप-

सिंहाला आंतून मदत करतो!

तीव्रवज्र—अशी मला भीति वाटते, आई.

शैलेश—अशानें मी त्याला हांकून देईन व पुन्हा नांव घेणार नाहीं.

तीव्रवज्र—(विनयानें) बाबा, अशी निष्ठुरता दाखवूं नका. भाबाची, आपल्या पोटच्या गोळ्याची गोष्ट आहे. शिवाय मी बोलूं लागलों तेव्हां मला असें वाटलें कीं ह्या गोष्टी या खोलींतील चिलटांना देखील कळणार नाहींत.

शैलेश—तूं घाबरूं नकोस. चुगलखोर या रूपानें तुला कधीं प्रकट करणार नाहीं किंवा त्याच्या अपराधाबद्दल एकाएकी करडे उपाय योजणार नाहीं. पश्चात्ताप पावून आपली वर्तणूक सुधारावी असा मी त्याला प्रसंग देईन. तूं प्रतापनगराला जाऊं नकोस; त्याला पाठवितों; व तिथें त्याला कृतकर्माचा पश्चात्ताप होईल असें करतों. (रागानें) शपथपूर्वक सांगतों कीं त्याच्या ह्या नीच स्वभावांत पालट पडल्याखेरीज त्या कुलांगाराचें इंदिरेशीं लग्न होऊं देणार नाहीं.

तीव्रवज्र—(दुःखानें) अरेरे! गरीब बापडी! बाबा, त्या बिचारीचें मात्र मातेरें करूं नका. आपण दोघे तिला पोटच्या पोरीप्रमाणें लेखतां आणि मी तर इंदिरेला सख्ख्या बहिणीप्रमाणें गणतों. त्याच्याशीं विवाह लावून त्या अनाथ गाईला अधम खाटकाच्या तावडींत देऊं नका ह्मणजे झालें.

मंदारमाला—मुला, तो ताळ्यावर आल्या खेरीज तीथच मुदलीं ठरवायची नाहीं.

तीव्रवज्र—आई, असेंही आणखी करावें. अतुलचंद्र गेला ह्मणजे "त्या दुर्गुणी मुलाशीं तुझें लग्न करायचें नाहीं" असें चक्क इंदिरेला सांगावें. बहिणभावंडाच्या मायेला अनुसरून मी बोलतों. अशामुळें काय होईल कीं ती हुराळून जाऊन जी एकसारखी त्याच्या नादीं लागली आहे तो नाद अंमळ कमी होईल. तशांत पुढें जें कांहीं व्हायचें असेल तें होईलच. ती झुरणीस पडूं नये म्हणून मी ह्मणतों, दुसरें काय?

मंदारमाला—सूचना बरिक ठीक केलीस खरी.

शैलेश—प्रतापनगरीं इंदिरेच्या वियोगामुळें अतुलचंद्राच्या मनांत गंभीर विचार घोळतीलच; आणि तशांत त्याला पत्रद्वारा दोन खरमरीत गोष्टी लिहूं. आला तर आला शुद्धीवर.

तीव्रवज्र—पण बाबा तसें करतांना मला मात्र धोक्यांत घालूं नका अं? तो माझा हवा तेवढा द्वेष करो, मी मात्र त्याचें वाईट चिंतीत नाहीं हें एक देवच जाणे!

शैलेश—भिऊं नकोस. सर्व युक्तीयुक्तीनेंच होईल. तसें न झालें तर—

[खोलीच्या खिडकींतून भीमशौर्य डोकावून पाहतो.]

तीव्रवज्र—(तें पाहून) अरे कोण तो? (जाऊन पाहतो व परत येतांना) खिडकींतून कोणी डोकावून पाहिलेंसें वाटलें म्हणून तिथें जाऊन पाहतों तों कांहीं नाहीं.

शैलेश—अं:! भास झाला असेल! असो. आतां अतुलचंद्राला कळविलें पाहिजे कीं उद्यांच प्रतापनगराची तयारी कर.

तीव्रवज्र—त्याच्या बरोबर भालचंद्र तर जाईलच, परंतु एखादा मणिकपालासारखा विश्वासू आणि आपल्या तर्फेचा असावा.

शैलेश—त्यापेक्षां दुसरा जास्त विश्वसनीय मनुष्यच नाहीं. त्यालाच पाठवूं.

तीव्रवज्र—त्याचें नांव सहज घेतलें पण आपणाला ही तोच पसंत पडला.

मंदारमाला—कोण आहे रे? अतुलचंद्राला बोलाव. (अतुलचंद्र येतो.)

अतुलचंद्र—

पद—(गुरुजि द्रुमच्या०) चालीवर.

पितरसदृशी ममता कोण करी ॥ ममता कोण करी ॥ धृ० ॥
बालक सद्गुणि दुर्गुणि राहो ॥ भेद मनीं न धरी ॥ १ ॥
वाढति पादप मधु कटु दोन्ही ॥ त्यजि न कदापि गिरी ॥ १ ॥

शैलेश—अतुलचंद्रा, शेट कस्तूरचंदाकडून लढाईच्या खर्चाबद्दलचे

तीन लाख रुपये वसूल करायचे आहेत तेव्हां प्रतापनगरास उद्यांच जाऊन हें काम कर.

अतुलचंद्र—(साश्चर्य) उद्यांच बाबा? ठीक आहे. आपण सांगाल तसें.

शैलेश—उद्यांच गेलें पाहिजे. भालचंद्राबरोबर मणिकपालाला ही घेऊन जा. पौलोम राजाच्या वाड्यांत उतरशीलच. पेढीहून रकम घेतल्यावर निम्मे रुपये पौलोम राजाच्या गुमास्त्याच्या स्वाधीन कर आणि नंतर मला निरोप पाठीव म्हणजे बाकीच्या रकमेची काय विल्हेवाट लावायची तें कळवीन.

अतुलचंद्र—बाबा, मोठ्या आनंदानें मी हें काम करतों.

पद--ब्याहाग–त्रिताल.

(अबहो बालं मैका जुगबीते॰) चालीवर.

शिरसावंद्य मुलाला हितकारी पित्याची आज्ञा मनोज्ञा ॥ मुदितमनें करितों सकल कृपा ॥ धृ॰ ॥ प्रतापनगराप्रतीं प्रभातीं ॥ सहकिंकर अश्वावरती ॥ बैसुनी जातो पवनासम मी ॥ शिरसावंद्य॰ ॥ १ ॥

(जाऊं लागतो.) दादा--(तीव्रवज्र झटकन् त्याजवळ जातो) दादा, मी उद्यां जाणार. आतां तरी लोभाचा शब्द बोल. मी गरीब आहें.

तीव्रवज्र—(बापाकडे बघत) बरें, बरें! नीट संभाळून जा बरें. पैशाचें काम आहे, काळजीनें! [अतुलचंद्र जातो. पडदा पडतो. तीव्रवज्र बाहेर येतो व पडद्यांत पाहून] चालला गुलाम कुत्र्यासारखा इंदिरेकडे! जा, मर आजच्या दिवस! (लोकांकडे) बार तर ठासून भरला आहे, फक्त सरवत्ती देणेंच उरलें आहे. पाहूं आतां! (पडद्याकडे) अरे मणिकपाला आलास, ठीक झालें. (तो येतो.) झाली तुझी नेमणूक; आतां प्रतापनगरीं त्याला एकसारखा हाणून पाडशील ना? वचन दे.

मणिकपाल--हें घ्या वचन. (तसें करतो.)

तीव्रवज्र—ही घे रुपयाची थैली बक्षिस. (तो घेतो) जा आतां, तयारी कर. [माणिकपाल जातो.] अतुलचंद्रा,

साकी.

गहन खोदुनी कूप तयांवरि कुटिल शस्य अंथरलें ॥
उत्कर्षाच्या मार्गामाजीं स्थलीं स्थलीं स्थापियलें ॥
पडशिल तोंडघशी ॥ कदापि होशिल तूं न यशी ॥ १ ॥

[मिशांवर पीळ देत जातो.]

❋ प्रवेश ५ वा. ❋

स्थळ—राजवाड्यांतील अतुलचंद्राचें शयनमंदीर.

अतुलचंद्र—प्रतापनगराला जाणें आल्यानें मोठी पंचाईत झाली!

साकी.

जशी नदी दो मार्गीं वाहते शैल आडवा पडतां ॥
द्विधा जाहली तैसी माझी चित्तवृत्ति ही आतां ॥
सुंदरि राहि इथें ॥ पाठवि वडिलाज्ञा तेथें ॥ १ ॥

असो. इंदिरेला कळविण्याकरितां शयनमंदिराकडे जावें. (पडद्यांत पाहून) अहाहा! त्या चारुहासिनीच्या दासी आपापल्या कामांत कशा गढून गेल्या आहेत पहा!

पद—वसंत-त्रिताल.

(तूंभी गरुवाला है०) चालीवर.

भासे गृह शचिचें हें ॥ गुंतुनि गेल्या दासी सगळ्या
करिती शेज शयनीं पुष्पगुच्छ बहु गुंफुनिया ॥ धृ० ॥
रमणीय जाइ, मोगरी ॥ आदी करुनी सुगंध
तैलें शिंपडती मंचावरती ॥ शीतसमीरणसंगमयोगें

सुटला वास इकडे शीण नेइ तो सर्व लया ॥
भासे गृह० ॥ १ ॥

(ऐकलेसें करून) वाहवा! हे नानाप्रकारचे पक्षी सुंदरीनें स्वतः शिकविल्यामुळें रात्रीं ही दिवसासारखें गायन करीत आहेत.

पद—बहार–त्रिताल.

(कलियान संग करता रंग०) चालीवर.

मंजुल रव करिती खग गृहिचे ॥ बुल्बुल, कोकिल गाती प्रियगीतें मनोवृत्ति हृष्ट होइ, लोपुनिया क्लेश सकल मानसिचे ॥ धृ० ॥ मधुनि मधुनि वदती ॥ स्वन सुखकर शुक सारिका चतुर मानवा समान ॥ आरवे मयूर पिच्छभार फार विस्तरोनि करि नर्तनास ॥ १ ॥

परंतु या योगानें वृत्ती मात्र चलबिचल झाली. (वर वर्णन केल्याप्रमाणें इंदिरा शय्येवर चित्र लिहीत बसली आहे. इतक्यांत मागून येऊन तिच्या हातांतलें चित्र पाडून देतो.)

इंदिरा—इश्श! कोण हें? (पाहून) अगदींच का मर्यादा टाकायची! त्या दासी आतां हिकडं येतील.

अतुलचंद्र—त्या कांहीं वेड्या नाहींत. त्यांना ठाऊक आहे कीं ही यायची वेळ नव्हे.

इंदिरा—(स्वगत) त्या मेल्या कध्धीं यायच्या नाहींत. (उघड) मला कांहीं विचारायचं आहे. सांगणं होईल तर पुसतें.

अतुलचंद्र—होईल. पण—

इंदिरा—पण काय?

अतुलचंद्र—हें मी सांगायलाच हवें काय? सुंदरी,

पद—झिंजोटी-त्रिवट.

(दानी तनत तन हरेना०) चालीवर.

प्राशुनी प्रथम अधरामृता ॥ तदुपरी वदिन

वच बहुविध तुजसमेत स्मरशरहतजनसुखकरी वनिते ॥ प्रथम० ॥ धृ० ॥ त्यजि न भृंग कुसुम रम्य ॥ कधि रस न चाखितां ॥ ह्मणुनि सुखवि मजसि दयिते ॥ १ ॥

(चुंबन घेऊं पाहतो. ती चुकविते. दोघे शय्येवर बसतात.)

इंदिरा—ह्मटलं भालचंद्राच्या रमेला कधीं मूळ जाणार?

अतुलचंद्र—त्याला नुकतेंच पत्र आलें आहे कीं रमेची प्रकृति बिघडल्यामुळें तिच्या भावाकडे तिला पाठविलें आहे.

इंदिरा—म्हणजे प्रतापनगराला कीं काय?

अतुलचंद्र—होय. मला ही बाबांनीं उद्या सकाळीं प्रतापनगराला निघून जायला सांगितलें आहे,—लढाईच्या पैशाची व्यवस्था करायला. १५–२० दिवस लागतील तिकडे.

इंदिरा—(दुःखानें) अरे कपाळा!

पद—(अंकित पदांबुजाची०) चालीवर.

व्याकुल वियोग करिलचि मजसी ॥ न्या सवें प्रिया दासीसि ॥ धृ० ॥ प्रतापनगरीं भृत्या सदृश ॥ करिन झटुनि सेवेसि ॥ १ ॥ मत्स्य जळाविण तैसी येथें ॥ राहु तुह्माविण कैसि ॥ २ ॥ शरण रिघे मी "नाहीं" न ह्मणा ॥ मान्य करा विनतीसि ॥ ३ ॥

अतुलचंद्र—हें काय? भलता आग्रह करूं नकोस.

राग—ब्याहाग. चाल—सदर.

आवरि प्रिये त्वरित शोकासी ॥ करूं नको म्लान वदनासि ॥ धृ० ॥ न्यावें तुज ही आज्ञा तातें ॥ नाहिं दिली तनयासि ॥ १ ॥ अविलंबित परि परतुनि येतों ॥ घेइ घेइ वचनासि ॥ २ ॥ अल्प वियोगा अंतीं होइल ॥ अनल्प सुख दोघांसि ॥ ३ ॥

इंदिरा—इथं नाइलाज आहे. पण लवकर येणं होईल ना? मला बाई करमायचं नाहीं.

अतुलचंद्र—कसे तरी १५ दिवस लागतीलच.

इंदिरा—प्राणवल्लभा, संभाळून जा बरं! आपणांवर नेहमीं विकट प्रसंग येतात! देवा, तुजजवळ एवढंच मागतें कीं,

पद—(उबगलें सासऱ्या०) चालीवर.

प्रवासांत प्राणेशशिरीं तव अभय हस्त राहो ॥
पवन वनांतुनि सुमंद शीतल अनुकूलचि वाहो ॥
मार्गांतिल उपकारक तरुगण छायासुख देवो ॥
वापी, तटिनी, तडाग पुण्या जलदानें घेवो ॥
प्रामाणिकरीतीनें परिजन तत्परतें सेवो ॥
कार्यभाग निर्विघ्न आटपुनि वल्लभ झणि येवो ॥१॥

अतुलचंद्र—तो सर्वत्र भरला आहे. (वर पाहून) पण इंदिरे, इकडे पाहिलेंस काय?

पद—(तुझी अन्यथा ती०) चालीवर.

निशा जाहली ही विरलतारका ॥ गतश्रीक गगनीं दिसे चंद्रिका ॥ धृ० ॥ तरूंच्या दलालागुनि रक्तिमा ॥ उषा देतसे स्वप्रभे मोहिका ॥ १ ॥ भरद्वाज गावोनि तारस्वरें ॥ "पुरे क्रीडणें" हें वदी कामुका ॥ २ ॥

[पडदा पडतो.]

* तिसरा अंक समाप्त. *

अंक चवथा.

प्रवेश १ ला.

स्थळ—प्रतापनगरांतील कस्तूरचंद सावकाराची पेढी.

[कस्तूरचंद पत्र लिहीत बसला आहे व एक दोन कारकून वहीखातें चाळीत आहेत.]

कस्तूरचंद—ते पुन्हां केव्हां येईन ह्मणाले?

कारकून—असे चाराच्या सुमारास येईन ह्मणाले.

शेट—त्यांचें काय काम असावें बरें?

कारकून—पैशा खेरीज दुसरें काय? त्यावेळीं प्रमिलाताई त्यांची भावी नणंद कमला यांच्याजवळ दारांत उभ्या होत्या. त्यांचाही तर्क असाच झाला. (चाराचे ठोके वाजतात. ते सर्व मोजतात.)

शेटजी—त्यांची येण्याची वेळ झाली तर.

कारकून—(पडद्याकडे पाहून) ते आलेच पहा. (सर्व स्वागत करतात. शेट अतुलचंद्राला गादीवर बसवितो व आपण बाजूला बसतो.)

शेट—महाराज, मघाशीं आपण आलां होतां; मी घरीं नव्हतों. तसदीची क्षमा असावी.

अतुलचंद्र—छे, छे, कांहीं हरकत नाहीं. तुमच्या मागें हजारो कामें. बरें. हें पत्र घ्या, ह्मणजे भीमखिंडीहून मी कां आलों तें उघड होईल.

शेट—(पत्र वाचून) वा:! राजा अंगध्वजाचें पत्र हें. पाहतां दर्शनी तीन लाख रुपये द्यावे असें लिहितात. ठीक आहे. (कारकुनास) तीन लाख रुपयांचे तोडे शिवा अगोदर. (अतुलचंद्राकडे) तोंपर्यंत गरीबाकडे फराळाला चलावें. या पायांनीं आमचें घर पवित्र होवो.

परिचय नाहीं ह्मणून ना म्हणूं नये.

अतुलचंद्र—माफ करा शेटजी, मला भूक नाहीं, नाहींतर आलों असतों.

शेट—गरीबाचा मान केल्यासारखा होईल. चलाच. (उठतो.)

अतुलचंद्र—(नाइलाजास्तव) चला बोवा. (जातात. प्रमिला व कमला उभ्या आहेत असा पडदा उघडतो.)

प्रमिला—तूं कांहीं घाबरूं नकोस कमले! अतुलचंद्र पेढीवर आला कीं बाबांनीं हिकडं फराळाकरितां वळिवलंच बघ. तुझा काका अंगध्वज नी भाऊ वीरसेन यांचा तो वैरी असला तरी तुला त्यानं आजपर्यंत बघितलं नाहीं ना?

कमला—कधीं प्रसंगच आला नाहीं.

प्रमिला—झालं तर! तो ओळखतो कसला मग? आणि तुझं त्याचं एकदां मेतकूट मिळाल्याखेरीज तुझं नांवच त्याला कळायचं नाहीं म्हणजे आटपलं. कां बरं जमणार नाहीं? विस्तवाजवळ लोणी विरघळलंच पाहिजे.

कमला—तें सारं खरं, पण बाई माझं मन धडधडतं आहे.

पद—(येई रे कृष्णा०) चालीवर.

सखये सांग वरिल कां मला॥ शंका उद्भवते ॥ धृ०॥
वडिलोपार्जित नोहे नवें ॥ पडलें शत्रुत्वचि आडवें ॥
प्रणया देखिल तो गौरवें ॥ कैसा मग वद तें ॥ १ ॥
जोंवरि नव्हते त्या पाहिलें ॥ तोंवरि वाटत होतें भलें॥
निर्दय मदनाला जिंकिलें ॥ लटकें परि ठरतें ॥ २ ॥
मन्मथवन्ही हृदयांतरीं ॥ पेटुनि गेला नच आवरी ॥
होइल कुदशा गमते खरी ॥ काया तळमळते ॥ ३ ॥

प्रमिला—(पडद्याकडे पाहून) आतां पुरे हो! तो बघितलास का तळमळ बंद करणारा राजपुत्र बाबांच्या बरोबर येत आहे. (कस्तूरचंद व अतुलचंद्र येतात. चटकन् फराळाची तयारी होते.)

शेट—महाराज, ही माझी मुलगी प्रमिला, आणि ही तिची

मैत्रीण होय.

अतुलचंद्र--असें काय? (शेटासह फराळास बसतो.)

प्रमिला—इथं पौलोम महाराजांच्या वाड्यांत आपलं पूर्वी राहणं होतसं मला आठवतं.

अतुलचंद्र—होय. कांहीं वर्षं मी इथें शाळेंत शिकत होतों.

कमला—(स्वगत) अहाहा! किती मंजुळ शद्ब हे!

प्रमिला—या सुंदर शहरांत पुन्हा येणं झालं याबद्दल मौज वाटत असेलच?

अतुलचंद्र—नाहीं. आह्माला आपला जंगली मुलुखच फार आवडतो. आतां ह्यावेळीं आपण आनंद देत अहां ही गोष्ट सोडून द्या.

कमला—बरींच वर्षं हिकडं राहिल्यावर परत आपल्या मुलखांत जाणं ह्मणजे चंद्र लोकांतनं इंद्रलोकांत गेल्यासारखं होत असेल?

अतुलचंद्र—या विलासी नगरापेक्षां त्या गांवढळ भीमखिंडींत जास्त आनंद वाटतो खरा.

प्रमिला—इथं नुकतंच येणं झालं वाटतं?

अतुलचंद्र—होय. तीन दिवस झाले.

प्रमिला—(कमलेकडे पाहत) बरं, तिकडचं कसं काय वर्तमान? कांहीं मांडलीक राजांत लढाया झाल्या म्हणे?

अतुलचंद्र—इकडे ही बातमी अद्याप पसरली नाहीं, मोठा अचंबा वाटतो. कसें काय शेटजी, जरी राजा अंगध्वजाचें तुमच्या पेढीवर देणघेण आहे तरी त्याचे वैरी ते तुमचेही वैरी असा तुमचा समज नसेलच!

शेटजी—तसा असता तर मी घरांतल्या अगदीं आंतील सोप्यांत आपणाला घेऊन फराळास बसलों नसतों व ह्या मुली बोलायला सरसावल्या नसत्या.

अतुलचंद्र--शाबास. हें पहा, आह्माला सुवर्णगडावर चढाई करणें भाग पडलें. दोन्ही सैन्यानीं लढाईची शिकस्त केली; पण शेवटीं अंगध्वज हरला व सुवर्णगड आम्ही घेतला.

शेटजी—काय सुवर्णगड घेतला?

अतुलचंद्र—होय घेतला. व तुझ्माला पत्र दिलें तें लढाईच्या खर्चाबद्दलच्या पैशाचें.

शेट—खरेंच, रकम फार मोठी आहे.

अतुलचंद्र--पण एक मौजेची गोष्ट ही कीं वीरसेन २०० शिपायांनिशीं शत्रूला मदत करण्याकरितां जात असतां त्याला मैनाक पर्वताच्या पायथ्याशीं पकडलें व रक्तपात बिलकुल होऊं न देतां शरण आणिलें.

प्रमिला व शेट—अरेरे! तुमच्या शिपायांनीं पकडलें अं?

अतुलचंद्र—(स्वगत) वीरसेनाचें नांव घेतांच यांची वृत्ती चमत्कारिक कां व्हावी? माझ्या भाषणापासून यांना सुख झालें नाहीं तर! (उठून उघड) वीरसेनाविषयीं मी उगीच बोलून चुकलों कारण,

पद—(अशि ही सुगुण०) चालीवर.

वच हें अनभिमत झालें तुम्हाला ॥ वदलों
कशाला गमतें मनाला ॥ धृ० ॥ जरी दिलें
फल सत्काराचें दुःखदवार्ता हें ॥ भाव नव्हता
कुत्सित कांहीं शब्द निघुनि गेले ॥ मज द्यावें ॥
मुकवोनी ॥ क्षमेनीं ॥सुजनीं ॥ १ ॥

[पुढेंच येतात.]

शेट—त्याचें कारण वीरसेन हा माझ्या प्रमिलेची लग्नासाठीं मागणी करणारा असून उभयतांचें उत्कृष्ट प्रेम जुळलें आहे.

अतुलचंद्र—असें काय? आपल्या मुलीला व तिच्या मैत्रिणीला एवढी विनंती कळवावी कीं माझ्याकडून झालेल्या चुकांची माफी असावी. येतों तर.

शेटजी—अः! पोरींची कसली माफी! असो. मी कारकुना बरोबर तोडे आपल्या बिऱ्हाडीं आत्तां पाठवून देतों. [जातात.]

प्रमिला—कसं काय कमले?

कमला—इतक्यांत कांहींएक सांगतां येत नाहीं. पण उद्यां संध्याकाळीं हा फिरायला जातो तिकडं आपणही जाऊं. तिथं काय युक्ति

करायची तें सारं सांगेन. [पडदा पडतो.]

प्रवेश २ रा.

—<:·□·:>—

स्थळ—प्रतापनगराबाहेरील एक सपाट जागा.

[कमला घेरी येऊन पडल्याचें मिष करते. अतुलचंद्र धांवत येऊन तिला सांवरतो.]

अतुलचंद्र—हां, हां, हां! ही कोण बाई मूर्छा येऊन पडली! अरेरे! जवळ पाणी नाहीं.

कमला—(कण्हत डोळे लावून) नका, नका,—मला सोडून जाऊं नका. अमळशानं बरं वाटेल.

अतुलचंद्र—(स्वगत) अरे! ही त्या शेटाच्या मुलीची मैत्रीण. (उघड) बाई, थोडा उठण्याचा प्रयत्न करा पाहूं? मी या हाताचा टेका देतों.

कमला—मला असंच टेकून पडूं द्या क्षणभर.

अतुलचंद्र—घेरी येऊन पडलां काय तुह्मी?

कमला—होय. उठण्याची शक्ति नाहीं. (तशीच टेकून राहते.)

अतुलचंद्र—या गवतावर कांहींवेळ बसाल तर बरें वाटेल. (आपला रुमाल भुईवर अंथरून तिला बसवितो इतक्यांत प्रमिला येते.)

प्रमिला—सखे, तुला घेरी आल्यामुळं मी घाबरलें; पण आतां बरं वाटतं ना?

कमला—सखे,

अंजनी गीत.

वांचविलें मज यांनीं बाई ॥ बोल कशी होऊं उतराई ॥
जीव आपुला यांचे ठांई ॥ अर्पण करिते मी ॥ सखये ॥१॥

(त्याच्याकडे पहाते.)

अतुलचंद्र—प्रमिलाबाई, तुमची मैत्रीण राईचा फाजील पर्वत क-

रीत आहे. मी तिला मदत करायला धांवलों खरा, पण ती पडायची ती पडलीच.

कमला—तरी पण माझ्या तारफेला हे महाराज पात्रच आहेत. (उठते व तो रुमाल उचलून) महाराज, हा रुमाल मी दिला असं समजून नेहमीं वापरा नी या दासीची आठवण असूं द्या. (रुमाल देते.)

अतुलचंद्र—बरें, जातों तर.

कमला—असल्या प्रेमळ पुरुषाचा सहवास कसा सोडवेल?

अतुलचंद्र—माफ करा. मी जास्त थांबूं शकत नाहीं. [जातो.]

कमला—सखे, चल. या संबंधानं बोलत बोलत घरीं जाऊं. [पडदा पडतो. मणिकपाल व भालचंद्र प्रवेश करतात. दुसरीकडून अतुलचंद्र येतो.]

अतुलचंद्र—अरे वाः! तुम्ही ही हिकडेच आलांत काय?

मणिकपाल—होय सरकार. आपल्या हुकमावरून भालचंद्राबरोबर शहराची मौज पाहण्याकरितां गेलों होतों व स्वारी बिऱ्हाडीं पोंहचण्याचें अगोदर आपण जावें ह्मणून वळलों होतों.

अतुलचंद्र—चला तर आपण मिळूनच जाऊं. मणिकपाला, इतक्यांत एक साहसाची गोष्ट घडली ती तुमच्यापैकीं कोणी बघितली काय?

भालचंद्र—साहसाची गोष्ट? सरकार, आपणाला त्यांत दगा तर झाला नाहीं ना? (त्याला नखशिखांत निरखून पाहतो.)

अतुलचंद्र—छे, मुळींच नाहीं. एक बाई मूर्छा येऊन पडली होती.

मणिकपाल—पलीकडच्या आंबराईतून आम्ही चाललों होतों त्यावेळीं एक बाई कोणा तरुण पुरुषानें कवटाळून धरल्या सारखें दुरून दिसलें खरें, पण हा प्रेमाचा खेळ असेल असें जाणून आम्ही तिकडे कानाडोळा केला.

अतुलचंद्र—हंः! प्रेमाच्या अगदीं उलट प्रकार होता. बायकांना हात जोडावे एवढेंच. बरें तूं काय काय पाहिलेंस?

मणिकपाल—पुष्कळ गोष्टी पाहिल्या. पण त्या टेकडीच्या पलीकडल्या बाजूला एक देवीचें पडकें देऊळ व मोठी विहीर आहे, तिच्या

संबंधीं हा भालचंद्र चमत्कारीक गोष्ट सांगत होता.

भालचंद्र—होय सरकार.

अतुलचंद्र--ती मला माहीत आहे. त्या विहिरींत कोण्या जोडप्यानें प्रेमाच्या भरांत जीव दिला व तेव्हां पासून तिथें रात्रीं जायला कोणीही धजत नाहीं कारण पिशाचरूपानें ते बाहेर येऊन भिववितात व विहिरींत ओढतात, हीच गोष्ट ना?

दोघे नोकर—होय सरकार.

अतुलचंद्र—अं:! असल्या गोष्टीवर माझा विश्वास नाहीं. पण त्या स्थळाचें स्वरूप भयाण आहे खरें! [सर्व जातात. कमला व प्रमिला प्रवेश करतात.]

कमला—(नाकपुड्या फुगवून रोषानें) मी त्याच्यावर प्रेम करतें नी द्वेष ही करतें.

प्रमिला—सखे, यावेळीं तुझं मला भय वाटतं. तो नाहीं ह्मणाला कीं काय?

कमला—त्याला पुरुष म्हणावं कीं नाहीं समजत नाहीं. नानाप्रकारानं आपला हेतू कळिवला. बायको माणसाला हवी त्या मर्यादेच्या बाहेर दिखील गेलें, पण ऊं हू. तो मुद्दाम वेड पांघरीत आहे. त्याला "प्रेम" कळत नाहीं असं कसं होईल?

प्रमिला—गडे, मदनानं तुला कसं वश केलं बघ? मला नावं ठेवीत होतीस होय?

कमला—काय करूं?

पद--(सुटला पित्र दिशेचा०) चालीवर.

सुटला स्मरप्रभंजन महा ॥ हृदयार्णवीं सखे हें पहा ॥
फिरवुनी मला गरगरां आपटी खालीं ॥
दुर्दशा निवारण कशी करूं या कालीं ॥ १ ॥
आहे विरुद्ध मत्कुलतरू ॥ त्याला अतां काय तरि करूं ॥
पर्ण मी तुटुनि गगनांत उडे चहुंकडे ॥
त्या पुरुषमहावायुनें जाहलें वेडे ॥ १ ॥

मघाशीं तुजजवळ बोललें कीं त्याचा द्वेष करतें तें निव्वळ खोटं बरं. मनांत फक्त प्रेम आहे दुसरं कांहीं नाहीं. (विव्हल होते.)

प्रमिला—अशी विव्हल होऊं नकोस, गडे!

कमला—कसं करूं? खचित् यांत जगेन किंवा मरेन, सुखी होईन किंवा दुःखांत कुजत राहीन.

प्रमिला—पण पुढं कसं करायचं आतां?

कमला—(आवेशानें) अग हें काय पुसतेस? प्रेम अशी विलक्षण वस्तू आहे कीं अद्भुत युक्त्या सुचतात, आणि मी एक योजिली ही आहे. या कारभारांत मी गुंतलें असतांना जर का वीरसेन दादा आला तर तूं मात्र त्याला ह्यापैकीं कांहींएक सांगू नकोस ह्मणजे झालं.

प्रमिला—गळ्याची शपथ मी सांगायची नाहीं. [जातात.]

प्रवेश ३ रा.

स्थळ—पौलोम राजाचा वाडा.

[अतुलचंद्र कोचावर निजला आहे. तितक्यांत जवळच्या टेबलावर एक सुंदर रुमाल, त्याच्या पदरीं बांधलेली आंगठी व एक पत्र मणिकपाल लपत लपत आणून ठेवतो.]

मणिकपाल—(समोर येऊन) या भोळ्या शंभूचा माझ्यावर पूर्ण भरंवसा, पण हें कुठें माहीत आहे कीं काल या गब्रूनें त्या तिजोरींतील तोडे लांबविले. (टेबलावरील रुमालाकडे बोट दाखवून) ही शिकार तर खूप सांपडली. ती कमला—वीरसेनाची बहीण—यांनीं वरावें म्हणून नुस्ती धडपडत आहे. आपणही तिला आंतून मदत करण्याचें कबूल केलें आहे. आपलें काय गेलें? रुमाल टेबलावर ठेवण्याबद्दल घे मोहर, उद्यां रात्रीं अतुलचंद्राला त्या गांवाबाहेरील देवीच्या देवळापाशीं नेण्याबद्दल घे मोहर. असो. तीव्रवज्रानीं आपली नेमणूक केल्याप्रमाणें

वरून अतुलचंद्राशीं चांगला वागून आंतून त्याच्या विरुद्ध बावांना पत्रें लिहिण्याचा तडाका मी चालविलाच आहे.--(इतक्यांत अतुलचंद्र मोठा सुस्कारा टाकतो तो ऐकून) छे, आतां थांबून अर्थ नाहीं. [जातो. अतुलचंद्र दचकून उठतो.]

अतुलचंद्र—शिव, शिव! कोण त्रास हा! स्वप्नांमुळें एक रात्र सुखाची झोंप नाहीं.

पद--पुरिया-त्रिताल.

(नादरदर दीम् तादीम्०) चालीवर.

स्वप्नदर्शनें ॥ येती ॥ विविधाशुभ कल्पना मानसीं ॥ करिति शिथिलबल पूर्ण हृष्टवृत्ती ॥ धृ० ॥ स्मरण करुनि पाहतां तयातें ॥ मती बहुत जड संशयिं पडते ॥ निशा अताशां फार कष्ट देती ॥ १ ॥

(विचार करुन) अं:! असेल कांहीं तरी! (इकडे तिकडे फिरतो) निम्मे रुपयांची व्यवस्था तर केलीच. पण बाकीच्या रकमे संबंधानें बाबांचें पत्र अझून कां बरें येत नाहीं? इंदिरेचें ही पत्र नाहीं. (टेबलावरील सामान पाहून) हा रुमाल, आंगठी व पत्र कोणाचें? हां, समजलों. ती कोण हडळ आहे कोण जाणें तिचेंच हें सामान. पण हें इथें आलें कसें? (तिरस्कारानें पत्र उचलून) मी हें पत्र वाचणार नाहीं. (फाडूं लागतो पण विचार करून) पण नको. तिचें नांव गांव यांत असेल तें पाहूं. (पत्र वाचतो.) "महाराज, परवां जो रुमाल आपण प्रेमानें मजकरितां गवतावर पसरला होता तो माझ्या प्रेमाची खूण जाणावी म्हणून मी म्हटलें होतें. पण मी आतां दुसरा रुमाल व अंगठी धाडली आहे. अव्हेर करूं नये आणि या दीन दासीला ढकलून लावूं नये. आपला मोहक चेहरा पाहिल्या पासून कसें मेलें वेड लागलें आहे." कोण निर्लज्ज बायको पहा! आणि नांव नाहीं, गांव नाहीं-नी सही नाहीं! ठीक आहे. हिची पक्की खोडच मोडतों. (पत्र टेबलावर आपटतो. भालचंद्र येतो.) अरे भालचंद्रा, मणिकपालाला इकडे पाठीव, तो जरा वृद्ध मनुष्य आहे.

भालचंद्र—वृद्धपणाचें काय सरकार? हुकुम झाल्यास मी ही उत्तम रीतीनें काम बजावीन.

अतुलचंद्र—नाहीं; त्यालाच पाठवून दे अगोदर. [जातो. मणिकपाल येतो.] मणिकपाला, तुला आज एक नाजूक काम सांगायचें आहे.

मणिकपाल—(हंसत विनयानें) कोणतें काम सरकार?

अतुलचंद्र—(त्रस्त मुद्रेनें) तुला वाचतां येत असेल तर तें पत्र पहा.

मणिकपाल—आपला ट, फ, शिकलों आहे. (पत्र वाचतो.)

अतुलचंद्र—हें तिनेंच लिहिलें आहे कीं जिला माझ्या अंगावर पडतांना तूं व भालचंद्रानें गांवाबाहेरील आंबराईतून पाहिलेंस.

मणिकपाल—सरकार, हें आपल्याला? भीड, मर्यादा, शरम यांचा कहर झाला तर मग! बरें, यांत काय केलें पाहिजे?

अतुलचंद्र—त्या शेटकस्तूरचंदाकडे तें सामान घेऊन जा. आंबराईतून पाहिलेला प्रकार सर्व कारकुनांच्या देखत त्याला सांग; नांव व पत्ता विचारून घेऊन तूं स्वतः त्या वस्तू तिला नेऊन दे व घरांतील माणसांच्या देखत तिचा चांगला पाणउतारा कर. समजलास नीट? जा तर, भालचंद्र तुला ती पेटी दाखवील.

मणिकपाल—(स्वगत) या भालचंद्राला कसें तरी चुकविलें पाहिजे, म्हणजे शेटाकडे गेलों अशी थाप मारतां येईल. [जातो.]

अतुलचंद्र—बाबांचें पत्र कां येऊं नये? इंदिरा वाट बघत असेल!

पद—(पुनरपि नयना०) चालीवर.

परतुनि केव्हां जाइन सदना ॥ पाहिन प्रिय ललना ॥ करिन कधीं श्रवण मधुर वचना ॥धृ०॥ सुंदरिजवळी वदली होती॥ "लवकरि येइन" विश्वास्य अशी ॥ उक्ति अनृत रसना ॥१॥

मणिकपाल—(प्रवेश करून) पेढीवर गेलों होतों सरकार, काम नाजूक व भालचंद्र तरुण असल्याकारणानें शेटजीचें व माझें भाषण त्यानें ऐकूं नये अशी तजवीज केली.

अतुलचंद्र—शहाणपणाचें काम केलेंस. बरें, पुढें?

मणिकपाल--शेटजीला सर्व हकीकत सर्वांच्या देखत सांगितली, व वस्तू व पत्र दिलें. तो म्हणाला मी स्वतः तिची खोड मोडतों; झणून निघून आलों.

अतुलचंद्र--तिचें नांव समजलें नाहीं तर तुला?

मणिकपाल--शेटजी म्हणाले तुम्हाला तिचें नांव माहीत नाहीं त्या-पेक्षां मी ही कळवीत नाहीं कारण ती फार मोठ्या घराण्यांतील बायको आहे. जास्त आग्रहानें विचारावें तर मी घरचाकर पडलों.

अतुलचंद्र--असें असेल कदाचित्. शेटजीला तूं किती धूर्त आ-हेस हें काय ठाऊक? बरें असो. खोलींत त्या जिनसा कोणी आणल्या असतील बरें?

मणिकपाल—(विचार करून) धनीसाहेब, आपण निजलां तेव्हां खोलीचें दार बंद केलें होतें काय?

अतुलचंद्र—नाहीं. आतां तसें करीत जाईन. हें पहा, परवां रात्रीं या खोलींत कोणाचीं तरी पावलें वाजलीं; मी झटलें स्वप्नांतील भास असेल. पण आतां या जिनसांवरून वाटतें कीं खरी गोष्ट आहे. तेव्हां तो मनुष्य कोण असावा?

मणिकपाल--(घाबरून स्वगत) यानें मला पाहिलें कीं काय? (उघड) आपला संशय कोणावर बसतो?

अतुलचंद्र—कोणावर नाहीं. या वाड्यांतील नोकरलोकांचा वहीम तुला येतो काय?

मणिकपाल—छे, छे, सरकार. त्यांच्याशीं माझा असा संबंध तरी कोणता झणून तो येईल? बरें आपल्या भालचंद्राविषयीं तर माझी पूर्ण खात्री—

अतुलचंद्र—भलतेंच! भल्या मनुष्या, त्याच्यावर वहीम धरला तर तुझ्यावर धरल्या सारखाच झाला.

मणिकपाल—पण इकडे गडबड झाली असें आपण झणतां. हें गूढ मोठें अवघड दिसतें. (एकदम) तिजोरींतील पैसा जागेवर आहे हें तपासून घेतलें ना?

अतुलचंद्र—(दचकून उठून) नाहीं, कल्पनाच आली नाहीं.

मणिकपाल—पण पेढीवरून तोडे आले ते पैलोम महाराजांच्या पुष्कळ नोकरांनीं पाहिले.

अतुलचंद्र—चल, तिजोरी तपासूं. (दोघे तसें करतात.) तोडे गेले.

मणिकपाल—(पुन्हा तपासून) आपण झोपेंत मनुष्य पाहिला तें स्वप्न नव्हे खास.

अतुलचंद्र—चोरी तर मोठी घोटाळ्याची झाली. आणि निःसंशय माझ्या मामाच्या नोकरांपैकीं कोणी केली असली पाहिजे. पण नांव कोणाचें घेतां?

मणिकपाल—आतां कसें करावें? भालचंद्राला एकदम चावडी-वर दवडवूं काय? या वाड्यांतील लोकांची तपासणी करूं? (घाईनें जाऊं लागतो.)

अतुलचंद्र—(त्याला थांबवून) हां, हां, असें करण्यांत अर्थ नाहीं. चोरानें पैसा कोठें तरी दूर लांबविला असेल, कारण पुढें असा प्रकार असतो हें त्यांना पक्कें ठाऊक असतें. शिवाय त्यांत चांगल्या माणसांची मानहानी होईल. पैसा गेला तर बाबांचा राग मी सहन करीन. पण दुसऱ्याचा फुकट अपमान होणें हें मला आवडत नाहीं. आपण आतां असें करूं. या गोष्टीचा कोठें बोभाटा करूं नकोस. चोर जो असेल तो आपल्या सोबत्यांना मेजवानी देण्यांत, दारूबाजींत, रंडीबाजींत, अथवा इतर अशाच कामांत, अत्यानंदामुळें कांहीं पैसा उधळील; चाकरीवर वारंवार गैरहजर राहील, किंवा लवकरच ती सोडून जाईल. या करितां चाकरमाणसांवर गुप्तपणें बारीक नजर असूं दे. ते आपसांत हिकडे तिकडे कुजबुजतील, इत्यादि पुष्कळ वहीम येण्याजोग्या गोष्टी करतील.—

मणिकपाल—(मध्येंच) मी आतां शेटाकडे त्या जिनसा पोंचवून आलों त्यावेळीं जिन्याच्या बाजूला अंधारांत कांहीं माणसें कुजबुजत होतीं.

अतुलचंद्र—जा, जा लवकर; व ते काय बोलतात हें आडून ऐक. (मणिकपाल जातो. अतुलचंद्र पुन्हा तिजोरी तपासून निराश होतो.) नाहींच. वारंवार तपासल्यानें फारच सांपडणार आहे? (कपाळावर हात

मारून) मी तर अगदीं त्रासून गेलों आतां!

पद—बागेसरी—त्रिताल.

क्लिष्ट करी ही अघटितघटना ॥ तस्कर आहे कोण
कळेना ॥ धृ० ॥ श्रवण करुनि मम असावधाना ॥
तात करिल वाग्शरसंधाना ॥ मुहूर्त शुभ येथिल
आगमना ॥ नाहि लाभला हेंचि खरें ना ॥ १ ॥

मणिकपाल—(लगबगीनें येऊन) टाळी सरकार! शोध लागलासें दिसतें.

अतुलचंद्र— शाबास मित्रा! बोल लवकर.

मणिकपाल—मी जिन्याच्या दाराआड लपलों. जवळच्या खोलींत मणिकंटक नांवाचा सईस दोन इसमाशीं बोलत होता. जातांना ते आपसांत ह्मणाले "आज रात्रीं, ठीक बारा वाजतां, गांवाबाहेरील देवीच्या देवळाजवळ हिस्से करूं."

अतुलचंद्र—अगदीं तेंच. भुतें विहिरींत खेंचतात या भयानें कोणी येणार नाहीं हें जाणून ऐन मध्य रात्रीं तिथें जमण्याचें त्यांनीं ठरविलें आहे. मणिकपाला, आपण दोघेही त्यावेळीं तिकडे जाऊं.

मणिकपाल—पण भुतांना मी फार भितों.

अतुलचंद्र—अहारे भित्र्या! अरे, भूत ह्मणजे वास्तविक कांहींएक नसून आपल्या हातानें आपल्याला भिवविणें. तशांत मी बरोबर आहेंच. ठरलें तर.

मणिकपाल—ठीक आहे. [अतुलचंद्र जातो.] केवढा भाबडा पुरुष हा? चोर तर तुझ्या विश्वासांतला बनला आहे! आतां भालचंद्राला कोण पुसतो? ठीक आहे. चल. तिथें ही दुर्दैव उभें आहेच!

[जातो.]

प्रवेश ४ था.

स्थळ—गांवाबाहेरील देवीचें पडकें देऊळ.

[मणिकपाल व अतुलचंद्र प्रवेश करतात.]

अतुलचंद्र—चंद्रोदयामुळें तें बघ देवीचें पडकें देऊळ दिसत आहे.

पद—मारवा-त्रिताल.

(दानि दीम् तनन तन दरेना०) चालीवर.

तें दिसे भवन शशिकरांनीं ॥ रुचिर रानीं ॥
वनचरांनीं ॥ आक्रमित गृध्रवृकगृगालादिनीं ॥
पुरवासी जन भीति जयासी ॥ पिशाचसेवित
मानुनी ॥ धृ० ॥ छायेतुनि वृक्षवाटिकेचे ॥
किरण चमकती निशाकराचे ॥ आवृत जणु भू
तारापतनीं ॥ दिसे० ॥ १ ॥

मणिकपाल—(त्याच्या अगदीं जवळ जाऊन) सरकार, आपण अगदीं जवळ येऊन ठेपलों.

अतुलचंद्र—(हंसून) पण तूं माझ्या अंगाला असा खेटतोस कां?

मणिकपाल—(भिऊन) दोनप्रहर रात्रीचा भर, पिशाच, चेटुक इत्यादिकांचा झाडांच्या ढोलींतून बाहेर पडण्याचा काळ, व तशांत या कोल्ह्या--गिधाडांचा कल्होळ! माझी छाती धडधडत आहे. पण काय करूं—

अतुलचंद्र—चूप, चूप! माणसाचा आवाज आलासा वाटतो. चोर आधींच येऊन पोंहचले. त्यांचें भाषण ऐकलें पाहिजे. तूं कोठें लपतोस?

मणिकपाल--(भयानें) सरकार, मी तुमच्या जवळच राहतों, कसें ही करा!

अतुलचंद्र—भिऊं नकोस. त्या पडक्या भिंतीच्या आड दडून

रहा. मी या विहिरीजवळील तुटक्या मनोऱ्याच्या मागें लपतों. समंध विहिरींतून निघालाच तर प्रथम मला खाईल, पण टपून रहा. (लपतात.)

[कांहीं वेळानें शुभ्रवस्त्राचें घुंगट घेतलेली कमला मणिकपालाच्या बाजूनें येते. मणिकपाल ओरडतो व पळूं लागतो. अतुलचंद्र त्याला धरण्याकरितां धांवतो. कमला पुढेंच सरसावते.]

कमला—त्या मनुष्याबद्दल भिऊं नकोस. मी त्याला दुखापत केली नाहीं.

अतुलचंद्र—कोण तूं हरामखोरा, विघ्नसंतोष्या? (कमला घुंगट फेंकून देते.) अरे ही तीच चांडाळीण! (मणिकपाला कडे जाऊं लागतो.)

कमला—(त्याचें मनगट धरून) त्याला भय वाटावं म्हणून हें सोंग घेतलं. थांबा, पायां पडतें.

अतुलचंद्र—मी इथें येणार हें तुला कसें कळलें? फक्त त्या मणिकपालालाच ही गोष्ट ठाऊक होती.

कमला—शांत व्हा. सांगतें.

अतुलचंद्र—बोल लवकर.

कमला—माझा तिटकारा करता पण मी तुम्हाला रूपानं, वयानं अनुरूप—

अतुलचंद्र—(चुटकी वाजवून) माझ्या प्रश्नाचें उत्तर; फाजिलपणा नको.

कमला—तेंच सांगतें. तुमचं वेड लागल्यामुळं तुमची हालचाल टपण्याकरितां कांहीं माणसं मी गुंतविलीं. पौलोमवाड्याबाहेर पडतांना एकानं तुम्हाला पाहिलं, नी चोर पकडण्याकरितां इथं येण्याचं आपल्या चाकराजवळ बोलतांना त्यानं ऐकलं नी मला कळविलं.

अतुलचंद्र—बस्स, समजलों. मला माझ्या नोकराची शंका आली होती. (जाऊं लागतो.)

कमला—(त्याचा हात धरून त्याला लोंबकाळते व करुण स्वरानें) थांबा, थांबा, पदर पसरतें, ऐकून घ्या. अतुलचंद्रा, थांबा हो, क्षणभर

थांबा म्हणतें वरं!

अतुलचंद्र—(तिच्या हातांला हिसडून) नाहीं, नाहीं, नाहीं.

कमला—(कमरेंतून सुरी काढून) नाहीं? मग हें बघा तर!

अतुलचंद्र—(शस्त्र धरण्यास धांवून) काय मांडलेंस हें दुर्भागी स्त्रिये?

कमला—(मागेंच सरून) कांहीं नाहीं. पोटांत सुरी खुपसून घेतें.

अतुलचंद्र—(घोटाळ्यांत पडून) तूं पिसाळली आहेस, तुला उन्मत्तवायू झाला आहे.

कमला—(डोळे वटारून) होय झाला. आणि त्याला कारण तुम्ही माझा त्याग करता हेंच. मी शपथ घेऊन सांगतें कीं हा केरासारखा फेंकून देण्याजोगा देह—

अतुलचंद्र—हां, हां! असली अविचारानें शपथ घेऊं नकोस.

कमला—कां? मी देहभानावर नाहीं; जीव देईन इथं.

अतुलचंद्र—पण तुझ्या अंगीं एवढा विचारशून्य आवेश आला तरी कोठून?

कमला—

पद—(रामकरीं जरि०) चालीवर.

**झंझावाताला़गि विचारा ॥ क्षोभुनि करितो कां अविचारा ॥
मेघ गर्जुनी करी प्रहारा ॥ निजवज्रानें कां ॥ १ ॥
विद्युत् जलदामाजि चकाकी ॥ पडते खालीं एकाएकी ॥
कारण काय असावें या कीं ॥ प्रश्न करा तिजला ॥ २ ॥
कराल या सर्वांच्या दमना ॥ स्वीयप्रभवें, तरी सत्य
गणा ॥ विकारकोपाच्या संयमना ॥ समर्थ मी आहे ॥ ३ ॥**

अतुलचंद्र—(शांतपणें) तुझें म्हणणें तरी काय सांग पाहूं? (तिच्या सुरीकडे पाहतो.)

कमला—हां! चकवून हें शस्त्र तर हिसकूं पहात नाहीं ना? नाहीं तर—(पोटावर नेम धरते.)

अतुलचंद्र—छे, छे, असें करूं नकोस. खचित सारें ऐकतों.

कमला—माझं तुमच्यावर प्रेम आहे; कूळ उंच आहे पण लग्न झाल्याखेरीज नांव सांगू शकत नाहीं. तर एकदां गच्च आलिंगन द्या. तोंड वाकडं तिकडं करूं नका. नाहीं तर हें बघा—(पुन्हा स्वतावर नेम धरते.)

अतुलचंद्र—(सुरी हिसकून फेंकतो) हां, हां! भलतेंच साहस करूं नकोस!

कमला—(चिडून जाऊन) अरे दुष्टा, काय केलंस हें?

अतुलचंद्र—कामांध व साहसी स्त्रियेला आत्मघातापासून वांचविलें.

कमला—अखेरीस फसविलंस ना? हें ठीक नाहीं—

[पडद्यांत--"हरामखोरा आपल्या जिवाचें रक्षण कर." वीरसेन येतो.]

कमला—(कांपत कांपत) अरे कपाळा! हा तर दादा!

अतुलचंद्र--(तरवार काढून) दगा, दगा! (लढतात.)

वीरसेन--मूर्खा, आपल्या काळकूट मायेनें पोरीला फसवितोस काय?

अतुलचंद्र—(त्याची तरवार फेंकून) जा, तुला जिवदान देतों. कोणी फसविलें याचा उलगडा तुझी बहीण करील. (पुढेंच येऊन) आश्चर्य! ही कमला व तो वीरसेन! हा इथें आला कसा? असो. इथें थांबून अर्थ नाहीं (कांहीं पावलें चालून) पण मणिकपाल कोठें आहे? (इकडे तिकडे पाहून) अरेरे! तो तिकडे मूर्छित पडला आहे वाटतें! [जातो.]

वीरसेन—यापेक्षां मरण पुरविलें.

पद—(होईल कलह०) चालीवर.

अभिभव पुनरपि झाला ॥ काय करूं फुटक्या
नशिबाला ॥ धृ० ॥ युद्धचतुरता परिचित
मजला ॥ पावलि संप्रति परि लोपाला ॥ चपल
भुजंगम निजभक्ष्याला ॥ जैसा करि दंशाला ॥
अवचित हरिलें तेंवि असीला ॥ १ ॥

(कपाळ ठोकतो) आणि तशांत ही कारटी!--(तिच्या जवळ जाऊन) या कृत्याचा जबाब दे.

कमला—(केंस मागें सारून व ताठ उभी राहून) कसला जबाब

मागतोस?

वीरसेन--कसला? अग कुळाला बट्टा लावणारे पोरी, आपल्या नखरेबाज मुरडण्यानें त्या अतुलचंद्राला तूंच तर भुलविलें नाहींस ना?

कमला—त्यावर माझं प्रेम आहे त्याला मी तरी काय करूं?

पद—(शिवाले युक्त०) चालीवर.

अनिवारें त्याकडे हें मन माझें ओढतें ॥
नच सत्या बंधुराया तुजपाशीं लपवितें ॥
वडिलार्जित वंशवैरा पदतलिं मी तुडवितें ॥
शुभदिन तो गणिन त्याशीं होइल जैं लग्न तें ॥१॥

वीरसेन--कमले, केवढें हतभाग्य तुझें? ज्यानें तुझ्या भावाचा व अंगध्वज काकांचा नुकताच पराभव करून अशी अप्रतिष्ठा केली कीं त्याचा मोबदला नुस्ता रक्तपात, व ज्याचें लग्न पौलोम राजाच्या इंदिरेशीं ठरून वाग्निश्चय ही झाला त्यावर तुझें हें निःसीम प्रेम पालथ्या घागरीवर पाणी ओतल्याप्रमाणें नव्हें काय?

कमला—(निराशेनें) अग आई! त्या मेलीशीं जुळलंय का? (एकदम त्वेषानें) कारे दादा, मी इथं आहे हें तुला रे कसं कळलं?

वीरसेन—(स्वगत) हिला प्रमिलेचें नांव सांगून उपयोग नाहीं. (उघड) कोणीसें सांगितलें खरें, आठवत नाहीं.

कमला—अरे चांगली आठवण कर. असा बळेंच कां विसरतोस? तें माणूस बहुशा मी वहीम धरतें तेंच असेल.

वीरसेन--प्राण गेला तरी मला त्याची आठवण यायची नाहीं.

कमला—अं:! जाऊं दे तें! चल घरीं जाऊं.

वीरसेन--हकीकत समजल्या शिवाय? अग भामटे!

कमला—एकदां सांगितलं ना कीं अतुलचंद्रावर माझं मन बसलं आहे?

वीरसेन—(दांत ओंठ चाऊन) अरेरे! काय करूं? अंगध्वजाचें एवढें अरेरावी नांव पण ही कुलटा! अग जारिणी, हें तुझें वेड सुटत नाहीं ना?

कमला—हवं तेवढं कपाळ बडवून घे. मी साफ सांगतें, नाहीं,

नाहीं, नाहीं.

वीरसेन—तर मग तूं मला भयंकर कृत्य करायला लावणार!

कमला—अहाहारे! उजेड पडला तुझ्या शौर्याचा! स्त्रियेवरच हात ना?

वीरसेन—पण ती स्त्री बेफाम झाली तर काय करावें? शैलेशाच्या मुलाशीं लग्न, आणि वाग्निश्चय झाल्यावर? वाहवा ग दिवटे!

कमला—होय. खटपट करणं आपलं काम आहे.

पद—(नोहे नारी ही०) चालीवर.

आहे प्रणयाला वारणशक्ती ॥ येउत विघ्नें तीं ॥
दुर्लभ यश मिळवितां प्रयत्नें लाभे तोष आणि
कीर्ती ॥ धृ० ॥ कोठें अतिसुंदर मुख कमलेचें ॥
विकृत इंदिरेचें ॥ होवुत वाग्निश्चय लग्नाचे ॥
बहुत तिचे त्याचे ॥ तेणें उद्यम मम होतिल
सनिचे ॥ शतपट जोराचे ॥ खरें प्रेम जाणता
तरी तूं उच्च हास्य करता व्याघातीं ॥ १ ॥

तुझ्या सारखं पैशापुरतं प्रेम नाहीं हो! (त्याकडे टक लावून पाहते.)

वीरसेन—(गोंधळून) खासें उत्तर! तूं महा हट्टी आहेस. हा तुझा पक्का निश्चय झाला का?

कमला—होय.

वीरसेन—(चवताळून) पण जाणून ठेव कीं या कृत्यांत मी लाखों अडथळे आणीन.

कमला—आणि तूं ही लक्ष्यांत ठेव कीं ही कमला तुझा एक ही अडथळा चालूं देणार नाहीं.

वीरसेन—तूं मला अगदीं तुच्छ करून बोलतेस, कमले? (दांत ओंठ खातो.)

कमला—तूं मुकाट्यानं आपलं काम कर नी मला वाटेल तें मी करीन. मी कांहीं लहानसं कुकुबाळ नव्हे कीं तुझ्या डुरकावणीला भिऊन जाईन. शैलेशाच्या मुलावर प्रेम करून मी तुमच्या अभिमानाच्या

कुळाला बट्टा लावला म्हणतोस? अहाहा ग बयो! तुम्ही तर मोठे कुळदीपक अहांत, मग सांगाना कोणते दिवे लावलेत ते? त्या मेल्या बाजारबसव्या कस्तूरचंद सराफाच्या मुलीवरच घिरट्या घालता ना? अतुलचंद्राच्या राजकुळापेक्षां सराफ मोठा कुलीन झाला नाहीं बरं? आणि या तुमच्या वाग्निश्चयाला अंगध्वज काकांचा रुकार असेलच? झालंच तर. काळच असा आला आहे कीं पूर्वीच्या कुळाभिमानाच्या दंतकथा अंतराळीं भिरकावून देऊन आपमतलबाची गोष्ट असली ह्मणजे आमच्या कुळांतील लोकांनीं मन मानेल तसं नाचावं. तेव्हां माझा जीव जर अतुलचंद्राच्या आलिंगनाकरितां तडफडतो आहे तर तें मिळविण्याची मी कां खटपट करूं नये? दादा, आणखी एक तुला सांगायचं आहे तें हें कीं प्रमिलेसंबंधीं जे तूं मनांत मांडे खातो आहेस तें एका पळांत नाहींसं करून टाकणं माझ्या हातीं आहे, समजलास?

वीरसेन—हां! तरी मला वाटलेंच होतें कीं तुझ्या बोलण्याला एवढा जोर यायला कारण दुसरें नाहीं.

कमला—अरे तुला असं कसं वाटणार नाहीं? चोराच्या जिवाला चोरी पचेपर्यंत भयच असतं. त्या म्हाताऱ्या सराफाच्या व त्याच्या मुलीच्या कानांत जर तुझं इंगित सांगितलं कीं वीरसेनाचं प्रमिलेवरील प्रेम केवळ ढोंगाचा बाजार आहे, त्याचं खरं प्रेम तुमच्या संपत्तीवर आहे आणि ती एकदां घशांत उतरली कीं राजश्रीला प्रमिला नकोशी झाली, तर काय परिणाम होईल? (त्याकडे टकलावून व खाकरून) कसं काय दादा, यावर काय म्हणणं आहे आपलं?

वीरसेन—अरेरे! अंगाची लाही लाही झाली. चांडाळणी, तुला एकदम मारून टाकलें तर काय होईल?

कमला—सोपं उत्तर. एक तर असल्या घोर पातकानं सात जन्म नरकांत सडशील; दुसरं अतुलचंद्र सगळ्या गांवांत डांगोरा पिटील कीं वीरसेनानं आपल्या बहिणीचा खून केला; आणि तिसरं लोक भलभलत्या कल्पना घेतील,—कदाचित् असं ही ह्मणतील कीं बलात्काराला वश झाली नाहीं म्हणून भयानं वीरसेनानं कमलेला ठार केलं.

वीरसेन--(निराश होऊन) पुरे, पुरे, पुरे! माय गंगे, हात टेकले तुझ्या पुढें. हे कान फुटून गेले असते तरी बरें झालें असतें. अतुलचंद्राविषयीं तुझें मन पालटत नाहीं ना?

कमला—नाहीं.

वीरसेन—या वीरसेनानें तुझ्या पायांवर लोटांगण घातलें तरी नाहीं?

कमला--मी कांहीं ती भोळी प्रमिला नव्हे कीं या गुळगुळथापटीनं तूं भोंदून घेशील. मी अतुलचंद्र लाभण्याविषयीं खटपट करणार व यश मिळविणार. (त्याचा हात धरून विहिरीवर नेते.) हिकडं ये; अतुलचंद्राचं इंदिरेशीं लग्न लागणार नाहीं, माझ्याशीं लागेल. आणि जर तो शेवटपर्यंत नकार ओढील तर मी त्या दोघांना बळी पाडीन व नंतर आपल्याला मारून घेईन, हें मी शपथेवर सांगतें. या विहिरींत वास करणारे देवदूत असोत अगर पिशाचं असोत, त्यांनीं ही गोष्ट टिपून ठेवावी आणि अनुभवास उतरतें कीं नाहीं पहावं.

वीरसेन--(थिजून जाऊन) अग कमले, हें त्रिकाळ कृत्य बरें!

कमला--असेल कदाचित्. आणि त्याचा परिणाम ही तसाच होणार असेल,--कोण जाणें!

वीरसेन--(भांबावून) कमले, तुझ्या कारभारांत हात घालणें मला भाग आहे. दुर्दैवी मुली, तूं एकटी काय करशील?

पद—(आज बाजत॰) चालीवर.

जरि करिशिल बहुविध मनधरणी ॥
तरि एकलि फसशिल स्वैरपणीं ॥धृ०॥
कुटिल वागुरा पसरुनि मी तो ॥
नृपतितनयखग धरिन झणीं ॥ १ ॥

कमला—(आनंदानें) ठीक, दादा. आतां रस्त्यावर आलास. चल तर याचा विचार करूं.

[जातात.]

प्रवेश ५ वा.

स्थळ—प्रतापनगरांतील एक हलक्या प्रतीच्या लोकांचा भटारखाना.

[भीमशौर्य व भालचंद्र उभे आहेत असा पडदा पडतो.]

भीमशौर्य—(वेष बदललेला असून) अशा तऱ्हेनें त्या अंधारी नदींत बुडून मेलों अशी वार्ता चोहीकडे पसरली ही एक फायद्याची गोष्ट झाली; कारण मला आतां या वेषांत गुप्तरीतीनें अतुलचंद्राचें संरक्षण करता येतें. तीव्रवज्र खोट्या कागाळ्या करीत असतांना वाड्याच्या खिडकींतून डोकावून पाहणारा मीच. देवीच्या देवळाजवळ मणिकपाल, अतुलचंद्र, कमला व वीरसेन यांचा प्रकार मीच लपून पाहिला. मणिकपाल कमलेशीं फितूर आहे; रुपयांची चोरि ही त्यानेंच केली.

भालचंद्र—आणि असें असून ही धनीसाहेब त्याजवर फार प्रेम करतात. त्यानें त्यांना काय सांगितलें नकळे, ते आतांशा माझ्याशीं अलिप्त असतात.

भीमशौर्य—असूं दे. पण उद्यां मला याचवेळीं इथें भेट. बोभाटा करूं नकोस.

भालचंद्र—त्याविषयीं खात्री ठेव. [वचन देतो व जातो.]

भीमशौर्य—या कृत्यांत जर मला यश आलें तर पुन्हा भीमखिंडींत तोंड दाखवायला थोडी तरी उजागरी होईल, असो. (जेवायला बसतो. व पडद्याकडे पाहून) कोण तो? वीरसेन वाटतें! कशाला बरें येत असेल? (जेवूं लागतो. वीरसेन व त्याचा मित्र प्रवेश करतात.)

वीरसेन—आज हा भटारखाना रुक्ष कां? (भटारखानेवाला येतो.)

मित्र—अरे शराबीचे दोन पेले आण. (२ रुपये देतो. तो जातो.)

वीरसेन—(हळूंच) या जंगली मनुष्याविषयीं तुला काय वाटतें?

मित्र—जमेल तर पहा. मला वाटलें पांच, सहा माणसें मिळतील इथें.

वीरसेन--उं:! याच्याविषयीं तर जमवून पाहूं? तें काम उद्यां

रात्रीं आहे. पुष्कळ वेळ आहे. (भटारखानेवाला दारूचे पेले देऊन जातो.)

मित्र—भल्या मनुष्या, तूं शहरचा रहिवासी दिसत नाहींस.

भीमशौर्य—मी खेड्यापाड्यांतला आहे.

वीरसेन—इथें येण्याचें कारण?

भीमशौर्य—नोकरीकारितां.

वीरसेन—(मित्राकडे पाहून) कोणती नोकरी करणार, कीं मिळेल ती?

भीमशौर्य—मिळेल ती. टीचभर पोटाची खांच भरली कीं झालें.

वीरसेन—शाबास! हें बघ, त्या वाळल्या तुकड्यापेक्षां हा दारूचा पेला घेईनास?

भीमशौर्य—दारूचा पेला ह्मणजे त्याची कांच देता कीं काय? माल तर तुह्मीच गट्ट केलात.

मित्र—अरे नीट पहा, त्यांत अर्धा पेला अजून शिल्लक आहे.

भीमशौर्य—हंः! ती आपणच प्या. त्या काशीच्या तीर्थानें माझी काया गटारांत पावन व्हायला नको.

मित्र--यानें तर टरच मांडली, मित्रा!

वीरसेन--मर्जी तुझी. हें बघ एक आमची नोकरी आहे. आणि त्याबद्दल हे घे तुला दहा रुपये अगाऊ. (तसें करतो.)

भीमशौर्य--अगाऊ? ह्मणजे? तुमचें काम भयंकर तर नसेल ना?

वीरसेन--छे, छे. काळजीचें आहे. मग हो कीं ना? आम्हाला वेळ नाहीं.

भीमशौर्य—(डोकें खाजवीत) पण मी या गांवांत परका आहे--

वीरसेन--वाः! उत्तम.

भीमशौर्य--पण त्या कामाची खोली रुंदी तर कळूं द्या.

दोघे मित्र--ठीक आहे. इकडे ये. (तिघेजण कुजबुजतात.)

भीमशौर्य--एवढेंच का? उंः, क्षुल्लक बाब आहे. कबूल.

वीरसेन--तर मग हे घे आणखीं दहा रुपये. (ते घेतो.) आम्ही जातों आतां. नेमल्यावेळीं येशील ना?

मित्र—पहारे बोवा, फसवशील नाहीं तर!

भीमशौर्य—छे, छे महाराज, जरूर जरूर येतों. (दोघे जातात.) जा गद्धयानों. त्या देवळाच्या खिडारांत तुम्ही अतुलचंद्राचें व कमलेचें जबरदस्तीनें लग्न लावणार काय? ठीक. भालचंद्र आल्यावर याची तोड काढूं. [जातो.]

प्रवेश ६ वा.

—:*(*)*:—

स्थळ—पौलोमवाड्यांतील एक खोली.

[अतुलचंद्र कोचावर उदास बसला आहे.]

अतुलचंद्र—विचार करून बघतों तों तों मति अधिक कुंठित होते.

पद्य—(ठेउनि प्राण०) चालीवर.

सांगड क्रूर पिशाचांची ॥ छळिते खास
मला ॥ धृ० ॥ अद्भुत विस्ताची चोरी ॥
काममूढ कमला दुसरी ॥ अवचित वीर-
सेनफेरी ॥ सूख करी ॥ अति कुटिला ॥१॥

(भालचंद्र येतो) काय आहे रे?

भालचंद्र—पत्र.

अतुलचंद्र—(पाहून आनंदानें) प्रिय सखी इंदिरेचें पत्र हें! (फोडून वाचतो.)

"श्रीमत् सकलगुणालंकृत मत्प्राणवल्लभ अतुलचंद्र महाराज यांचें चरणसेवेसी, आपलं पत्र वाचून अत्यानंद झाला. उत्तर देऊं नये असं माईसाहेबांचं मला सांगणं झालं आहे. तरी हे दोन शब्द चोरून लिहीत आहे. आपल्या चरणरजांची सदैव सेवा इच्छिणारी दासी इंदिरा."

अहाहा!

पद—सोहनी-त्रिताल.

(देखुवेखु मन ललचाय०) चालीवर.

वीतचिंत अंतर होइ ॥ युवतिलिखित हृदयिं
बहुत तोष देइ ॥ धृ० ॥ प्रेमाशंकी कुतर्क होते ॥
येत सदा ॥ कुटिल पळति सकल पाहि ॥
वीतचिंत० ॥ १ ॥

(पत्र पुन्हा वाचतो) "उत्तर देऊं नये असं माईसाहेबांचं मला सांगणं झालं आहे". कां बरें? (उदास होऊन) फितुराचें देव्हारें माजलें आहे खास; वाटतें कीं एकवार,

पद—(मरण बरें०) चालीवर.

त्वरित गृहीं जाउनी ॥ उपाधितें काढावें शोधुनि ॥धृ०॥
आज्ञा नाहीं परि वडिलांची ॥ स्वेच्छाचारें पडेल साची ॥
धार ज्वलनावर तैलाची ॥ टाकिल मजसी जाळुनी ॥१॥

तेव्हां बाबांच्या पत्राची वाट पाहणें भाग आहे. (थांबून) कोणीं दिलें रे हें पत्र?

भालचंद्र—तें मजसमोर फेंकून तो मनुष्य मागल्या पायींच पळाला.

अतुलचंद्र—पण तो कोण होता?

भालचंद्र—(गोंधळून) अं—अं—ओळखीचा दिसला नाहीं.

अतुलचंद्र—(रोखानें) तो कांहीं बोलला नाहीं?

भालचंद्र—(घाबरून) नाहीं सरकार.

अतुलचंद्र—त्यानें याबद्दल इनाम बिनाम मागितलें नाहीं?

भालचंद्र—नाहीं. (भेदरून जातो.)

अतुलचंद्र—(त्याकडे टक लावून पाहून साशंक) पण मी तुला हें पुसतों,—कांहीं नाहीं. जा. मणिकपालाला धाडून दे. (जातो, मणिकपाल येतो.) काय मित्रा, मणिकंटकाविषयीं आणखी कांहीं माहिती?

मणिकपाल—कांहीं नाहीं. पूर्वीपेक्षां त्याचें वर्तन आतां अगदीं साळसूद आहे.

अतुलचंद्र—(थांबून) भालचंद्र इतक्यांत इथें होता. बोलतांना त्याची भांबावलेली वृत्ती पाहून मी चकित झालों. तो माझ्या डोळ्याशीं डोळा मिळवीना. परमेश्वर करो नी त्या विश्वासू नोकराविषयीं मनांत कल्पना न येवो. पण तूं असा साशंक कां दिसतोस?

मणिकपाल—हें ऐकून वाईट वाटतें आणि मनांतला संशय दुणावतो.

अतुलचंद्र—आं! स्पष्ट सांग.

मणिकपाल—कसें सांगूं?. आपले दांत नी आपलेच ओंठ.

अतुलचंद्र—आढेवेढे पुरे कर. लवकर सांग.

मणिकपाल—काल रात्रीं बाराच्या सुमारास वाड्याच्या फाटका बाहेर भालचंद्र एका अगडबंब मनुष्याशीं सल्ला मसलत करीत होता. मी फाटकाच्या आंत असल्यामुळें त्यांचें बोलणें बरोबर ऐकूं आलें नाहीं.

अतुलचंद्र—तो अगडबंब कोण होता?

मणिकपाल—तो झाडाच्या छायेंत होता म्हणून ओळखतां आलें नाहीं.

अतुलचंद्र—मला येऊन उठवायचें असतेस मणिकपाला!

मणिकपाल—भालचंद्र असें करील हें स्वप्नांत देखील वाटलें नव्हतें.

अतुलचंद्र—शिव, शिव!

पद—(मजवरि हें आलें०) चालीवर.

निरसन नच होती ॥ वाढति उलट्या ॥ आशंका गहना ॥ धृ० ॥ मणिकंटक जरि तस्कर नोहे ॥ समजुं भालचंद्रा कां तरुणा ॥ चौर्य करील असें ॥ न भासें ॥ हृदया विश्वासें ॥ पथिकाश्रमिं चंदन-दासाच्या ॥ वांचविलें मज करुनि सुयत्ना ॥ १ ॥

(थांबून) किंवा मणिकंटक व भालचंद्र यांचें संगनमत तर नसेल? तुझी खात्री आहे कीं त्याच्याशीं बोलणारा मणिकंटक नव्हे?

मणिकपाल—त्याला बाहेर जाण्याची गरज नव्हती, दोघांची नि-

जायची खोली एकच. शिवाय तो मनुष्य इतका धिप्पाड होता कीं राक्षस म्हटला तरी चालेल.

अतुलचंद्र—हें फारच भयंकर आहे. आतां असें कर. आज रात्रीं पुन्हां पाळत ठेव, व त्या दोघांची भेट झाल्या बरोबर मला कळीव म्हणजे मी त्यांना पकडतों. तथापि मणिकंटकाविषयीं हयगय करूं नकोस; कारण देवीच्या देवळाजवळ घडलेल्या प्रकारावरून असें वाटतें कीं कमला व वीरसेन यांना तो सामील आहे.

मणिकपाल—आपला तर्क बरोबर आहे. आपण तेथें जाणार हें कमलेला मणिकंटका खेरीज दुसऱ्या कोणी सांगण्याचा संभव आहे?

अतुलचंद्र—किंवा कदाचित् आमच्या भालचंद्रावसाहेबांनींच सांगितलें असेल? हळूंहळूं सर्व खुलासा होईल. तूं जा व सांगितल्याप्रमाणें पाळत असूं दे. [जातो.] त्या एकनिष्ठ सेवकाची शंका घेतांना काळीज कसें चर्र होतें. पुन्हा,

पद—(वीर शिरोमणि०) चालीवर.

भालचंद्र भेटला जया तो असे पत्रवाह का? ॥
वृथा का दूषवितों सेवका? ॥ धृ० ॥ असता
मिळुनी जरि तो परका मदीय सुखघातकां ॥
तया देति ना पत्र कामुका ॥ चाल ॥ जरि
म्हणूं नये मद्विषयक आहे दगा ॥ तरि भालचंद्र
भांबावुनि बसतो उगा ॥ पुसतांना कांहीं प्रश्न
गणुनि त्या सगा ॥ चाल ॥ निर्णय करुनी
बघतों बहु परि बुद्धिमांद्य ये फुका ॥ करते
विटंबना मज मुका ॥ १ ॥

(उदास बसतो.)

मणिकपाल—(प्रवेश करून स्वगत) अरे, अरे, दुःखानें होरपळला बिचारा! पण मी काय करूं? दाम करी काम ना? अतुलचंद्रा, या पत्रानें तूं जास्त घोटाळ्यांत पडशील. (घाईनें जवळ जाऊन उघड) धनीसाहेब, हें घ्या पत्र.

अतुलचंद्र—(घेऊन) कोणी दिलें हें?

मणिकपाल--मी आतां खालीं देवडीवर गेलों होतों तों तिथें कोनाड्यांत हें पडलेलें दिसलें.

अतुलचंद्र—(विस्मयानें) हा दुसरा चमत्कार! [मणिकपाल जातो.]

अतुलचंद्र—(पत्र वाचतो.)

"श्रीमत् युवराज अतुलचंद्र यांस. लेखक लबाड विश्वपालाचा शत्रू आहे. आज रात्रीं ऐन बाराचे सुमारास आपण शहराबाहेरील विहारटेकडीपाशीं एकटें यावें ह्मणजे तो भेटेल. व जें कांहीं आपण स्वतःच्या व कुळाच्या संरक्षणाकरितां केलें पाहिजे तें कळेल." (उठून शंकेनें) हा घुशीचा सापळा कीं यांत कांहीं अर्थ आहे? पत्रांत कमलेचा संबंध तर दिसत नाहीं, लेखक कुलाचें संरक्षण ह्मणतो! (थांबून) असो. जावेंच. [मणिकपाल लगबगीनें येतो.] कांहीं नवीन बातमी?

मणिकपाल— भालचंद्र वाड्याबाहेर केव्हां पळाला हें कळलें देखील नाहीं.

अतुलचंद्र--आं! (स्वगत) या पत्राशीं त्याचा संबंध तर नसेल? (उघड) तो आला ह्मणजे मला जागें करायला ये. पण मी बिछान्यावर सांपडलों नाहीं तर आश्चर्य मानूं नकोस कारण मला एका ठिकाणाची शंका आली आहे तिकडे मी त्याला शोधायला जाईन. जा तर. [मणिकपाल जातो. वर पाहून] प्रहर रात्र झाली असेल नाहीं का? चंद्र तर बराच वर आला.

साकी.

रजनीपरिणेत्या चंद्राच्या करधारासंपातें ॥
भूमंडल हें उज्वल होउनि हृदयंगम बहु होतें ॥
नक्षत्रें वरती ॥ हीरकसदृश लकलकती ॥ १ ॥

[जातो.]

प्रवेश ७ वा.

—:–|※❀※|–:—

स्थळें—शहरांतील रस्ता, गांवाबाहेरील विहारटेकडी, व देवीचें पडकें देऊळ (पूर्वोक्त.)

[वेष पालटलेला भीमशौर्य व भालचंद्र येतात.]

भालचंद्र—मित्रा, झुकांडी देऊन आलों खरा पण माणिकपाल बोंब केल्यावांचून राहायचा नाहीं.

भीमशौर्य—करूं दे केली तर. पुढें पाहतां येईल.

भालचंद्र—लागणारें सामान बरोबर घेतलेंस काय?

भीमशौर्य—हे दोन दोरखंड घेतले आहेत ते विहिरींत उतरतांना लागतीलच. आणि तसाच वेळ आला तर आपल्या जवळ तरवारी आहेतच. पण तूं भुतांला भित नाहींस ना?

भालचंद्र—धन्याच्या संरक्षणापुढें मला कशाची भीती नाहीं.

भीमशौर्य—(चाहूल ऐकून) कोणी आपल्याला शोधायला येत आहे वाटतें. पळा इथून. [पळून जातात तोंच अतुलचंद्र प्रवेश करतो.]

अतुलचंद्र—इकडूनच गेले ते. त्यांतला एक भालचंद्रच होय. त्याला शोधून मग विहारटेकडीकडे जातों. [जातो. विहारटेकडीचा पडदा उघडतो. वीरसेन व त्याचा पूर्वोक्त मित्र उभे आहेत.]

वीरसेन—बाग वाजून गेले. तो इतक्यांत येईल.

मित्र—मी इथें राहतों. तूं पुढें जाऊन तयारी ठेव. लोक लपले आहेत पण काल भटारखान्यांत भेटलेला तो जंगली मनुष्य आला नाहीं.

वीरसेन—फसविलें बेट्यानें.

मित्र—उं:! हरकत नाहीं. लवकर जा. [तो जातो. अतुलचंद्र प्रवेश करतो त्याला रामराम करून] यावें, ठीक वेळेवर आलांत.

अतुलचंद्र—लेखक तुम्हीच काय?

मित्र—मीच. हें पहा मी असें म्हणत होतों कीं—(इतक्यांत ल·

पलेले शिपाई अतुलचंद्राला पकडतात व त्याची तरवार हिसकतात.)

अतुलचंद्र—दगा! विश्वासघात हा!

मित्र—चुप रहा. [पडदा पडतो.] [नंतर देवीच्या देवळांत एकीकडे अतुलचंद्र उभा आहे, त्याच्या समोर पिंवळें लुगडें नेसलेली कमला उभी आहे, मध्यें लग्नाचा अंतरपाट आहे, बाजूला भट आहे, जवळ वीरसेन व त्याचा मित्र आहे, लग्नसाहित्य भुईवर पडलें आहे व सभोंवतीं शिपाई उभे आहेत असा पडदा उघडतो.]

वीरसेन—कमलेशीं लग्न कीं मरण—कोणतें कबूल?

अतुलचंद्र—सांगतों, पण अगोदर ही मजसमोर हेडंबा उभी आहे! बेशरम हडळ! तुझें माझ्यावर प्रेम आहे नाहीं बरें? पण मी जर लग्न नाकारलें तर माझा मुडदा आनंदानें बघायला तूं तयार आहेस! वाः! एकूण प्रेम म्हणजे द्वेष आणि द्वेष ह्मणजे द्वेष असाच शद्बांचा अर्थ झाला. यावरून माझें उत्तर जाणून घ्या, आणि तुम्हाला वाटेल तसें करा. (भिंतीशीं टेकून उभा राहतो.)

वीरसेन--विचार कर; इथें तुझा कोणी त्राता नाहीं.

अतुलचंद्र—तो सर्वशक्तिमान परमेश्वर आहे.

वीरसेन—पांडित्य नको. उत्तर पाहिजे.

अतुलचंद्र--देऊन चुकलों आहे. [जवळच्या तरवारीवर झडप घालतो पण साधत नाहीं. सर्वजण त्याच्या डोक्याजवळ तरवारी नेतात. इतक्यांत विहिरींतून भयंकर आरोळ्या येतात. सर्व घाबरून पळूं लागतात. कमला वीरसेनाला खेटते. अतुलचंद्र पळून जातो. पडदा पडतो. भीमशौर्य व भालचंद्र बाहेर येतात.]

भीमशौर्य--टाळी दे.

भालचंद्र—(तसें करून) युक्ती तर खूप साधली.

भीमशौर्य—अतुलचंद्राचे मागाहून तूं जा.

भालचंद्र—आपण मिळूनच जाऊं. उद्यां सरकार रागावले तर मी काय सांगू?

भीमशौर्य—खरा प्रकार सांगू नकोस. कारण याचें मूळ भीम-

खिडींत आहे तें उपटल्याखेरीज कांहींच उघड करायचें नाहीं.

[जातात.]

प्रवेश ८ वा.

स्थळ—पौलोमवाड्यांतील अतुलचंद्राची खोली.

[अतुलचंद्र कोचावर बसला आहे.]

अतुलचंद्र—ईश्वरी लीला अगाध आहे! काल रात्रीं सुटका होईल अशी आशा होती का?

पद—परज-त्रिताल.

(द्रितन तन द्रितन०) चालीवर.

पतित शरण चरणीं विबुधा ॥ विस्तरिलें घातुक वागुर रिपुजनिं ॥ अकपट वरतुनि ॥ तडाग जैसें प्रशांत दिसतें ॥ पृष्ठभागिं परि अंतरिं असतें ॥ नक्रें संकटमय शतधा ॥ धृ० ॥ सुटलों तेथुनि अतर्क्यरीतीं ॥ आशा स्वप्नीं देखिल नव्हती ॥ मृत-पुरुषाच्या वदनीं स्रवली अवचित जेविं सुधा ॥१॥

(मणिकपाल येतो.) भालचंद्राबद्दल काय ह्मणत होतास तूं?

मणिकपाल—रात्रीं आपण थकून भागून आल्यानंतर सरासरी दोन तासांनीं तो लपत लपत येऊन निजून राहिला.

अतुलचंद्र—त्याला धाडून दे. (तो जाऊं लागतो इतक्यांत) अरे, तूं स्वतांच त्याला घेऊन ये. [जातो व त्याला घेऊन येतो.] भालचंद्रा, काल रात्रीं तूं वाड्यांतून पळालास?

भालचंद्र—(गांगरून जाऊन) होय धनीसाहेब.

अतुलचंद्र—मी तुला पाहिलें.

भालचंद्र—आपण पाहिलें? कोठें?

अतुलचंद्र—एका बोळांतून जातांना. तूं आपल्या सोबत्याला विचारिलेंस "लागणारें सामान बरोबर घेतलें काय." खरें ना? जबाब दे.

भालचंद्र—(मणिकपालाकडे साशंक पाहत) सरकार, एकांतांत सांगतों.

अतुलचंद्र—(रोखानें) नाहीं. या विश्वासू मणिकपालाच्या देखत सांगितलें पाहिजे.

भालचंद्र—(पुन्हा मणिकपालाकडे पाहून स्वगत) विश्वासू?

अतुलचंद्र—तुझ्या उत्तराकरितां खोळंबलों आहे.

भालचंद्र—इतक्यांत सांगूं शकत नाहीं. पायां पडतों, दरडावूं नका.

अतुलचंद्र—या टाळाटाळीनें तुझ्या अंगीं गुन्हा लागूं पाहतो.

भालचंद्र—गुन्हा! (त्रस्त मुद्रेनें) माझें वर्तन वहीम येण्याजोगें दिसतें खरें.

अतुलचंद्र—याचे भयंकर परिणाम होतील. ऐक. मी झोपेंत असतांना खोलींत पत्रें येऊन पडतात, पेढीहून आणलेले रुपये चोरीस गेले, इतर अनेक विचित्र प्रकार घडले, माझी रोजची हालचाल चोरांना कळते व तूं भलत्या रात्रीं अनोळखीच्या मनुष्याशीं कारस्थानें करतोस,—यावरून मी काय तर्क करावा? तुझ्या विषयीं मनांत कुत्सित कल्पना येणार नाहींत काय?

भालचंद्र—(हात जोडून) येतील. तरी माझ्याविषयीं एकदम ठाम मत करूं नये.

अतुलचंद्र—नेरवाच्या रात्रीं फाटकाजवळ तूं कोणाशीं बोलत होतास? व बोलतांना झालेल्या चोरीचें व कमलेचें नांव घेतलेंस?

भालचंद्र—आं! आणि या गोष्टीचा बोभाटा झाला तर?

अतुलचंद्र—अहो राजश्री, उद्दामपणानें उलट मलाच विचारतां याची तुम्हाला शरम?

भालचंद्र—(मणिकपालाकडे बघत) घरांत उंदरांचा सुळसुळाट फार झाला तर मग!

अतुलचंद्र—खबरदार जास्त बोलशील तर! जबाब दे.

भालचंद्र—विचार करायला तरी एक तासाची फुरसत मिळावी. (हात जोडतो.)

अतुलचंद्र—जा. एक तासानंतर सांगितलें नाहींस तर पाठीची चांबडी लोळवीन हां! [तो जातो.] मणिकपाळा, या प्रकरणांत तुझें काय मत आहे?

मणिकपाल—महाराज मी कोणाचें उगीच नांव घेत नाहीं.

अतुलचंद्र—तूं तसाच आहेस. बरें जा व तो काय करतो आहे हें लपून पाहून ये. [तो जातो व पुन्हा कांहीं वेळानें प्रवेश करतो.]

मणिकपाल—आपले कपडेलत्ते घेऊन भालचंद्र पळाला.

अतुलचंद्र—काय म्हणतोस? तर मग त्याच्या खेराज चोरी झाली नाहीं हें खचित. अरे, अरे! पैशाबद्दल मला तेवढें वाईट वाटत नाहीं, त्याच्या कृत्याबद्दल वाटतें. एवढें खेरीजकरून बाकीचें आजपर्यंतचें त्याचें वर्तन पाहिलें तर तसा मनुष्य दुर्मीळ. हर, हर! इतःपर मनुष्यस्वभाव कितीही चांगला दिसला तरी त्यांत शाश्वत मानूं नये.

पद—ललत-त्रिताल.

(रैनका सपना०) चालीवर.

मनुजाची प्रकृती ॥ चंचल किति असे ती ॥ धृ० ॥ इच्छा अवलोकन करण्याची ॥ असेल जगतीं ज्या कोणाची ॥ दाविल त्याला मम भृत्याची ॥ विरोधपूर्ण कृती ॥ १ ॥

मणिकपाल—बरें पण आतां पुढें कसें? चावडीवर जाऊन कळवूं काय?

अतुलचंद्र—छे, छे!

साकी.

**शल्यरूप घेउनी तयाची सदसद्विवेकशक्ती ॥
क्षतें करिल हृदयाला जेव्हां जाणावी शिक्षा ती ॥
न्यायसभाभवनीं ॥ खेपा घालाव्या कोणी? ॥१॥**

मणिकपाल--ठीक आहे. बरें पण सरकार काल रात्रीं आपण आलां तेव्हां असे त्रस्त कां होतां?

अतुलचंद्र--(त्रासानें) ती गोष्ट पुन्हा काढूं नकोस. (दारावर कोणी हांक मारतो. मणिकपाल जाऊन पत्र घेऊन येतो. व परत जातो. अतुलचंद्र पत्र फोडून वाचतो.)

"आशीर्वाद विशेष. तुझीं पत्रें पावलीं. उत्तरा दाखल या वाटाण्याच्या अक्षता पाठविल्या आहेत. दीड लक्ष रुपयांच्या चोरीचा तुझ्या इतर अनन्वीत कृत्यांशीं संबंध दिसतो, दुसरें कांहीं नाहीं; ह्मणून इंदिरेविषयीं मनांत मांडे खाणें सोडून दे. तूं तिच्या प्रेमाला अगदीं अपात्र झाला आहेस. तरी हें पत्र पावतांच प्रतापनगर सोडून आपल्या समुद्रकिनाऱ्यावरील खेड्यावर जा; तेथील गंभीर देखाव्यानें तुझा विवेक प्रखर होऊन कृतकर्माचा तुला पश्चात्ताप झाल्या खेरीज मी तुझें तोंड पाहूं इच्छित नाहीं. कळावें हा आशीर्वाद. सही राजा शैलेश." (रडूं लागतो व कोचावर पडतो) हर, हर, परमेश्वरा, मी अनाथ गरीब बापडा आधींच फुंकून पाऊल टाकीत असतां, माझ्यावर असले आरोप कां यावेत बरें? इंदिरेची माझी ताटातूट खरीच होईल काय? अरेरे, तिच्या वांचून माझे प्राण अंतराळीं गिरकांड्या खातील!

पद--भैरव--त्रिताल.

(अब न जगावो०) चालीवर.

गमत मनाला पत्र नोहे ॥ लावुनि शाणीं पाठविली असि, हृदय चिराया तीक्ष्ण लोहें ॥ ध्रु० ॥ प्रहार वज्राचे जोराचे ॥ सहनशक्य नसती नयनीं खळखळ जल वाहे ॥ गमत० ॥ १ ॥

(एकदम हुरुप आल्यासारखें करून व उठून) अरे पण मी असा रडतो कां? मला कशाची भीती आहे? बाबा, समुद्रकिनाऱ्यावर जात नाहीं; घरीं येऊन उलगडा करतों.

साकी.

तातकल्पना निरसिन तदुपरि घेइन मी विश्रांती ॥

क्षणमात्र वृथा वेळ खर्चणें नाहिं उचित या प्रांतीं ॥
कामें आटपुनी ॥ निघतों येथुनि तृतिय दिनीं ॥ १ ॥

[जातो.]

मणिकपाल—(लपत लपत येऊन व तो गेला हें पाहून) फोडणी तर छान बसली. आणखीं मी ही त्यांत मिरच्याची पूड घालतों. आज संध्याकाळपर्यंत भालचंद्र आला नाहीं तर असें लिहून पाठवितों कीं तो मेला, व त्याला कारण हे. ओशाळा झालेला तो भीमखिंडीकडे जाणार नाहीं हें खास. या योगानें तीव्रवज्राला जास्त आनंद होईल. मग तिथें गेल्यावर भक्कम इनाम त्याला सोडतों थोडाच? [जातो.]

प्रवेश ९ वा.

स्थळ—भीमखिंड–राजा शैलेशाचा वाडा.

[इंदिरा आपल्या खोलींत रडत बसली आहे.]

इंदिरा—पराकाष्ठा झाली बाई!

पद—(जाती बालक ते०) चालीवर.

दीन दशा केली ॥ दैवानें ॥ सुखशृंगाहुनि
लोटुनि दिधलें ॥ दुःखकूपिं खालीं ॥ धृ० ॥
केविलवाणें होउनि बघतें ॥ श्रवण कराया
रमणस्तुतितें ॥ वदति परी करुनी एकीतें ॥
केवळ कागाळी ॥ १ ॥

पण असा कोणी चंडाळ ह्मणत नाहीं कीं त्यांच्यावर हे सारे खोटे आरोप आहेत. [मंदारमाला हळूंच प्रवेश करते. इंदिरा खालीं पाहते.]

मंदारमाला—मुली, तुझा शोक पाहून मला भारी वाईट वाटतं.

इंदिरा—(हुंदके देत) त्यांत नवल तें कसलं आहे? त्यांच्यावरचं

माझं प्रेम कांहीं लपलेलं नाहीं. पण आतां त्यांच्यावर भलभलते आरोप घेतां नी मला सांगतां कीं त्यांचं नांव सोडून दे.

मंदारमाला—अग खुळे, आरोप नव्हत; खडान् खडा खरं आहे. आज तुला कांहीं जास्त सांगायचं आहे. ऐकत नाहींस का?

इंदिरा—(त्रासून) बोला काय तें.

मंदारमाला—हिकडनं काल तुझ्या बापाच्या भेटीला जाणं झालं होतं तेव्हां अतुलचंद्राच्या दुष्कृत्याबद्दल त्याला फार दुःख झालं. तरी त्याची इच्छा तूं आमच्या घरीं पडावंस हीच आहे. म्हणून मुली त्याचा नाद सोडून दे आणि राजा पौलोमाच्या मताप्रमाणें आमच्या तीव्रवज्राला नवरा कर. तो देखील शूर व ममताळू स्वभावाचा आहे.

इंदिरा—(एकदम उठून) माई, काय बोलतां हें?

पद—झंपा.

नीच, खल राहु या अतुलचंद्रा कितिहि ॥ करिन नच मी कधीं वचनभंगा ॥ धृ० ॥ सोडुनी एक तो सर्व जग मानितें ॥ पितरसदृश, असे साक्ष विभु तो ॥ लक्ष त्याचे सर्वे घाल करुं नच तरी ॥ करिन आजन्म वैराग्यसंगा ॥ १ ॥

ऐकून ठेवा कीं त्यांच्यावरले आरोप निव्वळ खोटे आहेत; आणखीं, त्यांचे वैरी जसे त्यांची एकसारखी पाठ पुरवताहेत तसेच त्यांचे हित-चिंतकही त्या वैऱ्यांची खोडकी पुरीच जिरविण्याच्या तयारींत आहेत. तुह्माला काय ठाऊक आहे?

मंदारमाला—(विस्मयानें) म्हणजे? याचा अर्थ काय मुली?

[पडद्यांत "अहो माईसाहेब, अतुलचंद्र महाराज आले आहेत तर शैलेश महाराज आपणाला लवकर बोलावतात, चला."]

दोघी—(ऐकून) ठीकच झालं. समोर निकाल होईल. [घाईनें जातात.]

प्रवेश १० वा.

स्थळ--राजा शैलेशाची कचेरी.

[राजा व राणी कोचावर बसले आहेत. एका खुर्चीवर तीव्रवज्र बसला आहे, एक खुर्ची रिकामी आहे. तिच्या बाजूला अतुलचंद्र उभा आहे. मणिकपाल तीव्रवज्राजवळ उभा आहे.]

शैलेश—प्रिये, इंदिरेला येऊं दिलें नाहींस हें ठीक झालें कारण या प्रसंगांत तऱ्हेवाईक गोष्टींचा निकाल करावयाचा आहे.

अतुलचंद्र—बाबा, आतां विलंब नको.

शैलेश—ठीक आहे. चौकशीला सुरुवात करूं. तीव्रवज्राला राग येण्याजोगें वर्तन तूं कधीं केलेंस काय?

अतुलचंद्र—नाहीं बाबा. दादा, पहा लबाड बोलशील तर?

तीव्रवज्र—शाबास अतुलचंद्रा! पुढें तूं नाकबूल जाणार हें मला आधींच माहीत होतें.

अतुलचंद्र--हं! तर मग सुवर्णगडास तूं माझा कसकसा छळ केलास त्याचे कांहीं चुटके तर बाबांना ऐकूं दे.

पद—(प्रिया मीनाक्षी०) चालीवर.

कसा वदलासी ॥ "तुजसवें करिन आमरण
गाढ वैरासि ॥ धृ० ॥ विश्रुत झाला स्वविक्र-
मानें ॥ घडे हेंचि जड मूल महाद्वेषासि ॥ १ ॥
प्रेम इंदिरेचें तुजवरती ॥ नसे मजवरी जरी
मदिय तिजपाशि" ॥ २ ॥

तीव्रवज्र--हें खोटें आहे, अगदीं खोटें आहे.

अतुलचंद्र—नाहीं. या धारातीर्थाची शपथ. (तरवारीचें चुंबन घेतो.)

तीव्रवज्र—(स्वगत) आपल्याच्यानें शपथ घेववत नाहीं बोवा ही! (हात उराशीं बांधून खुर्चीला टेकून खालीं पाहतो.)

शैलेश—(हें पाहून) अतुलचंद्रा, असें कधीं आपल्या भावाला बोलला होतास कीं माझ्या मागें या भीमखिंडीचा राजा तूं होणार, तो नाहीं ह्मणून?

अतुलचंद्र—(रागानें) नाहीं. जीभ झडून पडेल असें बोललों असेन तर.

शैलेश—विश्वपाल सुवर्णगडाहून व चंदनदासाच्या खाणावळींतून पळून गेला त्या कृत्याला तूं कानाडोळा केलास किंवा साह्य केलेंस काय?

अतुलचंद्र—हीं सगळीं कुभांडें माझ्यावर रचलीं आहेत. वास्तवीक सुवर्णगडाहून तो पळाला त्यावेळीं मी मूर्छित पडलों होतों व त्याला दादासाहेबच कारण. आणि चंदनदासाच्या खाणावळींतून याच रावसाहेबानीं त्याला पळविलें, आणि अंगध्वजाचे ४० शिपाई फितवून मला व भालचंद्राला कैद केलें. आम्हा दोघांलाही ठार मारण्याचा इरादा होता पण त्या बिचाऱ्या रमेनें वांचविलें.

शैलेश—बरें, आपल्या इथें विश्वपाल व नेपाल असतांना एक दिवस त्यांचें एकांतांतील भाषण लपून ऐकण्याकरितां भालचंद्राला दारा आड उभें केलें होतें हें तुला माहीत होतें काय? व याविषयीं तूं विश्वपालाला अगोदर बातमी दिली होतीस काय?

अतुलचंद्र—नाहीं. परमेश्वर अधोगतीस नेईल हें मला भय होतें.

शैलेश—आणखीं ऐक. तूं प्रतापनगराला असतांना तुझी तेथील वर्तणूक आम्हाला कळावी म्हणून आह्मी एक मनुष्य तीव्रवज्राच्या मसलतीनें या कामगिरीवर नेमला होता.

अतुलचंद्र—तर मग तो लबाड मनुष्य मज समोर येऊं द्या.

शैलेश—मणिकपाला, ये पुढें.

अतुलचंद्र—मणिकपाला, तूं का? (गोंधळून डोळे लावून घेतो.)

तीव्रवज्र—(हळूंच) पाहिलेंत का बाबा कसा गांगरून गेला तो?

अतुलचंद्र—देवा, हें जग असें दुष्टांचें भांडागार कां केलेंस?

पद—(धरि अवरुनि०) चालीवर.

खल कितितरि असती भूवरी ॥ जन्मा येती
साधुजनाला छळण्यासाठिं परोपरी ॥ ध्रु० ॥
धातुस येते जशी घर्षणें उज्वलता उलटी
परी ॥ तसे तयांचे यश झळकाया केलिस
ही रचना खरी ॥ १ ॥

शैलेश—मणिकपाला, प्रतापनगरीं हा कोणा तरुण स्त्रीच्या नादीं लागला होता काय? असेल तर तिचें नांव सांग.

मणिकपाल—तिचें नांव कमला. वीरसेनाची बहीण.

तीव्रवज्र—(बापाकडे वळून) ह्मणजे पूर्वापार चालत आलेल्या हाडवैऱ्यांच्या घराण्यांतली बायको. (खाकरतो.)

शैलेश—पण या गोष्टीचा तुजजवळ काय पुरावा आहे?

मणिकपाल—एक दिवस भालचंद्र व मी शहराबाहेरील आंबराईतून परत येत असतांना शेजारच्या टेकडीजवळ कमलेला महाराजांनीं कवटाळून धरलें होतें तें आम्ही दोघांनीं पाहिलें.

अतुलचंद्र—अरेरे, काय करूं? (शांत होऊन) हूं, चालूं दे.

शैलेश—रुमालाची कशी काय गोष्ट लिहिली होतीस?

मणिकपाल— एके दिवशीं सकाळीं महाराजांनीं मला एक सुंदरसा हातरुमाल दाखविला व म्हणाले कीं कमला इथें रात्रीं विसरली तर तो तूं कोणाला नकळत तिला नेऊन दे.

अतुलचंद्र—(त्याची नरडी पिचकण्याच्या इराद्यानें) अरे लबाड बोलणाऱ्या थेरड्या!

शैलेश—खबरदार त्याच्या अंगावर गेलास तर.

अतुलचंद्र—बाबा, क्षमा करा. पुन्हा चवताळणार नाहीं. ऐकतों.

शैलेश—शहराबाहेरील देवीच्या देवळाजवळ काय प्रकार झाला रे?

मणिकपाल—एकेदिवशीं मध्यरात्रीं महाराज मला घेऊन त्या देवळाजवळ गेले. तिथें कमलेचें व यांचें बराच वेळ भाषण झालें. ही गोष्ट वीरसेनाला कशी कळली कोण जाणे! तो लगेच तिथें आला.

दोघांनीं तरवारी उपसल्या. लढाईत वीरसेन हरला.

शैलेश—आतां दीड लक्ष रुपयांच्या चोरीविषयीं तुझें काय ह्मणणें आहे?

मणिकपाल—अतुलचंद्र महाराजांना मी पुष्कळ सांगून पाहिलें कीं ही जोखीम स्वत:जवळ कशाला ठेवतां, पौलोम महाराजांच्या अडत्याच्या जिम्मेस लावून द्या, गरज पडेल तेव्हां त्यांचे दुकानांतून उचलतां येईल; पण ऐकतो कोण? बदफैली व जुगार लोकांच्या नादीं लागलेले हे, दिवसभर आपले त्या अड्यावर असत. मला पैशाविषयीं शंका आली म्हणून मी त्यांना अशा सूक्ष्म तऱ्हेनें विचारलें कीं ते टाळाटाळी करूं शकणारच नाहींत. मग त्यांनीं बळेंच तिजोरी उघडून दाखविली, पण त्यांत काय असणार? मजसमोर त्यांची लबाडी कांहीं चालेना. तेव्हां त्यांनीं मोठी लाडीगोडी लावून माझी समजूत घातली कीं दोनचार दिवसांच्या खेळण्यांत पुन्हा रकम आणतों पण तूं कोणाला कळवूं नकोस. त्यानंतर त्यांनीं आपणाला त्या संबंधीं केव्हां पत्र घातलें तें कांहीं मला समजलें नाहीं.

शैलेश—आणखीं कांहीं सांगायचें आहे काय मणिकपाला?

मणिकपाल—होय सरकार. एका मागून एक दोन रात्रीं महाराज फारच उशीरां म्हणजे तीनप्रहररात्रीच्या सुमारास बिऱ्हाडीं आले. एवढ्या काळ्या रात्रीं ते कोठे होते हें त्यांचे तेच सांगतील; मी काय सांगूं? एवढें मात्र मला सांगणें भाग आहे कीं दुसऱ्या रात्रीं हे कोठें फिरतात हें पाहण्याकरितां भालचंद्र त्यांच्या लागावर होता. यांनीं तें ताडलें. पाहतों तों दुसऱ्या दिवसापासून त्या तरुण पोराचा पत्ता नाहीं. माझ्या मनांत भयंकर कल्पना एकदम आली कीं दुर्व्यसनाला लागलेलें माणूस स्वत:च्या मतलबाकरितां भलतें सलतें करायला मागें पुढें पहात नाहीं; म्हणून मी महाराजांच्या अपरोक्ष त्यांची तरवार काढून पाहिली तों ती रक्तानें भरलेली.

शैलेश—अरे काय बोलतोस हें?

अतुलचंद्र—(आकाशाकडे पाहून) परमेश्वरा, हा अधम चांडाळ

मी भालचंद्राचा खून केला असें ह्मणतो काय? नरडीचा घोट घ्यावासा वाटतो, काय करूं?

मणिकपाल--सरकार ही अलीकडली गोष्ट आहे. त्या तरवारीला अद्याप कांहीं रक्ताचे डाग असतील; कारण तेव्हां पासून ती काढण्याचा प्रसंगच आला नाहीं. इकडे येण्याची गडबड होती.

अतुलचंद्र—(स्वगत) यानें चोरून ती भरवून तर ठेवली नसेल ना?

शैलेश—अतुलचंद्रा, तरवार दाखीव पाहूं?

अतुलचंद्र—(तरवार काढून पुढें टाकतो. सर्व पाहतात तों ती रक्तानें भरलेली असते.)

तीव्रवज्र—(टाळ्या वाजवून) पहा बाबा, आणखीं कसा पुरावा हवा?

अतुलचंद्र--(दीन स्वरानें) दुष्टांनीं सीमा केली. हर, हर, देवा!

पद्--(बा माझ्या०) चालीवर.

भृत्याच्या कपटप्रलयें उच्छेदित मानस, काया
॥धृ०॥ मंत्रानें वेतालानें वश केलें किंवा का या?
॥ चाल ॥ प्रीतीचा धूप करोनी ॥ देहीं विष
संचारवुनी ॥ उर जेणें जाइ चरोनी ॥ चाल ॥
सेवेचे शल्य करोनी टोचोनी सर्वा ठाया ॥ १ ॥

शैलेश--(रागानें) काय ढोंगाचा बाजार मांडला आहे गुलामानें? आतां रिकामा आक्रोश कां करतोस? आपली बाजू सिद्ध कर. जर लबाडीनें मला फसवूं पाहशील तर हीच तरवार पुन्हा तुझ्या गळ्याचें रक्त पिईल. पोटचा पोर हरामखोर निघाला तर मग माया गुंडाळून ठेवणारा मी बाप आहे, समजलास? चालूं दे तुझें उत्तर.

अतुलचंद्र—(दुःख आवरून) ठीक आहे, बाबा. काय रे, पैसा चोरल्याबद्दल तूं कधीं पौलोमवाड्यांतील मणिकंटक नांवाच्या चाकराचा संशय धरला होतास काय?

मणिकपाल—कोण म्हणतो, मुळींच नाहीं.

अतुलचंद्र—तूं नाहीं मला सांगितलेंस कीं जिन्याच्या बाजूच्या खोलींत मणिकंटक व दुसरे कोणी त्या संबंधीं बोलत होते कीं पैशाचे

वांटे गांवाबाहेरील देवीच्या देवळापाशीं रात्रीं बारा वाजतां करूं ह्मणून? व त्यांच्या शोधार्थ आपण दोघे गेलों? इमानानें बोल.

मणिकपाल—गरीबावर कशाला उगीचच आळ घेतां महाराज? इमानानें हें सर्व खोटें आहे.

अतुलचंद्र—शेवटीं मला पैशासंबंधीं भालचंद्राची शंका नाहीं आली? व त्याला त्याचा जबाब मागत असतां तो एक तासाची फुरसत मागून पळून गेला?

मणिकपाल—(कानांवर हात ठेवून) छे छे, यापैकीं मी कांहीं पाहिलें नाहीं किंवा ऐकलें नाहीं.

अतुलचंद्र—अरे, अरे! तुला जास्त विचारण्यांत काय अर्थ? पण लक्ष्यांत ठेव, कीं रूपांतरानें जर कोणी दैत्य जन्मास आला असेल तर तो तूं आहेस.

शैलेश—त्याला अशी धमकी देशील तर खबरदार! तुझ्यांत पाणी असेल तर त्याच्या लबाड्या सिद्ध कर.

अतुलचंद्र—काय कपाळ सिद्ध करूं? त्यानें नकाराचा पाढा धरला आहे. तरी कमलेशीं जबरीनें लग्न लावण्याकरितां वीरसेनानें मला एक निनांवी लबाडीचें पत्र पाठविलें त्यावरून आपणाला कांहीं कल्पना होईल. (खिशांत हात घालत) हें पत्र घ्या. (तें सांपडत नाहीं हें पाहून) बाबा, पत्र तर हरवलें.

तीव्रवज्र—ही उघड लबाडी आहे.

अतुलचंद्र—

साकी.

प्रारब्धाचा कळस जाहला पत्र कसें हारपलें ॥
दुष्टात्म्यानें किंवा या तें फाडुनि फेंकुनि दिधलें ॥
कृत्रिम यच गणती ॥ कोणि न मजला विश्वसती ॥१॥

जास्त बोलण्यांत काय अर्थ आहे? बाबा, आपणाला वाटेल तसा न्याय करा.

शैलेश—अतुलचंद्रा, तुझ्या विरुद्ध मुख्यतः हे मुद्दे आहेत. पहिला,

चोरी तावडतोब मला न कळविणें, दुसरा कमलेची उघड फजीती न करणें, तिसरा निनांवी पत्र हरविणें, चवथा भालचंद्राच्या जबाबाला फुरसत न देणें, पांचवा तरवारीच्या रक्ताचा उलगडा न करणें. तुझ्या विरुद्ध निकाल फार दुखानें मला द्यावा लागतो आहे. तुझ्या बोलण्यावर विश्वास बसंत नाहीं. अरे दुर्दैवी मुला, तुला ह्मणूं तरी काय? भयंकर खून करणारा अधम चांडाळ समजूं काय? बोल, कबूल कर. आणि खून जर केला असशील तर माझ्या समोरून तें तोंड काळें कर. नीघ. अंगाला राख फांसून एखाद्या मठांत जाऊन रहा व राहिलेले आयुष्याचे दिवस काढ म्हणजे मरणानंतर नरकांत तरी फार वेळ सडणार नाहींस.

अतुलचंद्र—(दुःखानें) हें दुःख कसें साहूं? भालचंद्रा, तुझा वध मी करीन काय?

पद—तोडी–त्रिताल.

(का करिये जिन मारो०) चालीवर.

लाविन का खुकुलाला ॥ लांछन ॥ शस्त्रें वधुनी
तुजला ॥ ध्रु० ॥ होतों चंदनदासा सदनीं ॥
दुर्धर संकटिं पडलों त्याहुनि ॥ मम आक्रोशा
श्रवण करोनी ॥ ये झणि तारायाला ॥ लांछन ॥
लाविन० ॥ १ ॥

बाबा, मी इतकें नीच कर्म करीन असें आपणाला तरी वाटतें काय?

शैलेश—(चवताळून) भालचंद्र कोठें आहे तर मग, अभागी पोरा? आणि त्या तरवारीला रक्त कुठलें?

[पडद्यांत "दार खोला नाहींतर लाथ मारून फोडून टाकीन" असा दोनदां शब्द होतो. भीमशौर्य व भालचंद्र प्रवेश करतात. तीव्रवज्र व मणिकपाल भयभीत होतात. शैलेश व मंदारमाला भीमशौर्याबद्दल आश्चर्य करतात. भालचंद्र जिवंत आहे ह्मणून आनंद दर्शवितात. भालचंद्राला आलिंगन देण्याकरितां अतुलचंद्र हात पुढें करतो.]

अतुलचंद्र—अहाहा!

साकी.

संकटसमयीं भालचंद्र हा ईशकृपें अवतरला ॥
खलदंष्ट्रेतुनि काढाया मज आरव परिसुनि आला॥
कौतुक होइ मनीं ॥ भेट सख्या मज कडकडुनी ॥१॥

(आलिंगन देतो)

भीमशौर्य--(मणिकपालाचा हात मुरगाळून मोठ्यानें) फितूर झालेला, विश्वासघातकी, खोट्या शपथा घेणारा, चोर, हरामखोर!

मणिकपाल--(घाबरून गुडघे टेकून) दया करा, क्षमा करा, अपराध सगळे कबूल करतों.

भीमशौर्य--(शैलेशास) राजाधिराज, दीड लाख रुपयांची चोरी करणारा हाच माकडतोंड्या लुच्चा. नानाप्रकारच्या निंद्य गोष्टी आपल्या मनांत भरवून देऊन आपल्या सद्गुणी मुलावर अघोर प्रसंग आणणारा हाच अधम. नीचा, खरें ना हें? बोल, नाहींतर लाथे खालीं तुडवून प्राण घेऊन टाकतों.

मणिकपाल—होय, खरें आहे, मी गुन्हेगार आहें. (तीव्रवज्राकडे बोट दाखवून) पण लांच देऊन या कामांत त्यानें मला फितूर केलें, मी काय करूं?

तीव्रवज्र—झूट, अगदींच खोटें आहे.

भीमशौर्य—(एक हात त्याच्या अंगावर फेंकून) अक्षरशः खरें आहे. कां? शरम नाहीं वाटत, आपल्या धाकट्या भावाचा द्वेष करतोस? मोठा राजपुत्र झालास आणखीं? (तीव्रवज्र भिऊन खुर्चीला टेकून खालीं पाहतो.)

शैलेश—(उठून) ये अतुलचंद्रा, आलिंगन दे. मी तुझ्यावर उगीच राग केला याबद्दल परमेश्वर मला क्षमा करो. (त्याला व मंदारमालेला अतुलचंद्र आलिंगन देतो.) मुला जा, अगोदर इंदिरेचें सांतवन कर. तिकडून आलास ह्मणजे भीमशौर्य मेल्याचा जिवंत कसा झाला, भालचंद्र कसा आला, तीव्रवज्र व मणिकपाल यांचें काय करायचें याचा विचार करूं, आणि एकदम तुझा लग्नसमारंभ करून टाकूं.

मणिकपाल—(तीव्रवज्राला एकीकडे) महाराज, धन्य झाली तुमची, हात जोडले!

तीव्रवज्र—(तिरस्कारानें) अरे जा. नांवाचा तीव्रवज्र होईन तर त्याला एकदाचा पाताळांत घालीनच घालीन.

अतुलचंद्र—(भीमशौर्य व भालचंद्र यांच्या कमरेभोंवतीं हात गुंडाळून) मित्रांनों, आज तुम्हीच मला मुक्त केलेंत.

पद—(प्रिये पहा०) चालीवर.

न पाहिली अद्वितीय आजवरी स्नेहशीलता ॥ धृ०॥
असतां दोघेहि वंद्य ॥ संभ्रमें विकल्प निंद्य ॥
होति धरुनि, हीच वंध्य ॥ बुद्धिशिथिलता ॥ १ ॥
फेडुं कसे सदुपकार ॥ पडला हा मनिं विचार ॥
होइ शिरावरिल भार ॥ केंवि उतरता ॥ २ ॥

[पडदा पडतो.]

* चवथा अंक समाप्त. *



अंक पांचवा.

प्रवेश १ ला.

स्थळ—भीमखिंडींतील एक लपण्याची जागा.

[वीरसेन प्रवेश करतो.]

वीरसेन--सासऱ्याला पदच्युत करून प्रतापसिंहानें एकदाची प्रतापनगरची गादी बळकावली व आपल्याला सार्वभौम करून घेतलें. इतर मांडलीक राजांप्रमाणें शैलेशानें ही या सार्वभौमाजवळ आपला अंकितपणा कबूल केला. तथापी वारंवार होत आलेल्या आमच्या अपमानाबद्दल शैलेशाच्या सर्व कुळाचा गुप्तपणें विध्वंस करून टाकण्याकरितां प्रतापसिंहाची परवानगी अंगध्वज काकांनीं मोठ्या माराकुटीनें मिळविली. नवीन कायद्याप्रमाणें जमीनीची मोजणी करून खंडणीचा आंकडा ठरविण्याकरितां बंदोबस्ताच्या अधिकाऱ्याबरोबर मला माझ्या २०० शिपायांनिशीं पाठविलें आहे ह्मणून आह्मी सर्व तुमचे पाहुणे आहोंत—दगा मुळींच नाहीं—अशी बनावट करून आज महिना झाला या भीमखिंडींत मी शैलेशाचा पाहुणचार खात पडलों आहें. इकडे मोजणीचें काम सुरू आहे व इकडे शैलेश, मंदारमाला, अतुलचंद्र, त्याची बायको इंदिरा वगैरे लोकांचा उत्कृष्ट विश्वास संपादन केला आहे. तीव्रज्राचें तोंड पाह्यचें नाहीं असा बापाचा निश्चय असल्याकारणानें, तो नेहमीं जंगलांत शिकारीच्या नादांत भटकत असतो; व भीमशौर्य नेहमीं विचारांत गुंतलेला रानांत फिरत असतो. सारांश अशाप्रकारचें मोहिनीजाल पसरल्यानें आमच्या कपटनाटकाला सध्यां धोका तर दिसत नाहीं.

पद—हिंडोल–धमाल.

(जालं अजब हेत०) चालीवर.

मैनाकशैलातलीं थोर उपमर्द केला अतुलचंद्ररिपुनें

किमर्थं ॥ धृ० ॥ अंगध्वजालागुनी तेवि दुर्गी वृथा ताडिलें कां वचें दुर्विनीतें ॥ सौंदर्यसंपन्न भगिनी विवाहेच्छु अवमानिली कां बरें त्या प्रमत्तें ॥ वृत्तांत हे आठवीतांचि संतापवैश्वानरें अंग भडकोनि जातें ॥१॥

(पडद्याकडे पाहून) यावें सरदार, पोषाख तर खूप साधला बोवा आजचा. [पुरुषवेषांत कमला येते.]

कमला—खरंच का दादा हें वर्णन? नाहीं तर मला स्त्री ह्मणून कोणी ओळखील.

वीरसेन—अगदीं खरें. बरें, मणिकपालाविषयीं कसें काय?

कमला—शैलेशानं त्याला हद्दपार केल्याबद्दल तो अगोदरच रागावलेला नी तशांत माझी पैशाची भर—अगदीं कुत्र्यासारखा करून टाकला त्याला. त्याच्यामुळं आपल्याला या भीमखिंडींतल्या चोरवाटा कळल्या. काळजी नको.

वीरसेन—बरें, पलटणी संबंधीं कसें काय?

कमला—खिंडीच्या दोन्ही दारांशीं आज प्रहर रात्र पर्यंत शंभर शंभर शिपाई येतील.

वीरसेन—सर्व कडेकोट तयारी आहे तर?

कमला—खात्रीनं. पण एवढे शिपाई पुरेसे नसतील तर काका ह्मणाले आणखी पाठवून देतों.

वीरसेन—या जंगली लोकांना ऐन मध्य रात्रीं झोपेच्या भरांत कापून टाकायचें आहे. एवढे शिपाई खचित पुरत.

कमला—पण तुझ्या तिकडचं ठीक ना?

वीरसेन—त्याची तुला काळजी नको. हें पहा, आज रात्रीं हें काम पार पाडायचेंच. वाड्याचा वरचा बंगला मला राह्यला दिला आहे तो तूं पाहिलासच. त्याला ती बाहेरच्या बाजूला खिडकी आहे! दोन प्रहर रात्रीं जिकडे तिकडे सामसूम राहील तेव्हां मी आपल्या बंगल्यांत दिवा लावीन, आणि त्या खिडकींतून दिव्याचा उजेड दिसला म्हणजे मणिकपालानें पलटणी आंत आणाव्या.

कमला—पण त्यावेळीं वाड्याच्या इतर खिडक्यांतून दिवे असले तर त्यानं फलाणाच दिवा ओळखावा कसा?

वीरसेन--हां! नीट समजून घे. समज असा दिवा आहे व अशी समोर खिडकी आहे. या दोहींच्या मधून मी इकडून तिकडे फिरत राहीन. ह्मणजे खिडकींतून एकदां उजेड दिसेल व दिसणार नाहीं; दिसेल व दिसणार नाहीं. आणि असें होऊं लागलें म्हणजे सर्व कांहीं शांत आहे, लोक झोपेंत आहेत असें जाणून खिडींत शिरणें सुरूं करावें.

कमला—हें तर झालं. पण आम्ही कत्तल केव्हां सुरूं करावी?

वीरसेन--ठीक. हा पहिला इशारा झाला ह्मणजे योग्य वेळानें तोफे सारखा एक मोठा दारूचा आवाज होईल व जाळ दिसेल. असें झालें कीं कत्तल सुरूं. समजलीस ना नीट?

कमला—होय.

वीरसेन—मी जातों तर. [जातो.]

कमला—अहाहा! प्रतापनगरास देवीच्या देवळा समोरच्या विहिरीवर केलेली प्रतिज्ञा आज खचित् तडीस जाणार.

पद—बागेसरी–धमाल.

(वर्तुलाकृति ही पहा०) चालीवर.

आठवे मज जेधवा इतिहास दारुण मागला ॥
तेधवा नच आवरी वपु कंप होतो सूटला ॥
नग्न हें करिं खड्ग घेउनि भग्न करुनी शत्रुला ॥
टाकुनी, मग जीव हा कृतकृत्य होइल चांगला ॥१॥

[जाते.]

प्रवेश २ रा.

स्थळ--दिवाणखाना.

[शैलेश, मंदारमाला व अतुलचंद्र बसले आहेत. बाजूला इंदिरा उभी आहे.]

शैलेश—परवांचे तीव्रवज्राचें कृत्य कांहीं ठीक नाहीं. मी त्याला तोफेच्या तोंडीं उडवून देणार खास. तूं आडवा येऊं नकोस. मी दगड आहे. असल्या पोराची मला माया नाहीं व दुःख ही नाहीं.

मंदारमाला—हें बघ मुला, सर्पाचा प्राण घ्यावा.

अतुलचंद्र—आई, बाबा, असें करूं नका, पदर पसरतों.

पद—मांड-दादरा.

शैलशिखेवरुनि जरी लोटिलें मला ॥ प्राणवायु मूर्छाकुल जरी जाहला ॥ धृ० ॥ द्वेषपूर्ण रोषपूर्ण भोगिचा जसा ॥ दंश केधवा करील नाहिं भरंवसा ॥ तीव्रवज्र टपुनि जरी बैसला तसा ॥ या मुखें निघे तरी न वधा बंधुला ॥ १ ॥

शैलेश—उंः! तुला काय त्याचें. (जांभई देऊन) आतां झोंप येते. [ते जातात.]

इंदिरा—या पेक्षां भावजीना दुसऱ्या गांवाला ठेवणं ठीक.

अतुलचंद्र—नाहीं प्रिये. तो राज्याचा अधिकारी आहे. त्यापेक्षां आपणच दूर देशीं राहणें उत्तम. [भालचंद्र येतो.] अरे अझून जागाच आहेस का? तुला एकदां सांगून ठेवलें ना कीं आम्ही कितीही वेळ गप्पा मारीत बसलों तरी तूं आपला नवाच्या पुढें खुशाल निजत जा ह्मणून?

भालचंद्र—माफ करा सरकार.

पद—(नच माते०) चालीवर.

मज नाहीं कारण ठावें ॥ जीवा कां चैन नसावें ॥ धृ० ॥ असा मध्यरात्रीं प्रकार घडला ॥ भ्रांतचित्त भीमशौर्य झाला ॥ "दारुण संकट आलें" वदला ॥ "ह्मणुनी सावध व्हावें" ॥ मज नाहीं० ॥ १ ॥

अतुलचंद्र—तो अलीकडे मोठा बहकून गेला आहे. त्याला असें

वाटतें कीं आपला पाहुणा वीरसेन याच्या पासून दगा होणार आहे. पण खरा प्रकार तसा नाहीं. जमीनीची मोजणी करून खंडणी ठरविण्याकरितांच फक्त तो आलेला आहे. तसें असतें तर त्याची लबाडी लपती ना. भीमशौर्याचें कांहीं तरी थोतांड आहे. तुझा त्यावर विश्वास नसेलच?

भालचंद्र—आहे कीं नाहीं कोण जाणें! [केंस मोकळे, घोळ भिजलेला, पदर अस्ताव्यस्त व थंडीनें काकडलेली रमा धापा टाकीत प्रवेश करते.]

इंदिरा—(चकित होऊन) रमे, कोण त्रेधा ही? नी अशा स्थितीत येण्याची अशी जरूर तरी कोणती?

पद—(वंदेऽहं शिरसा०) चालीवर.

थंडीनें जाहली ॥ दीन दशा ही भली ॥ ध्रु० ॥
केश विखुरले सर्व वेणिचे ॥ तेज पळालें
मुखचंद्राचें ॥ काया कष्टली ॥ १ ॥ कांहीं
अवयव पडले उघडे ॥ हिमजलयोगें भिजलें
लुगडें ॥ चोळी फाटली ॥ २ ॥

जा, शेगडीजवळ जाऊन बैस अगोदर, मग काय तें बोल.

रमा—नाहीं बाईसाहेब. शेकत बसायची वेळ नाहीं.

अतुलचंद्र—(चकित होऊन) पण असा कोणता जिवावरचा प्रसंग आहे?

रमा—आज उद्यां इतक्यांत दगा होणार आहे. बहुशा आजच होईल.

अतुलचंद्र—(उठून) काय दगा?

भालचंद्र—वीरसेन इथें—

रमा—काय वीरसेन इथं आहे? अग आई! फारच बिकट प्रसंग! कारण कमला पुरुषाचा वेष घेऊन एका पलटणी बरोबर इकडेच येत आहे; बरोबर मणिकपाल आहे. संध्याकाळीं त्यांनीं आमच्या खाणावळी जवळच तळ दिला होता. त्यांचा भयंकर मानस कळतांच मी धावपळ करीत आलें.

अतुलचंद्र—घाई करून उपयोग नाहीं. वीरसेनाला नकळत सर्व कांहीं केलें पाहिजे. प्रथम भालचंद्र आणि मी आत्तां वाड्याबाहेरून टेहेळणी करून येतों; नंतर बाबांना कळवूं. प्रिये, आलोंच समज. [जातात. पडदा पडतो.]

प्रवेश ३ रा.

स्थळ--भीमखिडींतील आसमंत भाग.

[पहिल्या प्रवेशांत वर्णन केल्याप्रमाणें दिव्याचा उजेड दिसणें व न दिसणें चालू होतें. जंगलाचा व नदीचा देखावा. एका बाजूला झाडाखालीं भीमशौर्य प्रार्थना करीत असतो. काळोख पडतो. अतुलचंद्र व भालचंद्र प्रवेश करतात.]

अतुलचंद्र--कोण थंडीचा कडाका बोवा?

भालचंद्र—ह्मटलें भीमशौर्याचें बरळणें केवळच वेडेपण दिसत नाहीं.

भीमशौर्य--कोण तो माझें नांव घेणारा? (जवळ येऊन पाहून) अशा भयंकर रात्रीं इथें कां बरें आलांत? पिशाचें, चेटुक व डांकिणी यांचे शद्व ऐकायला कीं काय?

अतुलचंद्र—अरेरे! भीमशौर्या, पिशाचांच्या चमत्कारीक कल्पना मनांत धरून तूं आपल्याला जास्ती पिसाळून घेतो आहेस. वास्तवीक पुढें काय होणार याचा स्वस्थपणें नीट विचार करीत नाहींस. दगा, क्रूर दगा होणार असें मलाही दिसतें.

भीमशौर्य—आं! आपले डोळे आत्तां उघडताहेत तर!

अतुलचंद्र--होय गड्या, तसें आहे खरें.

भीमशौर्य--पण या दग्याच्या मुळाशीं कोण आहे हें जाणलेंत काय?

अतुलचंद्र—होय, आपला पाहुणा वीरसेन. चंदनदासाच्या खाणावळीहून रमा थंडी वाऱ्यांत धांवत आली, व तिनें माझी कानउघा-

डणी केली.

भीमशौर्य—तर अगोदर वाड्यांत जाऊन त्या दगलबाज वीरसेनाचा नरडा पिचकून टाकूं द्या. (जाऊं लागतो.)

अतुलचंद्र—(त्याला धरून) हां! हें काय? घाई उपयोगाची नाहीं.

भीमशौर्य—(हालणाऱ्या उजेडाकडे पाहून) तें पाहिलेंत का? तो वाड्याच्या खिडकीतून दिवा कसा दिसतो व दिसेनासा होतो तो? कदाचित् वीरसेन आपल्या शिपायांना खुणावीत असेल.

अतुलचंद्र--किंवा कोणी मनुष्य झोंप येत नाहीं ह्मणून दिव्यासमोरून इकडून तिकडे फिरत असेल. त्यांत कांहीं अर्थ नाहीं.

भालचंद्र—पण कांहीं वेळापूर्वीं अंधार किट्ट होता. (इतक्यांत तोफेचा आवाज व जाळ होतो तो ऐकून व पाहून)

सर्व—दगा, दगा, दगा! [धांवत जातात. पडदा पडतो.]

प्रवेश ४ था.

स्थळ—राजवाडा–मोठी आग.

[कमला व वीरसेन प्रवेश करतात. बंदुकांचे आवाज व शिपायांचा कल्लोळ होतो.]

वीरसेन--अतुलचंद्राला मी ठार मारणार.

कमला—नाहीं, तें मी करणार. पण आधी इंदिरेला मारून आलेंच बघ. [जाते.]

वीरसेन—तोपर्यंत तीव्रवज्राचा समाचार घेऊन येतो. [जातो. मंदारमाला व भालचंद्र येतात.]

मंदारमाला—(ओरडून) अरे कपाळा! केवढा घात हा! वीरसेनानं तीव्रवज्राला मारलं.

भालचंद्र—काय झालें माईसाहेब?

मंदारमाला—माझा अतुलचंद्र कुठं आहे? [अतुलचंद्र येतो.]

तूं तरी जाऊं नकोस बाबा?

अतुलचंद्र—नाहीं आई. कमला राक्षसी प्राण घेण्याच्या हेतूनें "रमा कुठें आहे, रमा कुठें आहे" करीत इकडेच गेली--

भालचंद्र—काय? हा मी तिची गर्दन छाटून टाकतो पहा! [धांवत जातो.]

मंदारमाला—बाळा, वीरसेनानं तुझा भाऊ मारला.

अतुलचंद्र—(दोन्ही हात तिच्या तोंडा समोर नेऊन) हर, हर! काय बोलतेस आई!

पद—भैरवी–त्रिताल.

(शाम मुरली बजाई०) चालीवर.

तव वच परिसुनि मन भंगियलें ॥ इंद्राचे यापेक्षां दारुण वज्रला असते सहिलें ॥ ध्रु० ॥ आजवरी बहु मज गांजियलें ॥ बंधूशीं परी वैर न केलें ॥ "दादा" ऐशा प्रेमळ बोलें ॥ हाक मारुं कवणा न कळे ॥ १ ॥

[पडद्यांत--" शिपायांनों, लढा, आज तुमचाच जय आहे. शत्रूचे २०० लोक ठार झाले असून बाकी सर्व कैद केले आहेत. मी ही तोपर्यंत त्या फितूर झालेल्या मणि-कपालाच्या ठिकऱ्या करायला जातो.]

मंदारमाला—(त्वेषानें) अहारे रडक्या पोरा! जा त्या विश्वास घातकी वीरसेनाला ठार मारून टाक.

अतुलचंद्र—(इर्ष्येनें) त्याचें डोकें कांपून तुझ्या पायावर वाहीन तरच तोंड दाखवीन. नाहीं तर गर्दीत घुसून मरून जाईन. [जातो. पडदा पडतो.]

प्रवेश ५ वा.

स्थळ—राजा शैलेशाचा दरबार.

[शैलेश, मंदारमाला, इंदिरा बसले आहेत. भालचंद्र उभा आहे.]

शैलेश—प्रिये, तीव्रवज्र मारल्या गेला, वाईट झालें. पण कटकट चुकली.

मंदारमाला—(कांहींच बोलत नाहीं.)

शैलेश—भालचंद्रा, कमलेला तूं मारलेंस म्हणूनच रमा व आमची इंदिरा वांचली. शाबास!

भीमशौर्य—[प्रवेश करून] त्या दुष्ट मणिकपालाचा वध करून हा सेवक आला आहे. (प्रणाम करतो.)

शैलेश—शाबास भीमशौर्या. दुष्टांना हेंच शासन योग्य.

मंदारमाला—अतुलचंद्र कुठं आहे रे?

अतुलचंद्र—[प्रवेश करतो व तरवारीच्या टोकाला अटकविलेले वीरसेनाचे शीर आईबापांच्या पायांशीं ठेवतो.] आई, आतां झालें ना? (सर्व शिराकडे पाहतात.)

भीमशौर्य—(तिकडे पाहून) का वीरसेना इतःपर विश्वासघात करशील काय?

इंदिरा—बिचाऱ्याच्या चुलत्याची कंबर बसून जाईल.

अतुलचंद्र—आणि प्रतापसिंह मनांत खजील होईल.

मंदारमाला—या काळकूट कृत्याबद्दल त्याची दिगंतरीं अपकीर्ती जाईल.

इंदिरा—पण अंगध्वज आतां आपणावर चढाई करील काय?

भीमशौर्य—आतां कसली तो चढाई करतो?

शैलेश—असो. अतुलचंद्रा मला कडकडून भेट दे. (भेटतो.) सर्वसाक्षी परमेश्वरा देखत मी सांगतो कीं आजपासून माझ्या गादीवर अतुलचंद्र राज्य करील.

सर्व—(टाळ्या वाजवून) आनंद, आनंद!

शैलेश—भीमशौर्या, तुझें भविष्य खरेंच उतरलें. असो. आणखी कांहीं यापुढें दुर्दिन असतील तर सांग.

भीमशौर्य—नाहीं महाराज, आतां सदैव आनंद राहील.

अतुलचंद्र—तर मग ईशकृपेनें हें असो.

पद—भैरवी–त्रिताल.

(तनन दिर दिर०) चालीवर.

सदय मन राहो नृपतिचें ॥ लोक तया प्रेमभरें सेवुत ते घनजलनिपात योग्य कालिं होवोनिया पिको धान्य नितांत भूवरि ॥ ध्रु० ॥ लब्धविद्य होउत जन ॥ गृहजनकलिनीचता, दुराचरण, दैन्यकुदशा, घृणा जाउं लयास सत्वरि ॥ १ ॥

सर्व—तथास्तु.

[पडदा पडतो.]

* पांचवा अंक समाप्त. *

जाहिरात.

हें पुस्तक

खालीं दिलेल्या गृहस्थांकडे विकत मिळेल.

(१) ग्रंथकर्त्याकडे.

(२) रा. रा. श्रीनिवास गोपाळ केळकर प्रोप्रायटर " सी. पी. प्रिंटिंग वर्क्स, " नागपूर.

(३) बी. व्ही. ग्रामस्थ, स्टेशनर्स, गोलबंगल्यासमोरील दुकान, नागपूर.

(४) रा. रा. कृष्णाजी बळवंत पिंगे, एजंट, ओरियंटल लाइफ आफिस, तुळशीबाग रोड, नागपूर.